CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | सोमवार, ५ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक ३०६ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. dainiktarunbharat.com epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



चांगले कार्य करण्याच्या इच्छेला कृतीत रूपांतरित करण्याच्या भावनेला धर्म म्हणतात. आपण त्या धर्माचे रक्षण करू. आपल्याद्वारे प्रत्येक हिंदूच्या मनात हा जोश जागृत व्हावा, हा उत्साह निर्माण व्हावा की जोपर्यंत संघाचे कार्य चालू आहे, तोपर्यंत चांगले कार्य हाती घेतल्यावर अपयश येणार नाही. कारण संघ चांगले कार्य करणाऱ्यांच्या पाठीशी निष्पक्षपणे उभा आहे.

- **बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

# मराठी भाषा नव्हे; तर आपली ओळख

### १०० वे मराठी साहित्य संमेलन 'न भूतो न भविष्यति' ठरेल : शिंदे

### ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप




◆ **सातारा, ४ जानेवारी**

मराठी ही आपली केवळ भाषा नसून ओळख आणि अस्तित्व आहे. भाषा संपली तर अस्तित्वही संपेल. त्यामुळे महाराष्ट्रात मराठीचा मानसन्मान आणि दरारा वाढविला जाईल, असे उद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले. ९९ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमाला ते संबोधित करीत होते.

साहित्य संमेलनाचा समारोप सोहळा रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.



यावेळी उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत, साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराजे देसाई, आमदार भरत गोगावले, महेश शिंदे, संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील, महाराष्ट्र साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी, कार्यवाह सुनिताराजे पवार, उपाध्यक्ष गुरैय्या स्वामी, जिल्हाधिकारी संतोष पाटील, पोलिस अधीक्षक तुषार दोशी आदी उपस्थित होते.

शिवछत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सातारा नगरीत यशस्वीरीत्या पार पडलेल्या ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानंतर आता येणारे १०० वे मराठी साहित्य संमेलन हे 'न भूतो न भविष्यति' असे ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. ◀(तभा वृत्तसेवा)

#### गावागावांत एसटी स्थानकांवर पुस्तक विक्री केंद्र

**»संमेलनाध्यक्ष विश्वास पाटील यांनी उद्घाटनपर भाषणात मांडलेल्या मागणीचा उल्लेख करत उपमुख्यमंत्री म्हणाले की, गावागावांत एसटी स्थानकांवर पुस्तक विक्रीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात येईल. परिवहन मंत्र्यांशी चर्चा करून ही सुविधा निश्चित करण्यात येईल, असे त्यांनी आश्वासन दिले.** ■

## महत्त्वाचे

### सर्वाधिक ईव्ही विकणारी कंपनी बनली बीवायडी

**नवी दिल्ली** : चिनी कंपनी बीवायडीने विक्रीच्या बाबतीत टेस्लाला मागे टाकले. बीवायडीच्या २०२५ मध्ये बॅटरीवर चालणाऱ्या गाड्यांची विक्री सुमारे २८ टक्क्यांनी वाढून २२.५ लाखांहून अधिक झाली. तर, एलन मस्कच्या टेस्ला कंपनीने २०२५ मध्ये एकूण १६.४ कोटी इलेक्ट्रिक वाहने विकली, जी २०२४ च्या तुलनेत ९ टक्क्यांनी कमी आहेत. टेस्लाच्या विक्रीत सलग दुसऱ्या वर्षी घट झाली आहे. एलन मस्क यांचे राजकारण आणि बीवायडीसारख्या कंपन्यांकडून मिळणारी तीव्र स्पर्धा यामुळे विक्रीत घट झाली. ■

# अमेरिकेवर जगभरातून टीकेचा भडिमार

**व्हेनेझुएला हल्ला**

◆ **काराकस, ४ जानेवारी**

अमेरिकेने शनिवारी पहाटे व्हेनेझुएलावर हल्ला करून राष्ट्रपती निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला अटक करीत न्यूयॉर्कला नेले. या घटनेनंतर जगभरातून तीव्र प्रतिक्रिया उमटत असून अमेरिकेवर टीकेचा भडिमार होत आहे. मादुरोंना ताबडतोब मुक्त करावे, अशी मागणी चीन, रशियासह अन्य देशांनी केली आहे.

अमेरिकेच्या हल्ल्यात काही सैनिकांसह ४० जणांचा मृत्यू झाल्याचे व्हेनेझुएलाच्या लष्कराने म्हटले आहे. जवळपास १५० लढाऊ विमानांनी हल्ल्यात सहभाग घेतला. मादुरोंना पत्नीसह बळजबरीने ताब्यात घेत देशाबाहेर नेण्याचे अमेरिकेचे कृत्य अत्यंत चिंताजनक आणि आंतरराष्ट्राय कायद्यांचे व मुलभूत नियमांचे स्पष्ट उल्लंघन असल्याची टीका चीनच्या परराष्ट्र विभागाने केली आहे. ◀(वृत्तसंस्था)






## महत्वाचे...



### अभिनेते प्रवीण तरडे यांचा अन्नछत्र मंढळातर्फे सत्कार

**अक्कलकोट : दि . ४ जानेवारी**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र हे स्वच्छ, सुगम, सुरक्षित आणि संस्कृती जपत असल्याचे मनोगत प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेता प्रवीण तरडे यांनी व्यक्त केले. ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी न्यासाचे पुरोहित विश्वंभर पुजारी, एस.के.स्वामी, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शिवू स्वामी, अनिल बिराजदार, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



### उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**सांगोला,दि.४ जानेवारी -**

सांगोल्यातील उत्कर्ष प्राथमिक विद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कुलकर्णी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक भोसले, पूर्व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका शास्त्री, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका मागाडे उपस्थित होत्या. यावेळी शिक्षिका पवार व इ.४ तील विद्यार्थिनी सारण्या चंदनशिवे, श्रेया लेंडवे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनाविषयी माहिती सादर केली. या सादरीकरणामुळे कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला. यावेळी चित्रलेखन, माहिती लेखन, निबंध लेखन, शब्दकोडी या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका मागाडे, उपमुख्याध्यापिका कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षकेतर स्टाफ यांनी परिश्रम घेतले.


कांबळे


गायकवाड


पाचकुडवे


शिंदे

### मोहोळ पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी अशोक पाचकुडवे

**मोहोळ,दि.४ जानवेवारी-**

मोहोळ तालुका पत्रकार संघाचे अध्यक्षपदी अशोक पाचकुडवे यांची तर सचिवपदी दादासाहेब गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मोहोळ तालुका पत्रकार संघाची वार्षिक बैठक रविवारी दि. ४ जानेवारी रोजी झाली. त्यात सर्वानुमते या निवडी करण्यात आल्या. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मावळते अध्यक्ष महेश सोवनी होते. प्रारंभी वर्षभराच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर उपस्थित सदस्यांनी आपापली मते व्यक्त केली. त्यानंतर नूतन पदाधिकारी निवड प्रक्रिया पार पडली. नूतन कार्यकारिणी अशी : अध्यक्ष प्रा. अशोक पाचकुडवे, उपाध्यक्ष राम कांबळे, सचिव दादासाहेब गायकवाड आणि खजिनदार सुभाष शिंदे. यानंतर नूतन अध्यक्ष अशोक पाचकुडवे यांनी आगामी काळात करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांची माहिती दिली. तर मावळते अध्यक्ष महेश सोवनी यांनी वर्षभरात सर्व सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांचे आभार मानले. यावेळी जेष्ठ पत्रकार दिलीप (काका) देशपांडे, राजकुमार शहा, अशोक कांबळे, महेश कुलकर्णी, संजय आठवले, देविदास नाईकनवरे, चंद्रकांत देवकते, भारत नाईक, बालाजी शेळके, विष्णु शिंदे, सुहास घोडके, गो.रा.कुंभार, राजू शिंदे, सम्मेद शहा आदि पत्रकार उपस्थित होते.



### तालुकास्तरीय किशोरी मेळाव्यात वर्षा बिराजदार हिचे यश

**अक्कलकोट, दि. ४ जानेवारी**

तालुकास्तरीय किशोरी मेळाव्यात जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा बोरी उमरगे येथील वर्षा बिराजदार पोस्टर्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला तर रंगभरण या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविल्याने गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे विस्तार अधिकारी स्वामी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही (बालिका दिन) तालुकास्तरीय किशोरी हितगुज मेळाव्याचे आयोजन जेऊर येथे केले होते. तालुक्यातील किशोरींचा सहभाग असून तालुकास्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे येथील नवोपक्रमशील विद्यार्थीप्रिय शिक्षिका श्रीमती रिंकू अनंतराव जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता सातवीच्या वर्गातील वर्षा बिराजदार हिने पोस्टर्स स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला तर रंगभरण या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला याप्रसंगी मैंदर्गी केंद्राचे केंद्रप्रमुख महादेव पाटील उपस्थित होते. याप्रसंगी सर्व बालिका व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# धनशक्ती विरोधात जनशक्ती उभारणार

## मोहोळ तालुका विकास आघाडीच्या बैठकीत निर्धार

### बैठकीला अमित ठाकरेंची हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.४ जानेवारी-**

गेली २५ वर्षे ज्या कार्यकर्त्यांनी या तालुक्यातील प्रस्थापितांच्या विरोधात घरावर तुळशीपत्र ठेवून विरोध टिकवून ठेवला व गेल्यावेळी झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीत खासदार व आमदार निवडून आणून तालुक्यात परिवर्तन घडविले, त्या कार्यकर्त्यांची ही निवडणूक असून सामान्यातल्या सामान्य कार्यकर्त्याला या निवडणुकीमध्ये संधी देऊन धनशक्तीच्या विरोधात जनशक्ती उभी करून प्रसंगी लोकवर्गणी गोळा करून त्या उमेदवाराला ताकद देऊन मोहोळ पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेवर झेंडा फडकवू. असे प्रतिपादन राष्ट्रवादी कांग्रेसचे (शरदचंद्र पवार ) प्रमुख नेते लोकसेवक संजय क्षीरसागर यांती केले.



आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुक २०२६ संदर्भात मोहोळ तालुका महाविकास आघाडीची बैठक हॉटेल धुलवड हॉल मोहोळ येथे पार पडली.

या बैठकीमध्ये काँग्रेस आय पक्षाचे नेते सुरेश शिवपूजे,सिद्राम पवार,बिरुदेव खरात, ज्ञानेश्वर कदम, दमन चव्हाण तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाळासाहेब वाघमोडे वक्ते, अशोक भोसले तालुकाप्रमुख, तुकाराम माने विधानसभाप्रमुख, सत्यवान देशमुख शहरप्रमुख, रमेश शिंदे, श्रीधर चव्हाण, कयूम शेख, नरसिंह पाटील, मनोज नागणे, प्रभाकर हावळे, शंकर भोसले, देविदास चेंडगे यांचेसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते संजय क्षीरसागर, सतीश पाटील, दत्तात्रय पाटील, विलास पाटील, धनाजी गायकवाड, राष्ट्रीय समाज पक्षाचे अनिल महानवर,बंडू देवकते स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे पप्पू पाटील, विकास जाधव, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष धीरज कसबे, अँड. विठोबा पुजारी, शेतकरी कामगार पक्षाचे संतोष कारंडे, शिंदे सेनेचे दादासाहेब पवार, दादा करणावर, केशव वाघचवरे, संतोष जाधव, दत्ता कदम, तुकाराम भोसले, रिपब्लिकन पक्षाचे पांडुरंग जवंजाळ यांचे सह महिला काँग्रेस च्या अंजली वस्त्रे,रतन कसबे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

या बैठकीत महाविकास आघाडीतील घटक पक्षांना एकसंघ करून आगामी निवडणुकीला सामोरे जाणे, संयुक्तपणे संपूर्ण तालुका दौरा करणे, इच्छुक उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागवून मुलाखती घेणे, महायुती सरकारच्या चुकीच्या धोरणाबाबत आवाज उठवून सर्वसामान्य लोकांमध्ये जनजागृती करणे, शेतकरी कर्जमाफी, महागाई, ऊस दराबाबतीत संभ्रम, सरकारचे शेतीमाल धोरण, बिघडलेला सामाजिक समतोल,वाढलेला भ्रष्टाचार तसेच जनतेत सरकार विरोधात असलेला असंतोष इत्यादी विषयांवर चर्चा करून धोरण ठरविले. मीटिंग दरम्यान मनसे नेते अमित राज ठाकरे यांनी भेट दिली आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

# दिव्यांगांकडे समाजाने सकारात्मक दृष्टीने पाहावे : विधिज्ञ शरद फुटाणे

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि . ४ जानेवारी**

दिव्यांग म्हणून जन्माला येणे ही कोणत्याही पालकाची किंवा त्या बालकाची चूक नसून समाजाने दिव्यांगांकडे सकारात्मक दृष्टीने पाहावे आणि त्यांना इतर मुलांप्रमाणे वाढण्यासाठी मदत करावी, असे प्रतिपादन विधिज्ञ शरद फुटाणे यांनी केले.

ते अबनॉर्मल होम मानवीय संशोधन संस्था, पुणे, रामकृष्ण परमहंस सेवा केंद्र, सक्षम दिव्यांग सेवा केंद्र आणि श्री स्वामी समर्थ राजेराय मठ, अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग बालक, पालक व संस्था प्रतिनिधींच्या सक्षमीकरणासाठीच्या एकदिवसीय कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

फुटाणे पुढे म्हणाले की, देशपातळीपासून ते गावपातळीपर्यंत दिव्यांगांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी



योजना राबविल्या जात आहेत. मात्र केवळ योजनांवर अवलंबून न राहता पालकांनी सक्षम सारख्या संस्थांच्या माध्यमातून आपल्या पाल्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करावा. यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक व श्री स्वामी समर्थ राजेराय मठाचे सचिव डॉ. किसन झिपरे यांनी उद्घाटनपर भाषणात सांगितले की, दिव्यांग बालके जन्माला येऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक काळजी घेणे अत्यंत आवश्यक असून यासाठी आधुनिक विज्ञानात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. पालकांनी फक्त शासकीय योजनांच्या मागे न लागता आपल्या मुलांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे लक्ष द्यावे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यशाळेतील सत्रांमध्ये श्री. दागा यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पालक व बालकांनी कसे सक्षम व्हावे याचे प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात किशोरी पाठक यांनी दिव्यांग बालकांच्या सर्वांगीण व परिपूर्ण विकासासाठी आवश्यक उपाययोजनांवर प्रकाश टाकला. पालकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचे निरसन डॉ. पंकज मीठ भाकरे, डॉ. तपसाळे तसेच सक्षम केंद्राच्या जिल्हाध्यक्ष नंदिनी मालगत्ते यांनी मुलाखत पद्धतीने केले व स्वतःच्या अनुभवातून मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत एकूण ७८ दिव्यांग बालक व पालक उपस्थित होते. सक्षम दिव्यांग सेवा केंद्राच्या वतीने दिव्यांगांसाठी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती असलेली पुस्तिका सर्व पालकांना मोफत वितरित करण्यात आली.

कार्यशाळेस रोटरी क्लबचे अध्यक्ष जी. एस. पाटील व सचिव श्री. तोरस्कर यांनी सदिच्छा भेट दिली. उद्घाटनप्रसंगी संतोष वगाले, विश्वस्त बाळू मोरे, प्राचार्य बसवराज वेळापूरकर आणि प्राचार्य शिवराय अडिवतोट उपस्थित होते.

या कार्यशाळेचे स्वागत व सूत्रसंचालन डॉ. शिवराय अडिवतोट यांनी केले, तर आभार प्रदर्शन किशोरी पाठक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अंकिता, वृशाली ठाणेदार तसेच मठातील सर्व स्वयंसेवक व विद्यार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले.



### सावित्रीबाई फुले व पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ०४ डिसेंबर**

देशभरातील मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी करून शिक्षणाची द्वारे सर्व जाती धर्मातील मुलींना प्रतिकूल स्थितीत खुली करणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचे स्मरण म्हणून तसेच सीमावर्ती भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे महान कार्य स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी केले ही भावना मनोभावे उद्दीपित करून कल्याणशेट्टी महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी खास त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित केला.

इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळातील विद्यार्थिनींनी एकत्र येऊन सावित्रीबाई फुले व पंचप्पा कल्याणशेट्टी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी प्रा. डॉ. बाळासाहेब पाटील, प्रा. मधुबाला लोणारी, प्रा.विद्या बिराजदार, प्रा. ओमकार घिवारे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. सौरभ भस्मे यांनी केले. प्रास्ताविक शकुंतला कोरे यांनी केले तर आभार पायल कांबळे यांनी मानले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, जूनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी कौतुक केले.



## पंढरपूर तालुका किशोरी हितगुज मेळावा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जानेवारी -**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती यांच्या निमित्त पंढरपूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागातर्फे रांझणी येथे किशोरी हितगुज मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, आमदार समाधान अवताडे यांच्या पत्नी अंजली आवताडे, आमदार राजू खरे यांच्या पत्नी तृप्ती खरे तसेच नुतन नगराध्यक्षा डॉ.प्रणिती भालके, सरपंच स्वाती दांडगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा स्वप्नाली दांडगे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन झाले. जळोली शाळेचे शिक्षक ज्ञानेश्वर दुधाणे आणि विद्यार्थ्यांनी स्वागतगीत आणि ईशस्तवन केले. गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे यांनी प्रास्ताविक केले. जळोली शाळेची विद्यार्थिनी श्रेया नरसाळे, सरकोली शाळेची विद्यार्थिनी भोसले अध्यक्षपदी होत्या. त्यानंतर जीवनात यशस्वी झालेल्या महिलांच्या मुलाखती, मुलींसाठी चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये जळोली, रांझणी, शेवते, सुस्ते, रोपळे आदी शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला पंढरपूर तालुक्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शरद चटे यांनी केले.आभार व्ही. एस.चव्हाण यांनी मानले. यावेळी प्रशांत ननवरे यांनी योगाची प्रात्यक्षिके सादर केली. सविता दुधभाते यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची महती सांगितली. पंढरपूर स्वरपंढरी टीमने गीतमंच विविध कृतीयुक्त गाणी सादर केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओझेवाडी केंद्रप्रमुख हणुमंत भोसले, चळे केंद्रप्रमुख प्रभाकर घाडगे, मुख्याध्यापक सुभाष यलमार व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पंचायत समिती कार्यालयातील सर्व सहकारी आदींनी अधिक परिश्रम घेत किशोरी हितगुज मेळावा यशस्वी केला.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे वागदरी येथे होणार राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर

**तथा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ जानेवारी-**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिर वागदरी येथे सोमवार दि.५ ते दि.११ जानेवारीपर्यंत होणार आहे.

शिबिराचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी करणार आहेत. यावेळी अक्कलकोट नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रमाकांत डाके विशेष अतिथी आहेत. संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसूती, पंकज सुतार, राजेंद्र बंदीछोडे यांची प्रमुख उपस्थिती आहे. अध्यक्षस्थानी सरपंच शिवानंद घोळसगाव हे आहेत. शिबिरात श्रमदान, वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, जनजागृती रॅली होणार आहे. दि.६ जानेवारीला दु.३ वा. जलसंधारण व्यवस्थापन विषयावर कृषी सहाय्यक आनंद कांबळे यांचे व्याख्यान, दि. ७ जानेवारी दु.३ वा. महिलांच्या जीवनातील बदलते स्वरूप आव्हाने व उपाय यावर परिसंवाद. मैंदर्गीच्या नुतन नगरसेविका सुरेखा होळीकट्टी, पुनम कोकळगी, रूपाली शहा सहभागी होतील. शांभवीताई कल्याणशेट्टी अध्यक्षस्थानी आहेत. दि. ८ जानेवारी दु.३ वा. शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका या विषयावर कृषी अधिकारी सुशील पाटील यांचे व्याख्यान आहे. दि. ९ जानेवारी दु.३ वा. भारुड, सांस्कृतिक कार्यक्रम, दि. ११ जानेवारी स.१० वा.समारोप आहे. अक्कलकोटचे नूतन नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी हे प्रमुख पाहुणे आहेत. शिवानंद घोळसगाव, प्रदीप पाटील, बापूराव चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत. प्र कुलगुरू डॉ लक्ष्मीकांत दामा, डॉ राजेंद्र वडजे, डॉ विरभद्र दंडे हे भेट देतील. संस्कार शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ एस आर लोखंडे, कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे भस्मे प्रयत्न करत आहेत.

## शोभायात्रेने एनएसएसच्या उत्कर्ष महोत्सवास दिमाखदार प्रारंभ





### सोलापूर विद्यापीठात १६ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) सोळाव्या राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा असलेल्या उत्कर्ष महोत्सवास आज (रविवारी) उत्साहात प्रारंभ झाला. विद्यापीठ परिसरात सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य आणि रंगतदार शोभायात्रेने या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते या शोभायात्रेचा शुभारंभ झाला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, राज्य संपर्क अधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी डॉ. मिलिंद काळे, क्षेत्रीय संचालक (महाराष्ट्र व गोवा) डॉ. अजय बा. शिंदे, फुलचंद नागटिळक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे, डॉ. सानवी जेठवानी, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी सीए महादेव खराडे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, राजाभाऊ सरवदे, एम. डी. कांबळे आदी उपस्थित होते.

या महोत्सवात महाराष्ट्रातील १६ विद्यापीठांमधील सुमारे साडेतीनशे एनएसएस स्वयंसेवक सहभागी झाले असून, युवकांच्या सामाजिक जाणीवा, सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि नेतृत्वगुणांना व्यासपीठ देण्याचा उद्देश या महोत्सवामागे आहे. शोभायात्रेत मुंबई, पुणे, नागपूर, गडचिरोली, अमरावती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आदी विविध विद्यापीठांचे स्वयंसेवक पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. शाश्वत विकासाच्या थीमवर ढोल-ताशांच्या गजरात, देशभक्तीपर घोषणा, लोककलांचे सादरीकरण आणि सामाजिक संदेश देणाऱ्या फलकांनी परिसर भारावून गेला होता.

कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी महोत्सवाचे उद्घाटन करताना सर्व स्वयंसेवकांचे स्वागत केले. युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, स्वयंसेवेची भावना आणि संस्कृतीची जपणूक रुजविण्यात एनएसएसचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी सांगितले. ''उत्कर्ष महोत्सव हा केवळ स्पर्धांचा कार्यक्रम नसून युवकांच्या सर्वांगीण विकासाचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे,'' असे त्यांनी नमूद केले.

महोत्सवाच्या कालावधीत आता तीन दिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक प्रश्न, पर्यावरण संवर्धन, स्त्री-सशक्तीकरण, संविधानिक मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मता यावर या उत्कर्ष महोत्सवात भर देण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### ईव्ही बॅटरीवर लागणार २१ अंकी युनिक क्रमांक

**नवी दिल्ली :** रस्ते वाहतूक मंत्रालयाने इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) बॅटरीची ओळख आणि त्यांच्या ट्रॅकिंगसाठी एक नवीन प्रणाली तयार केली आहे. सरकारने प्रस्ताव दिला आहे की, देशातील प्रत्येक ईव्ही बॅटरीला स्वतःचा एक युनिक ओळख क्रमांक असेल. त्याला बॅटरी पॅक आधार क्रमांक (बीपॅन) असे म्हटले जाईल. हा क्रमांक २१ अंकी असेल आणि त्यामुळे बॅटरीच्या निर्मितीपासून ते खराब होईपर्यंत किंवा रिसायकल होईपर्यंतची संपूर्ण माहिती एका क्लिकवर उपलब्ध होईल. बॅटरी उत्पादक कंपन्या आणि आयातदारांसाठी हे अनिवार्य असेल की त्यांनी प्रत्येक बॅटरी पॅकला २१-अक्षरी बीपॅन नियुक्त करावा. हा नियम केवळ बाजारात विकल्या जाणाऱ्या बॅटरीवरच नाही, तर कंपन्यांच्या स्वतःच्या वापरासाठी बनवलेल्या बॅटरीवरही लागू होईल.

### झेलेन्स्कींनी नियुक्त केले नवे चीफ ऑफ स्टाफ

**कीव्ह :** युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी मोठ्या फेरबदलाची घोषणा केली आहे. त्यामध्ये लेफ्टनंट जनरल किरिलो बुडानोव्ह यांची त्यांचे नवे चीफ ऑफ स्टाफ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. झेलेन्स्की म्हणाले की, आता राष्ट्रपती कार्यालयाचे मुख्य लक्ष सुरक्षा मुद्दे, संरक्षण आणि सुरक्षा दलांचा विकास आणि शांतता चर्चांवर असेल. बुडानोव्ह यांच्या जागी परदेशी गुप्तचर सेवेचे प्रमुख ओलेह इवाश्चेंको यांना लष्करी गुप्तचर विभागाचे नवे प्रमुख बनवण्यात आले आहे. याव्यतिरिक्त, झेलेन्स्की यांनी ३४ वर्षीय डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन मंत्री मिखाइलो फेडोरोव्ह यांना नवीन संरक्षण मंत्री बनवण्याचा प्रस्ताव दिला आहे.

### न्यूझीलंडमध्ये शिखांना विरोध वाढला

**जालंधर :** न्यूझीलंडमध्ये शीख-हिंदू आणि इतर धर्मांवरून वादविवाद तीव्र झाले आहेत. अनेक लोक आणि गट ख्रिश्चन व्यतिरिक्त इतर धर्मांचा न्यूझीलंडमध्ये विरोध करत आहेत. गेल्या काही दिवसांपासून शिखांच्या नगर कीर्तनाला विरोध करणाऱ्या ब्रायन टमाकी गटाव्यतिरिक्त, न्यूझीलंडच्या न्यू नेशन पार्टीच्या नावावर तयार केलेल्या पेजवर भारतीय लोकांबद्दल चर्चा सुरू आहे. याचे कारण न्यूझीलंडमधील २०२६ ची सार्वत्रिक निवडणूक असल्याचे सांगितले जात आहे. तरीही, तिची तारीख निश्चित झालेली नाही. पण त्याआधी शीख लक्ष्य बनले आहेत.

### एअर इंडिया विमानात इंधन गळती

**जयपूर :** राजस्थानमधील जयपूर आंतरराष्ट्रीय विमानतळावर नुकताच एक मोठा अपघात टळला. एअर इंडियाच्या - ६२२ विमानातील इंधन गळतीमुळे उड्डाण थांबवण्यात आले. हे विमान संध्याकाळी ७.५५ वाजता जयपूरहून मुंबईसाठी निघणार होते आणि विमान धावपट्टीकडे सरकत होते. याच दरम्यान तांत्रिक प्रणालीमध्ये बिघाडाचा इशारा मिळाला. त्यानंतर पायलट आणि ग्राऊंड स्टाफने तत्काळ उड्डाण थांबवले. त्याचबरोबर, सर्व प्रवाशांना विमानातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले आणि त्यांना पुन्हा टर्मिनल इमारतीत नेण्यात आले.

### कर्नाटकात अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

**बंगळुरू :** कर्नाटकातील हुबळी येथे १३ वर्षीय मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. तिन्ही आरोपी अल्पवयीन आहेत आणि पीडितेच्या घराजवळ राहतात. मुलीचे पालक बाहेर असताना त्यांनी हे कुकृत्य केले. त्यांनी पीडितेला एका निर्जन भागात नेले, तिच्यावर बलात्कार केला आणि त्याचे चित्रीकरण केले. पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे आणि त्यांच्याविरुद्ध पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपींपैकी दोन हायस्कूलचे विद्यार्थी आहेत, तर तिसरा शाळा सोडलेला आहे. मुलीच्या पालकांनी तक्रार केली की मुलांनी तिला धमकावले आणि त्यांनी चित्रीकरण केल्याचा दावा केला.



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३४,३०० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. २,३४,९०० |

### तापमान

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.४ | १९.९ |
| अकोला | ३०.३ | १६.६ |
| अमरावती | ३०.६ | १५.२ |
| भंडारा | ३०.० | १०.० |
| बुलडाणा | २८.५ | १६.० |
| चंद्रपूर | ३०.४ | १८.० |
| गडचिरोली | २९.२ | १४.० |
| गोंदिया | २८.६ | १२.२ |
| नागपूर | २७.८ | १५.२ |
| वर्धा | ३०.० | १५.६ |
| वाशीम | २९.६ | १२.८ |
| यवतमाळ | ३०.४ | १६.२ |

# सामाजिक सद्भाव भारतीय समाजाचा स्वभाव

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन



**भोपाळ, ४ जानेवारी**

सामाजिक सद्भाव ही काही नवीन संकल्पना नाही, हा आपल्या भारतीय समाजाचा स्थायीभाव आहे. समाजात सज्जनशक्तीचे जागरण, आचरणात पंच परिवर्तन आणि निरंतर सद्भावना संवाद ही आज काळाची गरज आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

संघ शताब्दीनिमित्त कुशाभाऊ ठाकरे सभागृहात आयोजित सामाजिक सद्भाव बैठकीत ते बोलत होते. यावेळी प्रख्यात कथावाचक पंडित प्रदीप मिश्रा आणि मध्य भारत प्रांत संघचालक अशोक पांडेय उपस्थित होते. बैठकीत मध्य भारत प्रांताच्या १६ शासकीय जिल्ह्यांमधील विविध समाजातील बांधव आणि संघटनेतील प्रतिनिधीही सहभागी झाले.

सरसंघचालक म्हणाले, समाज शब्दाचा अर्थ समान ध्येयापर्यंत वाटचाल करणारा समूह असाच आहे. भारतीय समाजाची कल्पना कायम अशीच राहिली आहे की, आपले जीवन भौतिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही दृष्टीने सुखी व्हावे. आपल्या ऋषी-मुनींना हे समजले होते की, अस्तित्व एकच आहे, केवळ पाहण्याची दृष्टी वेगवेगळी आहे. त्यांच्या तपस्येने आणि साधनेद्वारेच राष्ट्राचे निर्माण कार्य झाले आणि तोच आपला सांस्कृतिक गाभा आहे.

कायदा समाजाला नियंत्रित करू शकतो, पण समाज चालविण्याचे आणि जोडून ठेवण्याचे कार्य सद्भावनाच करते. विविधतेमध्ये एकता हीच आपली ओळख आहे.

बाह्य स्वरूपात आपण वेगवेगळे दिसत असलो तरी राष्ट्र, धर्म आणि संस्कृतीच्या स्तरावर आपण एकच आहोत. याच विविधतेत एकतेचा स्वीकार करणारा समाज हिंदू समाज आहे. हिंदू ही संकल्पना नाही तर एक स्वभाव आहे, जो कधीही मत, पूजा पद्धती किंवा जीवनशैलीच्या मुद्यावर वाद करत नाही. समाजात भ्रम निर्माण करून जनजाती आणि अन्य वर्गांना वेगळे म्हणून तोडण्याचा प्रयत्न केला गेला. प्रत्यक्षात वास्तविकता ही आहे की हजारो वर्षांपासून अखंड भारतात राहणाऱ्या सर्वांचा डीएनए एक आहे, असेही डॉ. मोहनजी भागवत म्हणाले. (वृत्तसंस्था)

# विमानात पॉवर बँक चार्ज करण्यावर बंदी

## डीजीसीएने जारी केली मार्गदर्शिका

**नवी दिल्ली, ४ जानेवारी**

भारतात विमान प्रवासादरम्यान पोर्टेबल इलेक्ट्रॉनिक उपकरणे चार्ज करण्यास बंदी घालण्यात आली आहे. एअरलाइन्सनी पुरवलेल्या सीट पॉवर सप्लाय सिस्टममध्ये पॉवर बँक प्लग करून चार्ज करण्यासही मनाई आहे.

पॉवर बँक आणि बॅटरीला फक्त हँड बॅगमध्ये परवानगी आहे; प्रवाशांना आता त्या ओव्हरहेड बिनमध्ये ठेवण्याची परवानगी नाही. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत आणि या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले आहेत.

उड्डाणादरम्यान लिथियम बॅटरीला आग लागण्याच्या घटनांनंतर ही बंदी घातली आहे. प्रवासी आणि क्रू मेंबर्स लिथियम बॅटरीवर चालणारी उपकरणे घेऊन जायचे जे विमानात चार्ज करता येतील. तथापि, या बॅटरींमुळे निर्माण होणारे धोके कमी करण्यासाठी, 'धोकादायक बॅगेज वॉर्निंग परिपत्रक' जारी करण्यात आले आहे.

या नियमांमध्ये असे म्हटले आहे की जर कोणतेही उपकरण उष्णता, धूर किंवा असामान्य वास सोडत असेल तर प्रवाशांनी केबिन क्रूला तात्काळ कळवावे आणि एअरलाइन्सनी लिथियम बॅटरीशी संबंधित सर्व सुरक्षा समस्या आणि घटनांची त्वरित तक्रार करावी. (वृत्तसंस्था)

## 'मनसे'चे बाळासाहेब सरवदे खून प्रकरण

# आणखी ११ आरोपींना ४ दिवसांची पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**



जोशी गल्ली, रविवार पेठ परिसरात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या वादातून मनसे विद्यार्थी शहर प्रमुख बाळासाहेब पांडुरंग सरवदे याची तलवार व कोयत्याने वार करून निर्घृण हत्या केल्याप्रकरणी फरार आरोपी विशाल शंकर शिंदे, सुनील शंकर शिंदे, राहुल राजू सरवदे, ईश्वर सिद्धेश्वर शिंदे, रोहित राजू सरवदे, महेश शिवाजी भोसले, शंकर बाबू शिंदे, अनिल शंकर शिंदे, शारदा तानाजी शिंदे, आलोक तानाजी शिंदे, विशाल ऊर्फ दादू संजय दोरकर यांना जेलरोड पोलिस ठाण्याच्या पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत मयताचे भाऊ बाजीराव पांडुरंग सरवदे (वय-२५, रा.जोशी गल्ली, रविवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, निवडणुकीत उभे राहू नये, अपक्ष अर्ज मागे घ्या, नाहीतर तुम्हाला जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकी आरोपीनी दिली. दि.२ जानेवारी २०२६ रोजी हनुमान मंदिराजवळ आरोपींनी वाद घालून बाळासाहेब सरवदे यांच्या डोळ्यांत चटणी टाकून त्यांना काहीही दिसू नये, अशी स्थिती निर्माण केली.

त्यानंतर काही आरोपींनी त्यांचे हात पकडले, तर काही आरोपींनी तलवार व कोयत्याने छातीवर वार करून त्यांना गंभीर जखमी केले उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी दि.३ जानेवारी २०२६ रोजी अमर शंकर शिंदे, शालन शंकर शिंदे, अतिश शंकर शिंदे, तानाजी बापू शिंदे या चार आरोपींना अटक करण्यात आली होती. ते सध्या पोलीस कोठडीत आहेत. उर्वरित वर नमूद सर्व आरोपींना आजरोजी अटक करण्यात येवून न्यायालयात हजर केले होते. यात आरोपीतर्फे ॲड. संतोष न्हावकर, ॲड.राहुल रुपनर तर सरकार पक्षातर्फे ॲड.ज्योती वाघमारे यांनी काम पाहिले.

# अमित ठाकरे यांनी स्व.बाळासाहेब सरवदे कुटुंबियांची घेतली सांत्वनपर भेट

### बाबा गेला... मला माझे पप्पा आणून द्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**




महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अमित ठाकरे यांनी स्व.बाळासाहेब सरवदे यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. स्व.बाळासाहेब सरवदे यांच्या पत्नी व दोन लहान मुलींनी अमित ठाकरेंसमोर टाहो फोडला. बाबा गेला...मला माझे पप्पा आणून द्या, मी काही नाही केलंलं पप्पा मला, का गेला सोडून, असा टाहो त्या मुलींनी फोडताच अमित ठाकरेंना देखील अश्रू अनावर झाले. हे भावूक क्षण पाहून बाळासाहेब सरवदेच्या कुटुंबातील सर्वच जणांचे डोळे पाणावले.

अशा निवडणुकाच आम्हाला नको आहेत, आम्ही सगळे फॉर्म परत घेतो, तुम्ही जिंका. मी कधी कोणी वारल्यानंतर राजकारण करत नाही. आज पण करायला आलो नाही. मी इथल्या पोलिसांना भेटणार नाही त्यांना विनंती करणार नाही. थेट गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार आणि न्याय मागणार आहे, असे अमित ठाकरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. यावेळी बाळासाहेब यांच्या पत्नी वंदना सरवदे, भाऊ बाजीराव, दोन मुली, परिवारातील सदस्य, नातेवाईक यांची गर्दी होती.

# आजपासून मिळणार प्रजासत्ताक दिन परेडची तिकिटे

**नवी दिल्ली, ४ जानेवारी**

संरक्षण मंत्रालयाने रविवारी कर्तव्य पथावर २६ जानेवारी रोजी होणाऱ्या परेडसाठी तिकिटांच्या विक्रीची घोषणा केली आहे. एका निवेदनानुसार, ७७ व्या प्रजासत्ताक दिनाची मुख्य परेड, बीटिंग रिट्रीटची फुल ड्रेस रिहर्सल आणि मुख्य बीटिंग रिट्रीट समारंभाच्या तिकिटांची विक्री ५ जानेवारीपासून सुरू होईल.

विक्री १४ जानेवारीपर्यंत सुरू राहील. तिकीट दररोज सकाळी ९ वाजल्यापासून वाटप केलेला कोटा संपेपर्यंत खरेदी करता येतील. तिकिटांची किंमत २० ते १०० रुपये आहे. बीटिंग रिट्रीटच्या फुल ड्रेस रिहर्सलसाठी तिकिटे २० रुपयांना तर बीटिंग रिट्रीट समारंभासाठी तिकिटांची किंमत १०० रुपये आहे. तिकिटे आमंत्रणडॉटएमओडीडॉटजीओव्हीडॉटइनद्वारे खरेदी करता येतील. दरम्यान, कर्तव्य पथावर पहिल्यांदाच लष्कराच्या रिमाउंट अँड व्हेटर्नरी विंगचे प्राणी परेडमध्ये सहभागी होतील. यात २ बॅक्ट्रियन उंट, ४ जास्कर ट्टू, ४ शिकारी पक्षी आणि १० मिलिटरी डॉग्सचा समावेश आहे. पहिल्यांदाच भारतीय स्थानिक जातींचे १० कुत्रे, ज्यात मुधोळ हाउंड, रामपूर हाउंड, चिप्पिपराई, कोम्बई आणि राजपालयम यांचा समावेश आहे, संचलन करतील. तसेच ६ पारंपरिक लष्करी कुत्रेही असतील. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशी खेळाडू आयपीएलमध्ये नको : दिलीप घोष

**कोलकाता, ४ जानेवारी**

ज्याप्रमाणे पाकिस्तानी क्रिकेटपटूंना इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) मध्ये खेळण्याची परवानगी नाही, त्याचप्रमाणे बांगलादेशी खेळाडूंनाही परवानगी दिली जाऊ नये, असे पश्चिम बंगाल भाजपाचे नेते दिलीप घोष यांनी रविवारी सांगितले. पश्चिम बंगाल भाजपाच्या माजी अध्यक्षांनी, कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) संघाला बांगलादेशी वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला २०२६ च्या आयपीएल संघातून वगळण्याच्या बीसीसीआयच्या निर्देशांचे स्वागत करताना ही टिप्पणी केली. 'बांगलादेशात जे काही घडत आहे, ते कोणासाठीही चांगले नाही. भारत सरकार आपले कर्तव्य बजावत असले तरी, बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांमुळे पश्चिम बंगालचे लोक खूप व्यथित आहेत, असे ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# मुंबईकरांसाठी ठाकरेंचा 'शिवशक्ती वचननामा'

## राज-उद्धव ठाकरेंची सेनाभवनात संयुक्त पत्रकार परिषद

**मुंबई, ४ जानेवारी**



मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सेना भवनात संयुक्त पत्रकार परिषद घेत 'शिवशक्ती वचननामा' जाहीर केला.

या पत्रकार परिषदेत मुंबईतील सामान्य नागरिक, महिला, विद्यार्थी, कष्टकरी वर्ग, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार यांना केंद्रस्थानी ठेवत अनेक घोषणा करण्यात आल्या. पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आज राज्यात लोकशाहीला हरताळ फासण्याचे काम सुरू आहे. मतचोरी उघड झाल्यानंतर आता उमेदवारांची पळवापळवी सुरू आहे. बिनविरोध निवडणुका घडवून आणण्यासाठी साम-दाम-दंड-भेद वापरले जात आहेत. हा थेट जनतेचा अपमान आहे. विधानसभा अध्यक्ष आपल्या पदाचा गैरवापर करत असतील, तर निवडणूक आयोगाने याची गंभीर दखल घ्यावी. (तभा वृत्तसेवा)

### वचननाम्यातील महत्त्वाच्या घोषणा

- घरकाम करणाऱ्या महिलांची नोंदणी करून नोंदणीकृत महिलांना दरमहा १५०० रुपयांचा स्वाभिमान निधी
- १० रुपयांत जेवण व नाश्ता योजना
- नोकरदार पालक व कष्टकरी महिलांसाठी पाळणाघरांची व्यवस्था
- पाळीव प्राण्यांसाठी स्वतंत्र दवाखाने
- प्रत्येक प्रभागात 'आजी□आजोबा मैदान'
- ७०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ता कर माफी, कचरा कर रद्द
- महापालिकेच्या शाळांची जमीन बिल्डरांच्या घशात जाऊ देणार नाही
- दहावीनंतर महापालिका शाळांमध्ये बारावीपर्यंत ज्युनियर कॉलेज
- मराठी शाळांसाठी 'बोलतो मराठी' डिजिटल उपक्रम
- बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मुंबईतील सर्वात मोठे ग्रंथालय
- पाण्याचे दर स्थिर ठेवून पुरेसे पाणीपुरवठा
- सुरक्षित फुटपाथ व मोकळ्या जागा
- महापालिकेच्या पार्किंगमध्ये मोफत पार्किंग सुविधा
- समुद्राच्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर
- मुंबईकरांसाठी १०० युनिटपर्यंत वीज मोफत

### उद्धव ठाकरेंच्या काळात ३ लाख कोटींचा भ्रष्टाचारः साटम

उद्धव ठाकरे यांच्या काळात तब्बल ३ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप करत, मुख्यमंत्री असताना १७०० बार व रेस्टॉरंटकडून वसुली करण्यात आल्याचाही दावा मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी केला. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर अमित साटम यांनी पत्रकार परिषद घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर गंभीर आरोप केले. अलीकडेच उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात साटम यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर देताना साटम यांनी ठाकरेंवर भ्रष्टाचाराचे आरोप करत जोरदार पलटवार केला.

मुंबईत सध्या रस्त्यांमध्ये खड्डे की खड्ड्यांमध्ये रस्ते, अशी अवस्था असून गेल्या दहा वर्षांत रस्त्यांसाठी सुमारे २१ हजार कोटी रुपये खर्च करूनही परिस्थिती सुधारलेली नाही. यासाठी त्यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाला जबाबदार धरले. तसेच कोरोना काळातील कामकाजावरही त्यांनी टीका केली. महालक्ष्मी येथील कोविड सेंटर बिल्डरांच्या फायद्यासाठी उभारण्यात आल्याचा आरोप करत, पीपीई किट, बॉडी बॅग्स यासह विविध खरेदी व्यवहारांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याचा दावाही साटम यांनी केला.

### ठाकरे बंधूंचा वचननामा नव्हे तर अपचननामाः शेलार

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर ठाकरे बंधूंनी 'शब्द ठाकरेंचा' अशा आशयाचा जाहीर केलेला हा वचननामा नव्हे तर अपचननामा असल्याची खोचक टीका मंत्री आणि भाजप नेते आशिष शेलार यांनी केली. वचननाम्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, हा वचननामा नसून मुंबईकरांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ॲड. शेलार म्हणाले की, १२ महिने नालेसफाई करण्याची भाषा आज केली जात आहे. पण मागील २५ वर्षांत महापालिकेवर सत्ता असताना हे का केले नाही, याचे उत्तर उद्धव ठाकरे देतील का? नालेसफाईच्या अभावामुळे अनेक दुर्घटना घडल्याचे उदाहरण देत त्यांनी तीव्र भावना व्यक्त केली. सीवर लाईनमध्ये गुदमरून मृत्यू झालेल्या डॉक्टर अमरापूरकर प्रकरणाचा तसेच घाटकोपरमध्ये उघड्या नाल्यात पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याचा उल्लेख करत त्यांनी ठाकरेंच्या निष्क्रियतेवर बोट ठेवले. लाडक्या बहिणी योजनेला न्यायालयात विरोध करणारे हेच लोक आता १५०० रुपये देण्याची भाषा करत आहेत.

# ज्ञानगंगा अभयारण्यात वाघ दाखल


### वन्यजीव विभागाचे महत्त्वाकांक्षी पाऊल

**बुलढाणा, ४ जानेवारी**

ज्ञानगंगा अभयारण्यात बिबट, अस्वल, तडस अशा हिंस्र पशुंच्या सोबतीला आता वाघ आला आहे. शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास पुरुष जातीचा पीकेसीटी-१ नावाचा वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात देव्हारी आणि बोरखेड-तारापूर जंगलाच्या बाजूने सोडण्यात आला. या वाघाने आज सकाळी एक शिकारही केली. यापूर्वी सी-वन नावाचा वाघ काही महिनेच ज्ञानगंगा अभयारण्यात राहिला होता. नंतर तो निघून गेला.

या वाघाला पेंच अभयारण्यातून आणण्यात आले. याचे वय ३५ महिने असून, तो अजून किशोरावस्थेत आहे. अर्थात् याचे मूळ पांढरकवडा व्याघ्र प्रकल्प आहे. फेब्रुवारी-मार्च २०२३ मध्ये त्याची आई मरण पावली असून चार ते पाच महिन्यांचे बछडे त्यावेळी मिळाले होते. त्यात एक पुरुष आणि महिला जातीचे बछडे होते. नंतर त्यांना पेंच व्याघ्र प्रकल्पात ठेवले होते. तिकडे दोघेही वाढले. आता ३ वर्षांचे झाल्यानंतर यातील वाघाला ज्ञानगंगामध्ये आणले गेले. वाघीण अजूनही पेंचमध्येच आहे.

१५ ते १६ तासांचा प्रवास करून वाघ मध्यरात्रीच्या सुमारास बुलढाणा जिल्ह्यात दाखल झाला. त्याला बेशुद्ध करण्यात आले होते. तीन ते चार तासांनंतर तो शुद्धीत आला. नंतर त्याला अभयारण्यातील बंदिस्त क्षेत्रात सोडण्यात आले. (तभा वृत्तसेवा)



ज्ञानगंगा अभयारण्यात दाखल झालेला वाघ

### तीन तासांतच केली पहिली शिकार

वन्यजीव विभागाने वाघासाठी शिकारीचा बंदोबस्त केला होता. एक रेडा त्या ठिकाणी सोडण्यात आला होता, जिथे वाघाला सोडले. बंदीस्त क्षेत्र खूप मोठे आहे. शिकार कुठे आहे, याचा वाघाला पत्ता नव्हता. पण, त्याने शिताफीने शिकार शोधली आणि सकाळी त्याचा फडशा पाडला. या घटनेमुळे वन अधिकारी आनंदात आहेत. प्रधान मुख्यवनसंरक्षक एस. एम. रेड्डी यांच्या प्रयत्नामुळे ज्ञानगंगा अभयारण्यात दुसऱ्यांदा वाघ दाखल झाला आहे.

# 'मराठीचा मान जागतिक स्तरावर नेणार'

**सातारा, ४ जानेवारी**

साहित्य संस्थांमध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय हस्तक्षेप केला जाणार नाही तसेच हिंदी सक्ती कोणत्याही परिस्थितीत होणार नाही. माय मराठीचा सन्मान, स्वाभिमान आणि अस्तित्व जपण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही सर्व मराठीजनांसाठी अभिमानाची बाब असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

मराठी भाषा भवनाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून, दिल्ली येथे कुसुमाग्रजांच्या नावाने भाषा केंद्र सुरू करण्यात आले आहे. देश-विदेशात आंतरराष्ट्रीय मराठी मंच उभे राहत असून, मराठी ही केवळ संवादाची भाषा न राहता जागतिक व्यवहाराची भाषा व्हावी, हा शासनाचा प्रयत्न आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावर्षी साहित्य संमेलनासाठी शासनाने ३ कोटी रुपयांचा निधी दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

**साहित्य संमेलन म्हणजे मराठी अस्मितेचा महोत्सव**

मराठी पराक्रमाची साक्ष देणाऱ्या साताऱ्यात हे साहित्य संमेलन होत असल्याचा विशेष आनंद असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. मराठी साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविल्यामुळे संमेलनाचा गौरव अधिक वाढला आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा ९९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेला साहित्यमहोत्सव असून, १०० वर्षे अखंड सुरू असलेला असा उपक्रम अन्य कोणत्याही भाषेला लाभलेला नाही, ही मराठी समाजासाठी अभिमानाची बाब असल्याचे शिंदे यांनी यावेळी नमूद केले.

**साहित्यिक चळवळीला नवे बळ**

कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी प्रास्ताविकात सांगितले की, १२ वर्षांच्या प्रयत्नांनंतर साताऱ्याला संमेलनाचे यजमानपद मिळाले. या संमेलनाच्या निमित्ताने साताऱ्यात पुन्हा एकदा साहित्यिक आणि सांस्कृतिक वातावरणाची निर्मिती झाली असून, ही चळवळ पुढे अधिक बळकट केली जाईल.

**१०० वे संमेलन पुण्यात**

शंभरावे मराठी साहित्य संमेलन पुण्यात आयोजित करण्यात येणार असून, त्याचे आयोजन महाराष्ट्र साहित्य परिषद करणार असल्याचे महाराष्ट्र साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### मंजूर करण्यात आलेले ठराव

- हिंदी वा तिसरी भाषा सक्तीच्या प्रयत्नांना ठाम विरोध करत डॉ. नरेंद्र जाधव समिती तत्काळ रद्द करावी आणि राज्यात कोणत्याही शाळेत हिंदी वा कोणतीही भाषा सक्तीची होणार नाही, याचे शासनाने लेखी अभिवचन द्यावे.
- राज्यातील मराठी माध्यमाच्या सुमारे १४ हजार शाळा बंद करण्याचा निर्णय तातडीने थांबवावा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत बंद पडलेल्या शाळा पुन्हा सुरू कराव्या.
- राज्यातील सुमारे ४० हजार शाळांमध्ये शालेय ग्रंथपालांची पदे भरावीत व नवीन पदनिर्मिती करावी.
- तज्ज्ञ भाषा सल्लागार समितीने २०२२ मध्ये सादर केलेले ५६ पानी संपूर्ण मराठी भाषा धोरण तत्काळ जाहीर करावे.
- मराठीला ज्ञानभाषा बनविण्यासाठी अपारंपरिक आंतरराष्ट्रीय मराठी विद्यापीठ स्थापन करावे.
- महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ८६५ गावांचा प्रश्न तातडीने सोडवून तो भाग महाराष्ट्रात समाविष्ट करावा.
- मराठी भाषा विकास प्राधिकरण स्थापन करावे.
- ज्येष्ठ साहित्यिक व लोककलावंत अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यात यावा.
- मराठी विषय बारावीपर्यंत सक्तीचा करावा.
- अभिजात भाषेचे सर्व लाभ केंद्राकडून मिळवून घ्यावे.
- मराठी अनुवाद अकादमी स्वायत्त स्वरूपात स्थापन करावी.
- गोवा व गुजरातमध्ये मराठीसाठी विशेष उपायोजना कराव्यात.
- सयाजीराव गायकवाड यांचे स्मारक व विमानतळ नामकरणाचे ठरावही मंजूर करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# दादागिरीचा आणखी एक नमुना

स्वत:ला बलशाली व आधुनिक म्हणविणाऱ्या अमेरिकेचा दुसऱ्या महायुद्धानंतरचा इतिहास धुंडाळला असता या तथाकथित लोकशाहीवादी देशाने सातत्याने शक्तिहीन आणि गरीब देशांवर आक्रमण केल्याचे दिसते. जवळपास ३० देशांना आपल्या हितासाठी अमेरिकेने लक्ष्य केले आहे. गेल्या पाच दशकांचा विचार केला तर कांगो, लेबनान, लिबिया, इराण, इराक, सोमालिया, सुदान, अफगाणिस्तान, सीरिया आदी अत्यंत गरीब आणि गृहयुद्धाने बेजार झालेल्या देशांवर अमेरिकेने आपल्या शक्तीचे प्रदर्शन केले. इराककडे महाविनाशक अशी रासायनिक आणि जैविक अस्त्रे असल्याचा आरोप करीत २००३ मध्ये अमेरिका आणि नाटो फौजांनी इराकवर आक्रमण करीत त्या देशाचा विध्वंस केला. एवढेच नव्हे तर इराकचे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना पकडून कथित न्यायालयाचा वापर करीत फासावर चढविले होते. हा देश अजूनही सावरलेला नाही. गृहयुद्धाच्या आगीत सापडलेल्या या देशात जवळपास ५ लाख नागरिकांचा मृत्यू झाला. अफगाणिस्तानलाही अशाच पद्धतीने बरबाद केले गेले. जो देश अमेरिकेच्या तालावर नाचणार नाही, त्या देशाची सर्वच प्रकारे कोंडी केली जाते. त्यात व्हेनेझुएलाच्या रूपाने आणखी एका देशाची भर पडली आहे. नागरिक झोपेत असताना हेलिकॉप्टर्स आणि लढाऊ विमानांनी हल्ला करीत अमेरिकेने व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो आणि त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले. पोलिसांनी एखाद्या गुंडाला ताब्यात घ्यावे अशा थाटात. मादुरो धडाचे नाहीतच; पण राष्ट्राध्यक्ष होतेच! असे किती तरी आहेत दुनियेत. तर अमेरिकेने अवघ्या अर्ध्या तासाच्या लष्करी कारवाईत मादुरोंना देशाबाहेर नेले. कितीही मतभेद असले तरी एखाद्या स्वतंत्र आणि सार्वभौम देशावर अशाप्रकारे हल्ला करून देशाच्या प्रमुखाचे अपहरण करणे आधुनिक जगात मुळीच शोभणारे नाही. ही निव्वळ दादागिरी आहे. हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये पत्रकार परिषद घेतली. अमेरिका जे करू शकते, ते कोणताही देश करू शकत नाही, असे दर्पोक्तिपूर्ण विधान करीत आम्ही मादुरो यांना अटक केली असून व्हेनेझुएलावर आमचा ताबा असल्याचे त्यांनी जाहीर केले. वास्तविक पाहता लष्करी बळावर अमेरिकेने मादुरो यांचे अपहरण केले.

डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यापासून त्यांचा लहरी स्वभाव आणि धोरणांमुळे जगात अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे. भारतालाही त्याचा जबर फटका बसतो आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलाला लक्ष्य का केले, याच्या खोलात गेलो तर असे दिसते की, दक्षिण अमेरिका खंडातील अनेक देश अमेरिकेचे वर्चस्व मान्य करण्यास नकार देत असतात. त्यात क्युबा, कोलंबिया, ब्राझील आणि व्हेनेझुएला आदी देशांचा समावेश आहे. गेल्या डिसेंबर महिन्यात अमेरिकेने कॅरेबियन समुद्रात जगातील सर्वांत मोठी विमानवाहू युद्धनौका यूएसएस जेराल्ड फोर्ड तैनात केली तेव्हाच ट्रम्प यांच्या मनात काळेबेरे असल्याची जाणीव झाली होती. सोबतच १५ हजार सैनिकही या क्षेत्रात आणले गेले होते. सत्तेवर आल्यापासून ट्रम्प यांनी मादुरो यांच्याविरोधात आघाडी उघडली. विनाशक जैविक आणि रासायनिक शस्त्रे-अस्त्रे असल्याचे आरोप करीत इराकवर आक्रमण करणाऱ्या अमेरिकेने व्हेनेझुएलावरही मादक द्रव्य तस्करीचे आरोप लावत हल्ला चढविला. दक्षिण अमेरिका खंडातील अनेक देश मादक द्रव्यांच्या तस्करीत सहभागी असल्याचे खरे असले तरी एखाद्या देशावर थेट हल्ला करावा व राष्ट्रपतीला अटक करून सार्वजनिकरीत्या त्यांचा अपमान करावा असा परवाना अमेरिकेला मिळालेला नाही. मादुरो यांच्यावर अमेरिकेतील न्यायालयात खटला चालविला जाणार असून, त्यांना कठोर शासन केले जाणार असल्याचे ट्रम्प यांनी जाहीर करून टाकले. तिथले तेल आमच्या ताब्यात आले आहे आणि आता अमेरिकन कंपन्या ते क्षेत्र विकसित करतील, असेही त्यांनी सांगून टाकले. खरे तर 'जिसकी लाठी, उसकी भैस' या उक्तीप्रमाणे अमेरिकेने व्हेनेझुएलाचा बेकायदेशीर ताबा घेतला आहे. जोपर्यंत योग्य सरकार सत्तेवर येणार नाही, तोपर्यंत हा देश आम्ही चालविणार, असे ट्रम्प यांनी जाहीर केले. याचा अर्थ असा की अमेरिकेला व्हेनेझुएलामधील जनतेशी काही घेणेदेणे नाही; अमेरिकेची गिधाडी नजर आहे ती तेलावर! कारण, या देशात कच्चे तेल आणि खनिजांचे प्रचंड साठे आहेत. अमेरिकेला या तेलसाठ्यांवर नियंत्रण हवे आहे आणि त्यातून जगातील इतर देशांना त्रास द्यायचा आहे. त्यात भारतही असू शकतो. कोणताही देश असू शकतो. व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्रपती ह्युगो शावेझ यांनी अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज बुश यांना सैतान संबोधले होते. बुश मला ठार मारण्याचा आणि आमच्या तेल साठ्यावर ताबा मिळविण्याचा कट रचत असल्याचा आरोपही शावेझ यांनी केला होता. शावेझ १९९८ मध्ये राष्ट्रपती म्हणून विजयी झाले होते. २००२ मध्ये त्यांच्याविरोधात लष्करी उठाव करण्याचा प्रयत्न झाला. यामागेही अमेरिकाच होती, हे नंतर उघड झाले. शावेझ यांनी देशातील अनेक खाजगी तेल कंपन्यांवर निर्बंध घातले आणि काहींचे राष्ट्रीयीकरण केले. परिणामी एक्सानमोबिल आणि कॅन्कोफिलिप्ससारख्या बड्या अमेरिकन तेल कंपन्यांना व्हेनेझुएलातून बाहेर पडावे लागले होते. याचा रागही अमेरिकेच्या मनात अद्याप आहे. शावेझ यांचेच अमेरिकाविरोधी धोरण निकोलस मादुरो यांनी २०१३ मध्ये सत्तेवर आल्यापासून राबविले. पण, मादुरो हे शावेझ यांच्यासारखे लोकप्रिय आणि कणखर राष्ट्रपती ठरू शकले नाहीत. मादुरो यांच्या कार्यकाळात व्हेनेझुएलाला मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटांचा सामना करावा लागला. त्यांचा स्वभावही हुकूमशहासारखा असल्याने त्यांनी प्रशासनात अनेक लष्करी अधिकारी पेरले होते. जुलै २०२४ मध्ये झालेल्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत मादुरो यांना विजयी घोषित करण्यात आले असले तरी निकालाचे परिणाम कधीच बाहेर आले नाहीत. विरोधी नेत्या एडमुंडो उरूतिया स्पष्टपणे विजेत्या असल्याचे दिसत होते.

व्हाईट हाऊसमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांची वापसी होताच त्यांनी मादुरोविरोधात आघाडी उघडली. व्हेनेझुएलाच्या सशस्त्र दलातील एका प्रमुख ड्रग कार्टेलचे नेतृत्व मादुरो करीत असल्याचे आरोप लावत अमेरिकेने डिसेंबर महिन्यापासून कारवाईला प्रारंभ केला होता. १५ हजार सैनिक आणि लढाऊ विमाने कॅरेबियन समुद्रात तैनात करून व्हेनेझुएलाच्या जहाजांवर हल्ले केले. मादुरो यांची सत्तेवरील पकड ढिली झाल्याने ३ जानेवारीला पहाटे अमेरिकेने हल्ला करूनही कोणताही प्रतिकार झाला नाही. अमेरिकेचे जवान थेट मादुरो यांच्या निवासस्थानात घुसून त्यांना पकडून नेत असताना तेथील सुरक्षा जवान काय करीत होते, हा मोठा प्रश्न आहे. याचाच अर्थ मादुरो यांची व्यवस्था आतमधून पोखरली गेलेली होती. चीन, रशियासह जगभरातील अनेक देशांनी ट्रम्प यांचा निषेध केला आहे. खुद्द अमेरिकेच्या माजी उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनीही ही कारवाई बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. मादुरो हा क्रूर आणि अवैध शासक होता, हे खरेच. मात्र, सत्तापालट किंवा तेलाच्या नावाखाली लढलेली अशी युद्धे शक्तिप्रदर्शनच ठरतात. शेवटी ती अराजकतेत परिवर्तित होतात व त्याची किंमत अमेरिकन कुटुंबांनाही चुकवावी लागते. इतर देशांनाही त्रास होतोच. या कारवाईमागे तेलाशी संबंधित हितसंबंध आहेत, अशी थेट टीका हॅरिस यांनी केली आहे. अमेरिकेने आतापर्यंत ज्या देशांवर कारवाई केली, त्याचा फटका भारताला बसत आलेला आहे. इराणवर निर्बंध लादल्याने भारताला तेल आयातीत कपात करावी लागली. २००० ते २०१० या काळात ओएनजीसी व्हेनेझुएलाकडून मोठ्या प्रमाणात कच्चे तेल आयात करीत असे. २०१९ मध्ये अमेरिकेने निर्बंध लादल्याने भारताला तेल आयातीत मोठी कपात करावी लागली. २०२४-२५ या काळात भारताने फक्त ३६४ दशलक्ष डॉलर्स किमतीच्या तेलाची आयात केली होती. निर्यातही फारशी नाही. त्यामुळे इराण अथवा रशियाविरोधातील निर्बंधांमुळे भारताचे जेवढे मोठे आर्थिक नुकसान झाले, त्या तुलनेत व्हेनेझुएलावरील कारवाईमुळे मुळीच झालेले किंवा होणार नाही. पण, अमेरिकेचा खरा चेहरा पुन्हा एकदा जगासमोर आलेला आहे आणि तो शांतताप्रिय जगासाठी आव्हान ठरणारा आहे यात शंका नाही.

## दिल्ली दिनांक

# २०२६ : तावांग की तायवान!

रवींद्र दाणी

तावांग खोरे आणि तायवान बेट! २०२६चे जागतिक राजकारण या दोन मुद्यांभोवती फिरणार काय, असा प्रश्न विचारीत २०२६ चा उदय होत आहे. हे दोन प्रश्न उपस्थित होण्यासाठी काही घटनाही घडल्या आहेत.

**चीनची नजर** : भारताच्या अरुणाचल प्रदेशातील तावांग खोऱ्यावर चीनची लाल नजर राहात आली आहे. चीनने तावांग खोऱ्यावरील आपला दावा कधीही मागे घेतला नाही. अरुणाचल प्रदेश हा भारताचा एक अविभाज्य भाग आहे हे चीन मान्य करावयास तयार नाही.

अशा या तावांग खोऱ्याबाबत सविस्तर चर्चा करणारा एक अहवाल मागील आठवड्यात अमेरिकन काँग्रेसला सादर करण्यात आला. 'मिलिटरी ॲण्ड सिक्युरिटी डेव्हलपमेंट इनव्हॉल्व्हिंग पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना' असे भारदस्त नाव असणाऱ्या या अहवालात तावांग व तायवानबाबत चीनच्या भूमिकेची सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. तावांग खोरे व तायवान यांना चीन आपल्या परराष्ट्र व सरंक्षण धोरणाचा 'कोअर' मुद्दा मानत असल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे.

**तणाव कायम** : भारत-चीन यांच्यात २०२० मध्ये संघर्ष झडला. त्यावेळी भारताचा बळकावलेला काही भाग चीनने आता रिकामा केला असला तरी दोन्ही देशांच्या लडाख भागातील सीमा तणावपूर्ण असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०२० पूर्वी भारत-चीन सीमेवर जी शांतता होती, ती आता नाही. दोन्ही देशांचे सैन्य आजही युद्धसज्ज स्थितीत परस्परांसमोर उभे असल्याने या देशांची ३४८८ किलोमीटर लांबीची सीमा अशांत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विशेषत: हिवाळ्यात एवढे मोठे सैन्य या भागात ठेवणे खर्चाचे काम असते. पण, भारतावर दबाव कायम ठेवण्यासाठी चीनने आपले सैन्य सीमावर्ती भागात कायम ठेवले आहे. परिणामी भारतालाही आपले सैन्य तेथे कायम ठेवावे लागत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे दोन्ही देशांमध्ये परस्परांबद्दल असलेली अविश्वासाची भावना हे आहे आणि ही भावना आज तयार झालेली नाही तर १९६२ च्या चिनी आक्रमणापासून ती तयार झाली आहे. तावांग खोरे ताब्यात घेण्यासाठी चीन आज ना उद्या लष्करी कारवाई करील असा दावाही या अहवालात करण्यात आला आहे.

**तीव्र प्रतिक्रिया** : अमेरिकेन काँग्रेसमध्ये सादर करण्यात आलेल्या या अहवालावर चीनने लगेच तीव्र प्रतिक्रिया दिली. भारत-चीन यांच्या संबंधात खोडा घालण्याचा प्रयत्न या अहवालाच्या माध्यमातून करण्यात आला आहे, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केले. भारत-चीन संबंधात आलेला तणाव कमी करण्याचा प्रयत्न दोन्ही देशांनी मागील काही महिन्यात केला. त्यात थोडेफार यश आले हे खरे असले तरी दोन्ही देशांत सामान्य संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत हेही तेवढेच खरे आहे.



**२०१७ चा प्रस्ताव** : २०१७ मध्ये चीनच्या वतीने भारतासमोर एक प्रस्ताव ठेवण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यानुसार तावांग खोरे चीनला देण्यात यावे व त्या बदल्यात अक्साई चीनचा काही भाग चीन, भारताला देईल असा हा प्रस्ताव होता, असा दावा करण्यात आला आहे. मात्र, हा प्रस्ताव सरकारी होता की गैरसरकारी याचा खुलासा मात्र करण्यात आलेला नाही.

भारताने स्वाभाविकच हा प्रस्ताव स्वीकारला नाही. याची परिणती २०२० मध्ये भारत-चीन यांच्यात मर्यादित झडप होण्यात झाली काय, हा एक अनुत्तरित प्रश्न आहे. यातील काही बाबी अनुत्तरित असल्या तरी चीन अरुणाचल प्रदेशावरील आपला दावा सोडण्यास तयार नाही ही बाब मात्र वारंवार स्पष्ट झाली आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर अमेरिकन काँग्रेसला सादर करण्यात आलेला अहवाल एकदमच झिडकारून चालणार नाही.

**तायवानचा वेढा** : अमेरिकन काँग्रेसच्या या अहवालास बळ देणारी घटना म्हणजे २०२५ संपता संपता चीनने तायवानला घातलेला वेढा. चीनने हाँगकाँग गिळंकृत केले आहेच. तसेच त्याला तायवानही हवे आहे आणि ही बाब त्याने लपवून ठेवलेली नाही. रशियाचे राष्ट्रपती ब्लादिमिर पुतिन यांना 'ग्रेटर रशिया' हवा आहे. त्यासाठी त्यांनी युक्रेनवर हल्ला चढविला. अगदी त्याचप्रमाणे चीनला 'ग्रेटर चायना' हवा आहे.

तायवान हा ग्रेटर चायनाचा भाग असल्याचे चीनने वारंवार सांगितले आहे. २०४९ मध्ये चीनच्या कम्युनिस्ट राजवटीस १०० वर्षे पूर्ण होतील. त्यापूर्वी 'ग्रेटर चायना'चे स्वप्न पूर्ण करण्याची महत्त्वाकांक्षा राष्ट्रपती शी जिन पिंग बाळगून आहेत असे सांगितले जाते. चीनने वर्ष संपत असताना तायवानजवळ लष्करी कवायत केली. यात चिनी पायदळ, नौदल, वायुदल आणि रॉकेट फोर्स म्हणजे प्रक्षेपणास्त्र दळ यांनी सहभाग घेतला होता. तायवान व जगाला योग्य तो संदेश देण्यासाठी ही कवायत करण्यात आली होती.

तायवान हे चीनच्या मुख्य किनाऱ्यापासून केवळ १६० किलोमीटरवर असलेले एक लहानसे बेट. चीनला ते आपल्या ताब्यात घ्यावयाचे आहे. याची रंगीत तालीम म्हणून ही लष्करी कवायत करण्यात आली. तायवानला वेढा घालण्याची चीनची योजना आहेच. त्याने ती कधीही लपवून ठेवलेली नाही.

**जोरदार तयारी** : चीन मागील काही वर्षांत जागतिक आर्थिक महासत्ता झाला आहे. त्याला लष्करी सामर्थ्याची जोड देण्याची जोरदार तयारी त्याने चालविली आहे असे सांगितले जाते. २०३० पर्यंत आपला अण्वस्त्रांचा साठा एक हजारपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य चीनने निर्धारित केले आहे. आज अमेरिकची लष्करी ताकद त्याच्या नौदलात आहे. साऱ्या जगावर लक्ष ठेवण्यासाठी अमेरिकेने विमानवाहू युद्धनौकांचा ताफा तयार केला. त्याला प्रतिशह देण्याची तयारी चीनने चालविली आहे. २०३५ पर्यंत आणखी ६ विमानवाहू युद्धनौका आपल्या नौदलात सामील करण्याची त्याची योजना आहे.

**अण्वस्त्रांचा भूमिगत साठा** : चीनने आपल्या मंगोलिया सीमेजवळ भूमिगत अण्वस्त्रांचा साठा तयार केला असल्याचे म्हटले जाते. अण्वस्त्रे तयार करणे हे जेवढे कठीण काम आहे, त्यांचा सुरक्षित साठा करणे त्यापेक्षाही कठीण काम असल्याचे मानले जाते. यासाठी भूमिगत खोल असे काँक्रिट बंकर बांधण्यात आले असून, चीनने त्यात १०० अण्वस्त्रांचा साठा केला असल्याचे मानले जाते.

**तावांग की तायवान?** : चीनच्या डोक्यात भारताचे तावांग खोरे व तायवान बेट या दोन्ही बाबी पक्क्या आहेत. प्रथम तो तायवान बेट गिळंकृत करून मग आपली नजर तावांग खोऱ्याकडे वळवितो की प्रथम तावांग खोरे बळकावण्याचा प्रयत्न करतो हेच अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारताच्या तुलनेत तायवान लहान आहे. त्याची लष्करी ताकद मर्यादित आहे. त्यामुळे तो प्रथम तायवानला गिळंकृत करील असे काही सरंक्षण तज्ज्ञांना वाटते तर काहींच्या मते चीन प्रथम तावांग खोरे ताब्यात घेण्याचा प्रयत्न करील. कारण तायवान ताब्यात घेण्याचा प्रयत्न केल्यास अमेरिका व काही देश तायवानच्या मदतीसाठी धावून जातील.

**फक्त रशिया** : भारताच्या तावांग खोऱ्याबाबत मात्र तसे काही होणार नाही. फक्त रशिया भारताच्या मदतीला धावून जाऊ शकतो. पण, चीनसोबत असलेल्या त्याच्या घट्ट मैत्रीमुळे रशिया तटस्थ राहील. तावांगमध्ये लष्करी कारवाई करण्यापूर्वी पाकिस्तानला हाताशी धरून भारत-पाकिस्तान सीमेवर युद्धाचा भडका उडवून द्यायचा आणि वेळ पडली तर बांगलादेशलाही भाराताविरुद्ध चिथावणी द्यायची.

भारत एकदम चीन, पाकिस्तान व बांगलादेश या तीन आघाड्यांवर लढू शकणार नाही असा विचार चीन करू शकतो, असे काही तज्ज्ञांना वाटते. भारताच्या भूमिकेतून विचार केल्यास अगोदर तावांग खोरे की अगोदर तायवानचे बेट हा मुद्दा निरर्थक आहे. चीन हा कधीही भारताचा मित्र होऊ शकत नाही हे गृहीत धरूनच भारताला आपली सुरक्षा व्यवस्था चोख ठेवावी लागणार आहे.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# भोजन, भजन सोबत व्हावे!

नुकतीच एक बातमी समोर आली की, आता नवीन पिढी आपल्या समस्यांचे उत्तर एआयकडे मागत आहे. समस्येचे स्वरूप कोणतेही असले तरी एआय त्याला आपल्या परीने उत्तर देतोय म्हणे. ही बातमी वाचून मनात विचारांचे काहूर माजले. घरातील मुलांना आपल्या समस्यांविषयी एआयला विचारावे लागणे, तंत्रज्ञानाची मदत घ्यावी लागणे हे फारच धक्कादायक आहे. असे का व्हावे, याचा विचार केला तर लक्षात येईल की, आज कुटुंबात आपापसातील संवाद कमी झाला आहे. आज घराघरातील चित्र डोळ्यासमोर आणले तर लक्षात येईल की, एकतर विभक्त कुटुंब आणि त्यातही सर्वांच्या स्वत:च्या वेळा ठरलेल्या. कोणी ऑफिस, कोणी शाळा, कॉलेज अशा व्यस्त दिनक्रमात अडकलेले. या सर्वांमध्ये कुठेतरी कुटुंबातील संवाद हरवतोय्. मुलगा दहावीनंतर कोणते क्षेत्र निवडावे, यासाठी मोबाईलवर शोधाशोध करतो. आई किंवा वडील यांच्याशी बोलण्याची त्याला एकतर गरज वाटत नाही किंवा तशी सवयच लागलेली नाही. दोन्ही बाबतीत जबाबदार पालकच आहेत. कारण त्यांनी आपल्या घरातील वातावरण तसे तयारच केले नाही की, एकमेकांच्या समस्या कोणी बोलेल. आपली भारतीय संस्कृती लोकांना जोडणारी आणि कुटुंबप्रधान अशी आहे. जेव्हा आपण 'वसुधैव कुटुंबकम्' म्हणतो तेव्हा आपल्याला आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करून कसे चालणार? सुधारणेची सुरुवात घरापासूनच व्हावी, असे म्हणतात. त्यामुळे कौटुंबिक सौहार्द निर्माण करण्यासाठी आधी कुटुंबीयांमध्ये संवाद सुरू व्हायला हवा. घरातील मुलांना आपल्या माणसांविषयी आदर आणि आपुलकी असावी. हे वातावरण निर्माण करण्यासाठी आपणही मुलांच्या मनात विश्वास निर्माण करायला हवा की, कोणतीही परिस्थिती असो आम्ही तुमच्या सोबत आहोत. तुमची कोणतीही समस्या असो आपण मिळून त्यावर तोडगा काढूया. अगदी मुलांच्या हातून चूक झाली तरी त्या परिस्थितीत त्याला सांभाळून कोसळण्यापासून वाचवले पाहिजे.

घरातील लोकांमध्ये संवाद निर्माण करण्यासाठी पुरातन काळापासून आपले पूर्वज सांगत आले की, भजन आणि भोजन हे कुटुंबातील लोकांनी एकत्र करावे. आताची स्थिती पाहता आठवड्यातून किमान एक ते दोन वेळा तरी कुटुंबातील सर्वांनी एकत्र जेवण घेतले पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी जी पंचसूत्री दिली आहे, त्यात कुटुंब प्रबोधन हा विषय प्राधान्याने घेण्यात आला आहे. मुळात, आपण भारतीय कुटुंबाविषयी अतिशय संवेदनशील असतो. कोणी याला आपली कमजोरी म्हणेल पण, खरे पाहता हीच आपली शक्ती आहे. कोणत्याही परिस्थितीचा सामना करण्यासाठी जेव्हा एक व्यक्ती उभी ठाकते तेव्हा तिची प्रतिकारशक्ती आणि एखादे कुटुंब एकोप्याने उभे राहते त्याची शक्ती यात फरक पडतो. जेव्हा एखाद्या व्यक्तीला कुटुंबातून वेगळे केले जाते तेव्हा त्या व्यक्तीचीच नव्हे तर कुटुंबाचीही शक्ती कमी होते. नोकरी, व्यवसायानिमित्त मुलांनी दुसरे घर करणे, ही व्यावहारिक अपरिहार्यता असते. पण, आपणहून कुटुंबाशी नाते तोडणे हा प्रकार समाज व्यवस्थेसाठी घातक ठरतो. कुटुंबापासून वेगळे होणाऱ्या व्यक्तीमध्ये कायम एक असुरक्षिततेची भावना असते. ही भावना त्याला कधीही सक्षम बनू देत नाही. याउलट, कुटुंबाशी जोडलेली व्यक्ती, मग ती कोणत्याही निमित्ताने बाहेर असली तरी, सामाजिकदृष्ट्या आनंदी आणि सुरक्षित असते. तिच्या मनात ही भावना रुजविण्याचे काम कुटुंबातील वातावरण करत असते. म्हणून प्रत्येक कुटुंबातील पालकांनी आपल्या मुलांसोबत जेवणे, नाश्ता करणे, वेगवेगळ्या विषयांवर गप्पा करणे, सर्वांनी एकत्र बसून टीव्हीवरील एखादा चांगला कार्यक्रम पाहणे, एखाद्या नातेवाईक किंवा आप्तेष्टांना घरी बोलावून त्यांच्यासोबत वेळ घालवणे, सामाजिक कार्यक्रमांना, नाटकांना एकत्र जाणे, मुलांना वेगवेगळ्या विषयांवर बोलते करणे हे सर्व करायला हरकत नाही. किंबहुना ही काळाची गरज आहे. कुटुंबात आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतात, हे मुलांना समजल्यानंतर त्यांची भरकटण्याची शक्यता आपोआपच निवळते. कुटुंब, समाज यामध्ये मिसळण्याची त्यांची वृत्ती वाढीस लागते. याचा सकारात्मक परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर नकळतपणे होतो आणि चांगल्या व्यक्तिमत्त्वाचा धनी असणारा एक उत्तम नागरिकही बनू शकतो. नंतरच्या काळात तंत्रज्ञान कितीही विकसित झाले तरी आपल्या अपत्याला स्वत:च्या समस्यांसाठी एआय किंवा तत्सम तंत्रज्ञानाकडे मदत मागण्याची गरजच भासणार नाही. यातून आपल्या कुटुंबातील मूल चांगले घडावे, ही प्रत्येकाची असणारी इच्छा फलद्रूप व्हायला मदत होईल. मात्र, त्यासाठी पालकांना थोडे प्रयत्न करावेच लागतील. त्यांच्या या प्रयत्नाचे चांगले फळ त्यांच्या अपत्याच्या जडणघडणीत दिसल्याशिवाय राहणार नाही आणि पर्यायाने एक चांगला समाज घडविण्याच्या प्रक्रियेत हे मोठे योगदान ठरेल.

७७५५९३८८२२

## प्रासंगिक

# भावनिक बुद्धिमत्ताही महत्त्वाची

विजय पांढरीपांडे

सध्या सगळीकडे एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेचा बोलबाला आहे. या नव्या तंत्राची अफाट क्षमता, त्याचे बरे-वाईट परिणाम, त्याचा नोकऱ्यांवर होणारा परिणाम, त्यातून निर्माण होणारे धोके, नैतिक प्रश्न अशा अनेक विषयांवर उलटसुलट चर्चा चाललेली आपण बघतो. मुळात कृत्रिम बुद्धिमत्ता हा शब्दप्रयोग चुकीचा वाटतो.

यात कृत्रिम असे काही नाही. कृत्रिम हात, कृत्रिम अवयव आपल्याला मूळ अवयवाचा अभाव जाणवू देत नाही. म्हणजे तो अगदी मूळ अवयवासारखाच असतो का? तर नाही. तो त्या अवयवाचे काम करतो. कृत्रिम पायाला संवेदना नसतात. कृत्रिम हात आपली कामे करताना मदत करेल. पण त्याला स्पर्शातले भाव कळणार नाहीत. म्हणजे जी मानवी नाही ती बुद्धिमत्ता. यात भावना, संवेदना याला थारा नसतो.

पण माणूस कोणतेही काम फक्त बुद्धीच्या आधारावर करत नाही. आपले विचार, आपले निर्णय हे बुद्धी आणि भावना दोन्हीचा उपयोग करून संतुलित पद्धतीने घेतलेले असतात. आपल्या निर्णयात काय चांगले, काय वाईट याचाही विचार असतो. कुणाला काय वाटेल, कुणी हे कसे स्वीकारेल याचाही आपण विचार करतो निर्णय घेताना. कृत्रिम बुद्धिमत्ता भावनेला थारा देत नाही. हे आपण नीट समजून घेतले पाहिजे.

औद्योगिक क्षेत्रात, आयटी संस्थांमध्ये, प्रॉडक्ट निर्मिती करताना, नव्या संकल्पना साकारताना केवळ उपयोगिता, आर्थिक बजेट (किंमत), सोय, आधुनिकता एवढाच संकुचित विचार करून चालत नाही. ते काम, तो प्रोजेक्ट हाताळणारी टीम, त्यातील प्रत्येकाची भावनिक गुंतवणूक तितकीच महत्त्वाची असते.

एखादी व्यक्ती कितीही बुद्धिमान असली, तिची निर्णयक्षमता, प्रतिभा कितीही उच्च पातळीची असली तरी उद्योग, प्रोजेक्ट हे सामूहिक टीम वर्क असते. टीममधील प्रत्येक जण एक दुसऱ्यावर अवलंबून असतो. एकाचे काम, त्याचे निर्णय हे दुसऱ्याच्या कामावर, निर्णयावर चांगला-वाईट परिणाम करीत असतातच.



टीममधील प्रत्येक पायरी, पातळी वरची व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी, टीमशी कशी वागते, यांचे परस्पर कोऑर्डिनेशन, अंडरस्टॅण्डिंग किती चांगले (किंवा वाईट) आहे यावर अंतिम निकाल अवलंबून असतो. इथे बुद्धी इतकीच भावना, संवेदना महत्त्वाची ठरते. एखादी व्यक्ती कौटुंबिक कारणाने अस्वस्थ असेल, शारीरिक, मानसिक व्याधीने त्रस्त असेल तर त्यामुळे ती साखळी तुटू शकते. अशावेळी एकमेकांना समजून घेणे, एक दुसऱ्याच्या भावनिक अडचणींची जाण असणे महत्त्वाचे ठरते.

सिंपथी, एम्पथी, पेशन्स, समजूतदारपणा या टीम वर्कसाठी, उत्तम निकालासाठी तितक्याच गरजेच्या आहेत जितकी बुद्धिमत्ता गरजेची आहे. प्रतिभा गरजेची आहे. अनेक कामावरच्या व्यक्ती, आपल्या अडचणी, घरगुती समस्या मोकळेपणाने स्वत:हून सांगत नाहीत. विशेष करून स्त्रियांच्या बाबतीत हे घडते. (पुरुषही याला अपवाद नाहीत) अशा वेळी टीम लीडरने सजग राहणे जास्त गरजेचे असते. कुणी सारख्या चुका करत असेल किंवा कुणाकडून दिरंगाई होत असेल, टाईमलाईनवर, टार्गेटवर परिणाम होत असेल तर त्या व्यक्तीला सरसकट दोषी ठरविण्याआधी, जबाबदार धरण्याआधी भावनिक पातळीवर संवाद साधून नेमकी कारणे जाणून घ्यायला हवीत. काही अपवाद सोडले तर सहसा कुणी मुद्दाम हलगर्जीपणा करीत नाही. कामात टाळाटाळ करणार नाही. त्यामागे काही तरी कारण असते. वैयक्तिक अडचण असू शकते.

काम, प्रोजेक्ट, टाईमलाईन, टार्गेट हेच टीम मेंबरचे सर्वेसर्वा आयुष्य नसते. त्याचेही घर, कुटुंब असते. मुलाबाळाची आजारपणे, घरात असलेल्या वृद्धाची काळजी अशा कितीतरी व्यक्तिगत समस्या असू शकतात. अशा परिस्थितीत आपण स्वत: कसे वागतो, स्वत:वर नियंत्रण कसे करतो, आतील उद्रेकाला कसे सामोरे जातो हे सगळे इमोशनल इंटेलिजन्समध्ये येते. मनावर ताबा मिळवणे, वागण्या-बोलण्यात संतुलितपण असणे, आपली अडचण लपंडाव न खेळता स्पष्टपणे सांगणे, आपण लीडर असलो तर दुसऱ्याची अडचण जाणून घेणे, हवी तिथे शक्य तितकी मदत करून त्या व्यक्तीला निराशेच्या वर्तुळातून बाहेर काढणे, अशा अनेक गोष्टी घरी दारी, कामाच्या ठिकाणी महत्त्वाच्या ठरतात. आपला बायोडेटा, ग्रेड्स, आपला पगार, पॅकेज, मिळणाऱ्या सोयी सुविधा याबरोबरच आपण जिथे काम करतो तिथले पोषक वातावरण तितकेच महत्त्वाचे असते. तिथल्या माणसांचे एकमेकांशी माणुसकीच्या नात्याने वागणे, एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना मदत करणे हे जास्त महत्त्वाचे असते. हा सगळा इमोशनल इंटेलिजन्सचाच भाग आहे. ऐहिक सुखे कितीही मिळाली, पायाशी लोळली तरी मानसिक समाधान नसेल, प्रत्येक जण आतून बाहेरून आनंदी नसेल तर बाकी सगळे व्यर्थ ठरते.

म्हणूनच आजच्या जगात या नव्याने आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेला इमोशनल इंटेलिजन्सची साथ अत्यावश्यक आहे. हा एकत्र प्रवास अधिक सुखदायी ठरण्याची शक्यता आहे. यावर बरेच काम चालू आहे. अशा नव्या संकल्पना सुरुवातीला नवी आव्हाने घेऊनच सामोरे येतात. त्यांचा स्वीकार करण्याआधी सर्वांगाने विचार करणे ही आपली नैतिक विवेकी जबाबदारी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना स्वत:ची बुद्धमत्ता गहाण ठेवणे, भावनांना तिलांजली देणे, माणुसकीचा विसर पडणे धोक्याचे ठरू शकते. आयुष्यात प्रत्येक क्षेत्रात सर्वांगी संतुलन महत्त्वाचे असते.

७६५९०८४५५५

## वाचक पत्रे

### नव्या वर्षासाठी नवा संकल्प...

नवीन वर्ष म्हणजे नव्या आशा, नवे स्वप्न आणि नव्या संधींचे प्रतीक असते. जुने वर्ष मागे टाकताना आपण आपल्या चुका, अपयश आणि अनुभव यांतून काहीतरी शिकलेले असतो. त्यामुळे नव्या वर्षाच्या सुरुवातीला स्वत:साठी एखादा चांगला संकल्प करणे ही एक सकारात्मक परंपरा मानली जाते. प्रत्येक माणसाच्या आयुष्यात बदल घडवून आणण्याची इच्छा असते.

नवीन वर्ष ही त्या बदलाची सुरुवात करण्याची योग्य वेळ असते. यावर्षी आपण अधिक चांगले व्यक्ती होऊ असा विचार मनात येतो. म्हणूनच लोक आरोग्य, शिक्षण, वागणूक, सवयी किंवा समाजोपयोगी कार्य याबाबत संकल्प करतात.

नवा संकल्प म्हणजे केवळ शब्दांत व्यक्त केलेली इच्छा नसून तो कृतीत उतरवण्याचा निर्धार असतो. संकल्प पाळण्यासाठी सातत्य, आत्मशिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक असतो. अडचणी आल्या तरी हार न मानता प्रयत्न करत राहणे महत्त्वाचे ठरते. नव्या वर्षाचा संकल्प हा स्वत:ला सुधारण्याचा एक मार्ग आहे. तो आपल्याला ध्येयाकडे नेतो आणि जीवन अधिक अर्थपूर्ण बनवतो. योग्य संकल्प केल्यास व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. नवीन वर्ष म्हणजे केवळ दिनदर्शिकेतील बदल नाही तर स्वत:मध्ये बदल घडवण्याची संधी आहे. प्रत्येकाने आपापल्या क्षमतेनुसार नवा संकल्प करून तो प्रामाणिकपणे पूर्ण करण्याचा प्रयत्न केला, तर नक्कीच आपले जीवन अधिक सुंदर आणि यशस्वी होईल.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

### 'अर्थकारण'मधील पराग परांजपे यांचा वाचनीय लेख

२९ डिसेंबर २०२५ च्या तरुण भारतातील अर्थकारण पुरवणीतील 'अर्थभान'मधील 'आकाशातील ग्रहांची गती मोजू शकतो पण माणसांच्या वेडगळपणाची नाही : सर आयझॅक न्यूटन' हा पराग परांजपे यांचा लेख खूप आवडला. मूलभूत आर्थिक साक्षरता नसेल, तर गुंतवणूक म्हणजे जुगार ठरतो. बाजार ही प्रयोगशाळा नाही आणि बाजार हे भौतिक शास्त्रासारखे शास्त्रही नाही. इतिहासातील प्रत्येक मोठी बाजार घटना, घसरणी, बुडबुडे, उन्माद यांचे मूळ गणितात नसून लोभ, भीती, अति आत्मविश्वास, कळप मानसिकता, अति उत्साह इत्यादी मानवी भावनेत आहेत. अहंकार लवकर नुकसान स्वीकारू देत नाही. बाजार अज्ञानाला नाही तर अहंकाराला अधिक शिक्षा करतो.

यशस्वी गुंतवणूकदार होण्यासाठी न्यूटन असण्याची गरज नाही. मानवी स्वभाव व स्वत:चा स्वभाव समजणे पुरेसे आहे, इत्यादी आणि दुसरे अनेक सुंदर मुद्दे त्यांनी सोप्या शब्दात समजावून सांगितले आहेत. असेच चांगले लेख तरुण भारताने प्रकाशित करावेत ही अपेक्षा.

**प्रा. सुरेश खेडकर**/९८२३२५५१८८

### अमेरिकेचा सार्वभौम देशावर हल्ला अन्यायकारक

'अमेरिकेचा व्हेनेझुएलावर हल्ला' ही बातमी वाचली याचबरोबर काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची लाईव्ह पत्रकार परिषदही ऐकली. गेली वीस-पंचवीस वर्षे लोकशाही मार्गाने सत्तेत असलेल्या एका सार्वभौम देशाच्या अध्यक्षाचे, सैन्य कारवाई करून, त्यांच्या पत्नीसह एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे, अपहरण करून त्यांना अमेरिकेत पळवून नेणे, ही अमेरिकेची जागतिक दादागिरी आहे. या कारवाईचे समर्थन करताना ट्रम्प आणि त्यांच्या प्याद्यांनी काल पत्रकार परिषदेत जी मखलाशी केली ती मनोरंजक होती. आपल्याच प्याद्यांकडून आपलीच आरती करून घेताना ट्रम्पची देहबोली बघण्यालायक होती. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष मादुरोंवर एकीकडे अमली पदार्थांच्या व्यापाराचे आरोप लावताना ट्रम्प यांनी, व्हेनेझुएलामध्ये लोकशाही मार्गाने सत्तांतर होत नाही तोपर्यंत व्हेनेझुएला आता अमेरिकेच्या नियंत्रणात राहणार असल्याचे सांगितले. व्हेनेझुएलामध्ये प्रचंड तेलसाठे आहेत आणि अमेरिकेचा त्यावर डोळा होताच. अमली पदार्थांच्या आरोपांआडून तेथील तेलसाठे लाटण्याचा ट्रम्पचा प्रयत्न आहे. तेथील तेलव्यापार आता अमेरिकेतील अनुभवी कंपन्या ताब्यात घेतील आणि अमेरिकेसाठी पैसा कमावतील, अशी घोषणाही कालच्या पत्रकार परिषदेत त्यांनी केली. यावरून जागतिक तेलबाजार ताब्यात घेण्यासाठी अमेरिका कासावीस झाली आहे, हे लक्षात येते. भारतावरही रशियाकडून तेल न घेण्यासाठी अमेरिकेने प्रचंड दबाव आणला होता. अर्थात आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या दबावाखाली आले नाहीत हा भाग वेगळा. पण अमेरिकेच्या या दादागिरीला जागतिक पातळीवर जेवढा विरोध व्हायला हवा तेवढा होत नाही, हे गंभीर आहे. रशिया, चीन, उत्तर कोरियासारखे काही देश सोडले तर इतर देश गप्प बसले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघ आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोग अमेरिकेच्या प्रभावाखाली काम करत असल्यामुळे त्यांच्या विरोधाला कोणी काडीचीही किंमत देणार नाही, हे उघड आहे. मात्र अमेरिकेच्या दादागिरीवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर याच तऱ्हेने अमेरिका जगातील अनेक देशांवर अशी वेळ आणू शकते.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

## महत्वाचे...



### महाराष्ट्र पोलिस वर्धापन दिन सोलापुरात साजरा

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या गौरवशाली परंपरेचे प्रतीक असलेला ६५ वा महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला. पोलीस आयुक्त सोलापूर शहर, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र केगांव व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १०, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १०, सोलापूर येथील कवायत मैदानावर पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात भव्य परेड संचलन व हर्ष फायर परेडने करण्यात आली. या परेडचे नेतृत्व परेड कमांडर समादेशक सहाय्यक महेश मते यांनी केले. परेडमध्ये सोलापूर शहर पोलीस, सोलापूर ग्रामीण पोलीस, पोलीस प्रशिक्षण केंद्र केगांव तसेच राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १० यांच्या तुकड्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमास डॉ. सुजीत मिश्रा, डीव्हिजनल रेल्वे मॅनेजर, सोलापूर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी एम. राजकुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, गोहर हसन, अश्विनी पाटील, विजय कबाडे (पोलीस उपायुक्त), मनिषा दुबाले, पोलीस अधीक्षक शस्त्र निरीक्षण शाखा पुणे उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दिपाली काळे यांनी आभार मानले.



### स.हि.ने प्रशालेचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेचे स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण झाले. प्रशालेच्या मैदानावर झालेल्या पारितोषिक वितरण सिनेमा व नाट्य अभिनेते अमीर तळवळकर यांच्या हस्ते झाले. संस्थेचे अध्यक्ष ॲड. पाडूरंग देशमुख, उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, संस्थेचे ज्येष्ठ सदस्य ॲड. रघुनाथ दामले, सदस्य प्रिती चिलजवार राहुल औरंगाबादकर, शिरीष कुलकर्णी, सुनील कुलकर्णी, ऋषिकेश कुलकर्णी विश्वस्त किशोर चंडक, पंचांगकर्ते मोहन दाते, किरण करकमकर, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी उपस्थित होते. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी प्रास्ताविक केले. स.हि.ने. प्रशालेच्या संगीत विषय शिक्षक संतोष कोथळीकर व विद्यार्थिनींनी गायलेल्या स्वागतगीताने व सुरेल ईशस्तवनाने कार्यक्रमात रंग भरला. नीता येरमाळकर यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला.विविध स्पर्धांमधे यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांचे यादी वाचन सुमित्रा भगत यांनी केले. यावेळी पुरस्कार प्राप्त संस्थेचे सन्माननीय पदाधिकारी, फिलाटॅलिक काँग्रेस ऑफ इंडियातर्फे फिलारत्न पुरस्कार प्राप्त किशोर चंडक यांचा सन्मान करण्यात आला. डेप्युटी जनरल मॅनेजर पदावर पदोन्नती झाल्याबद्दल सदस्य ऋषिकेश कुलकर्णी यांना सन्मानित करण्यात आले. आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, विज्ञान प्रमुख संगीता रेळेकर, सुमित्रा भगत व वीरेश अंगडी या शिक्षकांचा सन्मान प्रमुख अतिथींच्या हस्ते पुष्प देऊन करण्यात आला. सहशिक्षक दिलीप राठोड यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी केले.

# मातृभाषेवर प्रेम व आत्मविश्वास हीच यशाची खरी गुरुकिल्ली : ॲड. देशपांडे



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

''मातृभाषेवर नितांत प्रेम ठेवा, स्वतःला सतत अद्ययावत ठेवा आणि वाचनाशी मैत्री जपा. वक्तृत्व ही केवळ बोलण्याची नव्हे, तर विचार मांडण्याची आणि आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची कला आहे. काय बोलतो यापेक्षा ते कसे, किती प्रभावीपणे आणि किती आत्मविश्वासाने मांडतो, हे अधिक महत्त्वाचे ठरते,'' असे मौलिक विचार ज्येष्ठ विधिज्ञ, इतिहास-साहित्य-रंगभूमीचे अभ्यासक ॲड. आनंद रामचंद्र देशपांडे यांनी व्यक्त केले.

श्रद्धेय श्रीमान भाऊसाहेब गांधी स्मरणार्थ आयोजित राज्यस्तरीय महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेच्या २० व्या वर्षाच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. युवकांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात वक्तृत्वाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असून आत्मविश्वास, सातत्य आणि विचारांची स्पष्टता या गुणांमुळेच प्रभावी वक्ता घडतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

शिवचरित्रातील विविध प्रेरणादायी प्रसंगांचे संदर्भ देत ॲड. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये मूल्याधिष्ठित विचार, ध्येयवाद आणि स्वाभिमान निर्माण होण्याची गरज अधोरेखित केली. मातृभाषेतून व्यक्त होणारी ताकद हीच खरी ओळख असून ती आत्मसात केल्यास कोणतेही व्यासपीठ आपलेसे करता येते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी उपस्थित होते. यावेळी विश्वस्त श्री. भूषण शहा, श्री. वैभव गांधी, श्री. पराग शहा, प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे, डॉ. संतोष कोटी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यंदाची वक्तृत्व स्पर्धा ही श्रद्धेय भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आल्याने राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष म्हणजे यावर्षी एकूण २९१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला, ही या स्पर्धेच्या इतिहासातील उल्लेखनीय बाब ठरली आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्रद्धेय श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. दत्ता वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन कु. पूजा काटकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रीतम कोठारी यांनी मानले.

मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, धाराशिव आणि सोलापूर येथील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या वक्तृत्व स्पर्धेमुळे युवकांमध्ये विचार मांडणीची क्षमता, भाषिक आत्मविश्वास आणि सामाजिक भान अधिक दृढ होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.



## स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवावा : आ. सुभाष देशमुख

**किशोरींच्या सक्षमीकरणाचा प्रेरणादायी उत्सव मंद्रूपमध्ये उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

वाबळेवाडी शाळेसाराखी प्रत्येक शाळा गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी बनवावी. किशोरींनी शिक्षणात सातत्य ठेवावे, आत्मविश्वासाने पुढे जावे आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवावा, असे मौलिक संदेश आमदार सुभाषबापू देशमुख यांनी दिला.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा, मंद्रुप येथे तालुकास्तरीय ''किशोरी हितगुज मेळावा'' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शिक्षण विभाग, शाळा प्रशासन, शिक्षकवर्ग, विस्तार अधिकारी, मान्यवर आणि विद्यार्थिनी यांच्या एकत्रित सहभागातून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात गीत मंचाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या सुमधुर गीत गायनाने झाली. दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. त्यांच्या आगमनप्रसंगी लेझिम पथकाने पारंपरिक व शिस्तबद्ध सादरीकरण करत उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी देशभक्तीचे प्रतीक असणारे तिरंग्याच्या रंगाचे फुगे हवेत सोडून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याच वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सेल्फी पॉईंटचे उद्घाटन करण्यात आले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक गट शिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांनी केले. श्रीमती शेंडे यांनी आभार मानले.

## वंचित मुलांना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन; महिला सुरक्षा संघटनेचा उपक्रम




**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

महिला सुरक्षा संघटना शाखा सोलापूर जिल्हा यांच्यामार्फत परमेश्वर काळे यांच्या संस्कार संजीवनी फाउंडेशन संचलित वंचित मुलांचे आश्रमशाळा, हगलूर येथे सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यात आभाळमाया या वंचित मुलांच्या आश्रमातील मुला-मुलींना गुड टचबॅड टच, वैयक्तिक सुरक्षितता, सुरक्षेच्या दृष्टीने घ्यावयाच्या उपाययोजना, चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक १०९८, तसेच महिला हेल्पलाइन क्रमांक १८१ याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शीला हावळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. गजानन महाराज विद्यामंदिरच्या शिक्षिका संध्या सरवदे, महिला सुरक्षा संघटना अध्यक्ष, उत्तर सोलापूर यांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीत मदतीसाठी उपलब्ध असलेल्या हेल्पलाइन क्रमांकांची माहिती देत, कोणत्याही अडचणीत न घाबरता तात्काळ मदत घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या अरुणा काळे संचालिका, आश्रम शाळा यांनी महिला सुरक्षा संघटनेच्या सर्व सदस्यांचे आभार व्यक्त केले.



## आनंदी जीवनासाठी शारीरिक आरोग्य उत्तम असणे गरजेचे

**डॉ. प्रशांत दौंड; विजापूर रोड मध्यवर्ती मंडळाचा नूतन वर्षारंभी सत्कार**

### अथक परिश्रमाने यश

कोणतेही उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रयत्नात सातत्य असावे लागते जिद्द, चिकाटी बाळगावी लागते. मला मिळालेले यश हे अथक परिश्रमामुळे व माझ्या गुरुंनी दिलेल्या उत्तम मार्गदर्शनाने मिळाले आहे. मी ज्या मैदानावर इतर खेळाच्या सरावासाठी येते अशा सोलापूरच्या शासकीय मैदानावर विजापूर रोड मध्यवर्ती मंडळाने नूतन वर्षारंभी केलेला माझा सन्मान म्हणजे मला मिळालेली मोठी देणगी व ऊर्जा आहे व या मैदानावरील अनेक खेळाडू घडण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन.

**-संध्यांराणी बंडगर, सुवर्णकन्या टेनिसपटू**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

आनंदी जीवनासाठी शारीरिक आरोग्य उत्तम असणे गरजेचे आहे.तसेच चांगले मानसिक संतुलन,योग्य आर्थिक नियोजन व आपली सामाजिक प्रतिष्ठा याद्वारे आपण चांगले जीवन जगू शकतो व आपणास दवाखान्याकडे जाण्याची गरज भासणार नाही, असे प्रतिपादन डॉ. प्रशांत दौंड यांनी केले.

विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित नूतन वर्षआरंभ निमित्त शासकीय मैदान येथील खेळाडू व ज्येष्ठ नागरिक सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वसुंधरा महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास पांढरे हे होते. प्रिसिजन कंपनीचे जनसंपर्क अधिकारी माधवराव देशपांडे, प्रख्यात चित्रकार हेमंत कापूरे, मध्यवर्ती ट्रस्ट अध्यक्ष सुभाष चव्हाण आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मध्यवर्ती मंडळाचे संस्थापक सदस्य विजय शाबादी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सोलापूरच्या सुवर्ण कन्या टेनिसपटू संध्याराणी बंडगर, धावपटू पूजा राठोड, ज्येष्ठ नागरिक अजीज हिंगणीकर, सौ.व श्री. आसीन सय्यद, सिद्धेश्वर प्रशालेचे शिक्षक गुरुसिद्ध होर्तीकर मैदानावर खेळाडू घडविणारे कोच रवि राठोड, सूर्याजी लिंगडे आदींचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी बिळेनी बिराजदार यांनी प्रास्ताविक केले. स्वाती पुंजाळ यांनी खेळाडूंची माहिती दिली. कार्यक्रमात जिव्हाळा संस्थेचे राचोटी व दिनेश गुंड यांनीही मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमात शाबादी परिवारातर्फे ज्योती केगावकर यांनी संध्याराणी बंडगर यांचा सत्कार केला. कार्यक्रमास निवृत्त क्रीडाधिकारी सत्येन जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, शोभाश्री मल्टिस्टेटचे सेक्रेटरी किरण पुजारी, जॉगर्स ग्रुपचे संतोष कदम, सुरेखा गोब्बूर, मीना गायकवाड, उमा डोमनाळे, सुजाता आमणे, राजशेखर पाटील, माजी अध्यक्ष महेश देवकर, उमेश यळसंगी, शिवशरण चितली, ॲड. राजशेखर बिराजदार-पाटील, गंगाधर पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात जय जवान सैनिक स्कूलचे विद्यार्थी यांनी मानवंदना दिली. शेवटी मदन पोलके यांनी आभार मानले तर ट्रस्ट सचिव विश्वनाथ आमणे यांनी सूत्रसंचलन केले.

### नावात बदल

दोन्ही नावाची व्यक्ती एकच असले बाबत **गैबीसाब रुकमोद्दीन शेख** व **गैबीसाहेब रुकमोद्दीन शेख** हा व्यक्ती एकच आहे. मुक्काम पोस्ट कुंभारी, तालुका दक्षिण सोलापूर जिल्हा सोलापूर येथील रहिवासी आहे.

# विद्यापीठस्तरीय अविष्कार; १९ पारितोषिकांसह वालचंद अव्वल

**राज्यस्तरासाठी अनेक संशोधन प्रकल्पांची निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती रुजविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या विद्यापीठस्तरीय 'अविष्कार-२०२५' संशोधन महोत्सवात वालचंद शिक्षण समूहाने १९ पारितोषिकांची कमाई करत अव्वल स्थान पटकावले. पदवी, पदव्युत्तर, उच्च पदव्युत्तर (पी.एचडी.) अशा विविध स्तरांवर समूहातील विद्यार्थ्यांनी पोस्टर व पॉवरपॉईट सादरीकरणाच्या माध्यमातून उत्कृष्ट संशोधन मांडणी केली.

Avishkar

**वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे यश**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे आयोजित या महोत्सवात वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूरने पाच पारितोषिके पटकावत चार संशोधन प्रकल्प राज्यस्तरीय 'अविष्कार-२०२५' साठी पात्र ठरवले. पदव्युत्तर स्तरावर तीन प्रथम क्रमांक, तर पदवी स्तरावर दोन पारितोषिके मिळवून संस्थेने संशोधन क्षेत्रातील आपली भक्कम ओळख अधोरेखित केली. कृषी व पशुसंवर्धन विभागात शैलेश बिराजदार (मार्गदर्शक : डॉ. एस. एस. बनसोडे), वैद्यक व फार्मसी विभागात अक्षय विदाप (मार्गदर्शक : डॉ. भाग्येश देशमुख) आणि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात सुशांत हिरेमठ (मार्गदर्शक : डॉ. एस. बी. तुळजापूरकर) यांनी प्रथम क्रमांक पटकावले. पदवी स्तरावर शुद्ध विज्ञान विभागात आदित्य सलगर यांना द्वितीय, तर मानवविद्या, भाषा व ललित कला विभागात मोनिका गिडवाणी हिला तृतीय पारितोषिक मिळाले.

### वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाची सात पारितोषिकांची कमाई

वालचंद कला व शास्त्र महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकूण सात पारितोषिके मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. मानवविद्या व ललित कला (पदव्युत्तर) विभागात ज्योती आंबिगर (द्वितीय), वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा विभागात खुशी आगरवाल (प्रथम), मिसबाह मुजावर (द्वितीय) व सोनिया चौगुले (तृतीय) यांनी यश मिळवले. कृषी व पशुसंवर्धन (पी.एचडी.) विभागात अक्षय वाघमारे (द्वितीय), तर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागात आर्शिया शेख (प्रथम) व श्रेया वाघमारे (द्वितीय) यांनी पारितोषिके पटकावली.

### हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सची राज्यस्तरावर मुसंडी

विद्यापीठस्तरीय अविष्कार महोत्सवात सहभागी झालेल्या सहा विद्यार्थ्यांपैकी चार विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा प्रवर्गात साक्षी दंतकाळे (द्वितीय), मानवविद्या, भाषा व ललित कला प्रवर्गात मदिहा मुल्ला (प्रथम) व योगीनाथ माळी (द्वितीय), तर अभियांत्रिकी व तंत्रज्ञान प्रवर्गात आशिष धनवानी (प्रथम) यांनी यश मिळवले.

### कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे यश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित द्वितीय विद्यापीठस्तरीय अविष्कार २०२५-२६ मध्ये कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूरच्या तीन विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय अविष्कारसाठी निवड झाली. पीजी स्तरावर गौरी रोकडे (तृतीय), पीपीजी स्तरावर सुहास गुळवे (द्वितीय) तसेच वाणिज्य, व्यवस्थापन व कायदा विभागात सविता बिराजदार (द्वितीय) यांनी यश संपादन केले. या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त, तसेच प्राचार्य डॉ. विजय आठवले, प्राचार्य डॉ. संतोष कोटी, प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, प्राचार्य डॉ. अश्विन बोन्दार्डे, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. प्रितम कोठारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


### जाहीर प्रसिध्दीकरण

**जागा/जमीनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे**

तमाम लोकांस विशेषतः डि. धाराशिव सब. डि व ता. व पंचायत समिती परंडा पैकी ग्रामपंचायत मौजे मलकापूर हद्दीमधील व परंडा तालुक्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** डि. धाराशिव सब. डि व ता. व पंचायत समिती परंडा पैकी ग्रामपंचायत मौजे मलकापूर हद्दीतील गट नं. १३ चे एकून जमिनीचे क्षेत्रफळ ०० हे. ७५ आर. व याचा आकार १ रु. ३३ पैसे आहे. याबाबत खरेदीखताचा दस्त श्री. संकेत राजेंद्र गादिया यांनी आमचे अशिल सौ. अर्चना सौदागर यादव यांना दि. ०९/०३/२०२१ रोजी खरेदीखत दस्त क्र. ५०७/२०२१ हा रजिस्टर खरेदीखताचा दस्त लिहून, नोंदवून दिलेला होता. तसेच सदर रजिस्टर खरेदीखताचा दस्त आमचे अशिल यांच्याकडे होता. परंतु, सदरचा खरेदीखताचा दस्त आमचे अशिलाकडुन अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहे, तो अद्यापपर्यंत आढळून आलेले नाही.

तद्नंतर सदर मिळाकाती संधार्भाने मिळकतीच्या हस्तांतरणाचे कोणतेही व्यवहार केलेले नव्हते व नाहीत अथवा व्यवहाराबाबत कोणाकडूनही इसार म्हणून रक्कम देखील स्वीकारलेली नाही. तसेच सदर मिळकतीवर कोणत्याही बँकेकडून केज घेतलेले नाही.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीचा खरेदीदस्त मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये, सदरचे खरेदीखत दस्त मिळाल्यास खालील पत्यावर आणुन दयावेत. सदर दस्ताचे अनुषंगाने कुणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलांचे हक्कावर बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये, कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास या जाहीर प्रसिद्धीकारानापासून १५ दिवसाचे आत खालील पत्यावर लेखी कळवावे, कोणचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले. दि. ०४/०१/२०२६.

**अशिल सौ. अर्चना सौदागर यादव यांचे तर्फे**
**ॲड. सुप्रिया शेखर गुंडपाटील**
साई अम्बृशी नगर, परंडा रोड, बार्शी,
ता. बार्शी, जि. सोलापूर. मो. नं. ९८५०७८०१०५

### सर्वसामान्य जाहीर सूचना

या नोटीसीद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या परिशिष्टामधील मिळकत ही खाली नमूद केलेल्या मालकांच्या नावावर असून, सदर मिळकत ही **विक्री** (Sale) करण्याचा तसेच प्रस्तावित खरेदीदार **श्री. लक्ष्मण हणमंतु राचेटी** यांनी **जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा रेल्वे लाईन्स, सोलापूर** यांच्याकडे कर्जासाठी अर्ज केलेला आहे. सदर कर्जासाठी खाली नमूद केलेली मिळकत तारण (Mortgage) म्हणून ठेवण्याचा प्रस्ताव असून, आमच्या अशील बँकेने सदर कर्ज मंजूर करण्यास तयारी दर्शवलेली आहे.

सदर मिळकतीवर कोणतेही कायदेशीर अडथळे, तक्रारी, हक्कदावे, वारसाहक्क, गहाणखत, दानपत्र, भाडेपट्टा, करारनामा, मुखत्यारपत्र, खंड, 'लिन', बक्षीसपत्र अथवा अन्य कोणतेही स्वरूपाचे बंधन नसल्याचे तसेच सदर मिळकत निर्बंधरहित व निजोखमी स्वरूपाची असल्याचा विश्वास विद्यमान मालकांनी दिलेला आहे.

तरी कोणत्याही व्यक्तीस सदर मिळकतीवर हक्क, वारसा हक्क, हिस्सा, ताबा, हितसंबंध अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर दावा, हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **चौदा (१४) दिवसांच्या आत** खाली नमूद पत्त्यावर आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी.

जर वरील मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर मिळकत ही निर्बंध रहित व स्पष्ट मालकी हक्काची असल्याचे गृहीत धरून सदर मिळकतीची विक्री प्रक्रिया तसेच बँकेकडील तारण व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीचा किंवा दाव्याचा विचार केला जाणार नाही.

**मिळकतीचे वर्णन :** प्लॉट नं. ३४७ व ३४८, एकूण क्षेत्रफळ ५१२.११ चौ. मीटर, त्यापैकी उत्तर बाजूस असलेली जमीन - २२५.३६ चौ. मीटर, ''पिट्टा नगर'' येथे स्थित, नवीन सर्वे नं. ११५/2A व ११६/3A (जुना सर्वे नं. ११७ व ११८), मौजे कसबे सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर.

**मालकांची नावे :** १. श्री. सदानंद व्यंकटेश येमूल २. सौ. विद्या श्रीधर येमूल ३. श्री. मनीष श्रीधर येमूल ४. श्री. वर्धन श्रीधर येमूल. ५. सौ. पल्लवी कृष्णा येमूल, ६. श्री. प्रणव कृष्णा येमूल

**कर्जदार / प्रस्तावित खरेदीदाराचे नाव :**
**श्री. लक्ष्मण हणमंतु राचेटी**

**संपर्क :** ॲड. मिलिंद आडम
प्लॉट नं. २३, पद्मा नगर,
सोलापूर - ४१३००६
मो. ९८५०१६५७३१
(अशीलाच्या वतीने ॲडव्होकेट)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### रिंग तयार नसल्याने राष्ट्रीय वरिष्ठ मुष्टियुद्ध स्पर्धेला विलंब

**नोएडा** : रविवारपासून ग्रेटर नोएडा येथे भारताच्या वरिष्ठ राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेला सुरुवात होणार होती, परंतु ज्या दोन रिंगमध्ये सामने होणार होते, त्या तयारच झाल्या नव्हत्या. त्यामुळे स्पर्धा सुरु होण्याला काही तास उशीर झाला. दुपारच्या सत्रात ज्या खेळाडूंचे सामने नियोजित होते, ते मुष्टियोद्धे गौतम बुद्ध विद्यापीठात पोहोचल्यावर त्यांना केवळ मोकळी जागा दिसली. दुपारी २ वाजता नियोजित असलेले सामने अखेरीस सायंकाळी ६.३० च्या सुमारास सुरू झाले. सामान्यतः, कोणत्याही राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेच्या सुरुवातीच्या किमान एक दिवस आधी रिंग उभारल्या जातात. स्थळी घाईघाईने रिंग उभारल्या जात असताना खेळाडूंना थांबण्यास सांगण्यात आले. पहिल्या दिवशी पुरुषांच्या गटात ४२ आणि महिलांच्या गटात ३८ सामने होणार होते. तथापि, सुमारे चार तासांच्या विलंबामुळे, दिवसाच्या अखेरीस सर्व सामने पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. गत वर्षी याच ठिकाणी झालेल्या सब-ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धेतही असाच विलंब झाला होता.

### सिंड्रेला दास, दिव्यांशी भौमिकची विजयी सुरुवात

**वडोदरा** : गतविजेती सिंड्रेला दास, अव्वल मानांकित दिव्यांशी भौमिक आणि जपानच्या मिकू मात्सुशिमाने रविवारी येथील सामा इनडोअर क्रीडा संकुलात सुरू असलेल्या डब्ल्यूटीटी यूथ कंटेंडर २०२६ स्पर्धेत आपापल्या गटांमध्ये प्रभावी विजय मिळवून १९ वर्षांखालील मुलींच्या एकेरी मोहिमेची सुरुवात केली. भारतीय क्रीडा प्राधिकरण, गुजरातद्वारे सादर केलेल्या डब्ल्यूटीटी यूथ कंटेंडर वडोदरा २०२६ च्या दुसऱ्या आवृत्तीचे आयोजन टेबल टेनिस असोसिएशन ऑफ बडोदा करत आहे आणि यूटीटीद्वारे त्याची अंमलबजावणी केली जात आहे. यामध्ये ११ वर्षांखालील ते १९ वयोगटांमध्ये एकूण २२६ खेळाडू स्पर्धा करत आहेत. १७ वर्षांखालील गटाचे विजेतेपद पटकावलेल्या सिंड्रेलाने गट ३ मध्ये अर्चिस्मिता महातोचा ११-७, ११-७, ११-८ असा पराभव केला, तर दिव्यांशीने गट १ मध्ये श्रेष्ठा कोंथमचा ११-४, ११-३, ११-७ असा पराभव केला. गट २ मध्ये, मिकूने गुंजन कुमारवर ११-३, ११-६, ११-४ असा विजय मिळवून आपल्या मोहिमेची सुरुवात केली.

### डॅमियन मार्टिन कृत्रिम कोमातून बाहेर आला

**नवी दिल्ली** : ऑस्ट्रेलियाचा महान क्रिकेटपटू डॅमियन मार्टिन रविवारी कृत्रिम कोमातून बाहेर आला असून, मेनिनजायटीसचे निदान झाल्यानंतर तो बरा होत असताना त्याच्या प्रकृतीत सुधारणेची उत्साहवर्धक चिन्हे दिसत आहेत. ऑस्ट्रेलियाचे ६७ कसोटी सामन्यांमध्ये प्रतिनिधित्व करणारा मार्टिन बॉक्सिंग-डेच्या दिवशी आजारी पडला व गत महिन्याच्या अखेरीस त्याला गोल्ड कोस्ट येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला कृत्रिम कोमामध्ये ठेवण्यात आले होते. त्याची प्रकृती स्थिर होत असल्याने तो अजूनही वैद्यकीय देखरेखीखाली आहे. ५४ वर्षीय माजी फलंदाजाने उपचारांना विलक्षण प्रतिसाद दिला आहे आणि त्याला लवकरच आयसीयूबाहेर हलवले जाऊ शकते, असे मार्टिनचा जवळचा मित्र आणि ऑस्ट्रेलियाचा माजी यष्टिरक्षक अॅडम गिलख्रिस्टने सांगितले आहे. तो आता बोलू शकत आहे आणि उपचारांना प्रतिसाद देत आहे, असे त्याने सांगितले.

### सुमित नागलची सलामी लढत प्रज्वल देवशी

**बंगळुरू** : भारतीय अव्वल टेनिसपटू सुमित नागल आपल्या बंगळुरू ओपन एटीपी चॅलेंजर १२५ टेनिस मोहिमेची सुरुवात वाईल्ड कार्ड मिळालेल्या व स्थानिक खेळाडू एस.डी. प्रज्वल देवविरुद्ध करेल. शनिवारी झालेल्या ड्रॉ समारंभात हे देखील समोर आले की, २८ वर्षीय आणि जागतिक क्रमवारीत २७७ व्या क्रमांकावर असलेला नागल, अंतिम सोळाच्या फेरीत दुसऱ्या मानांकित फ्रान्सच्या हॅरोल्ड मेयोट (क्रमांक १६३) याचा सामना करू शकतो. आर्यन शाह कझाकिस्तानच्या बेबिट झुकायेवविरुद्ध सुरुवात करेल, तर थेट प्रवेश मिळवलेला तिसरा भारतीय खेळाडू करण सिंग हा क्रोएशियाच्या बोर्ना गोजोचा सामना करेल. अव्वल मानांकित स्पेनच्या पेड्रो मार्टिनेझला पात्रताधारी ब्रिटिश खेळाडू डॅन इव्हान्सने स्पर्धेतून माघार घेतली आहे. २०२१ च्या यूएस ओपनचा उपांत्यपूर्व फेरीतील खेळाडू लॉइड हॅरिस, झेक प्रजासत्ताकच्या जोनास फोरेटेकशी खेळेल. दक्षीणेश्वर सुरेश व मानस धामणे (५८८) अनुक्रमे क्रोएशियाच्या डुजे अजदुकोविच (३१९) आणि मातेज डोडीगविरुद्ध सामना करतील.

### निवृत्तीचा निर्णय मागे घेत टायगर फ्युरीचे पुनरागमन

**मॅन्चेस्टर** : टायसन फ्युरीने रविवारी निवृत्तीचा निर्णय मागे घेत लवकरच बॉक्सिंग रिंगमध्ये पुनराममन करण्याची घोषणा केली. माजी हेवीवेट विश्वविजेत्याने सोशल मीडियावर एका पोस्टद्वारे आपल्या पुनरागमनाची पुष्टी केली आहे. या घोषणेबरोबरच अॅन्थनी जोशुआसोबतच्या बहुप्रतिक्षित लढतीची शक्यता निर्माण झाली आहे. २०२६ हे ते वर्ष आहे. मॅकचे पुनरागमन असेल, असे फ्युरीने इंस्टाग्रामवर पोस्ट केले. काही काळ दूर होतो, पण आता परत आलो आहे, ३७ वर्षांचा आहे आणि अजूनही ठोसे मारत आहे.

# भारत ऑलिम्पिक आयोजनाच्या तयारीत : पंतप्रधान नरेंद्र मोदी

## ७२ व्या राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे थाटात उद्घाटन


आभासी माध्यमातून राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

**वाराणसी, ४ जानेवारी**

भारत २०२६ च्या ऑलिम्पिक खेळांचे आयोजन करण्यासाठी पूर्ण ताकदीने तयारी करत आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी येथे केले.

येथे आयोजित ७२ व्या राष्ट्रीय व्हॉलिबॉल अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संबोधित करीत होते.

गत दशकात १७ वर्षांखालील फिफा विश्वचषक, हॉकी विश्वचषक आणि प्रमुख बुद्धिबळ स्पर्धांसह २० हून अधिक प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धा विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात आल्या आहेत. २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा भारतात होणार आहेत. भारत २०२६ च्या ऑलिम्पिकचे आयोजन करण्यासाठी पूर्ण ताकदीने तयारी करत आहे, असे मोदी म्हणाले.


४ ते ११ जानेवारी दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ५८ संघांचे प्रतिनिधित्व करणारे १,००० हून अधिक खेळाडू सहभागी झाले आहेत.

या स्पर्धेत भारतीय व्हॉलिबॉलमधील उच्च दर्जाची स्पर्धा, खिलाडूवृत्ती आणि प्रतिभा पाहायला मिळेल अशी अपेक्षा आहे, असे एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

वाराणसीमध्ये राष्ट्रीय व्हॉलिबॉल स्पर्धेचे आयोजन करणे हे शहरातील क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर आणि अॅथलेटिक विकासाला चालना देण्यावर वाढत्या भर दर्शवते, असे त्यात म्हटले आहे.

हे शहर प्रमुख राष्ट्रीय कार्यक्रमांचे केंद्र म्हणून शहराची ओळख अधिक वाढवते, जे महत्त्वपूर्ण सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्याच्या त्याच्या वाढत्या भूमिकेशी सुसंगत आहे, असेही निवेदनात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटीलला नेमबाजी स्पर्धेत सुवर्ण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

भोपाळ येथे सुरू असलेल्या ६८वी राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत शनिवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानेश्वरी पाटील हिने एक सुवर्ण व कांस्य अशी दोन पदके पटकाविली. ज्ञानेश्वरीने १० मीटर एअर रायफल मध्ये सुवर्ण व ५० मीटर ३ पोझिशन मध्ये कांस्यपदकाचा कमाई केली.

ज्ञानेश्वरी ही येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन सोलापूर महाविद्यालयाची विद्यार्थीनी आहे. तिचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.प्रकाश महानवर, प्र. कुलुगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे. मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कलाश्री देशपांडे प्रा.नागनाथ पुदे. प्रा.विजय तरंगे, सुनील व अनिल राठोड यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरच्या नविना वडिशेरला, सानिध्य जमादार, वेदांत पांडेकर, साईराज गंभीरे यांना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त


नविना वडिशेरला | सानिध्य जमादार | वेदांत पांडेकर | साईराज गंभीरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

पुणे आणि सोलापूर येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय गुणांकन बुद्धिबळ स्पर्धेत सोलापूर चेस अकॅडमीच्या नविना भरत वडिशेरला, सानिध्य हेमराज जमादार, वेदांत सोमनाथ पांडेकर, साईराज अमर गंभीरे यांनी उल्लेखनीय कामगीरी करत आंतराष्ट्रीय गुणांकन मिळविण्यासाठी असणारा निकष पूर्ण करत क्लासिकल, रॅपिड व ब्लिट्झ अशा विविध प्रकारात आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले आहे.

हिराचंद नेमचंद कॉमर्स कॉलेजच्या नवीना वडिशेरला हिने पुणे येथे झालेल्या स्पर्धेत आकर्षक खेळ करत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त रुद्र अगरवाल याचा पराभव केला तर मानांकित शिवेंद्रसिंह शिंदे यांच्याशी बरोबर साधत ब्लिट्झ प्रकारात इलो १४५५ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले.

नेताजी सुभाष चंद्र बोस इंग्लिश मीडियम स्कूलच्या सानिध्य जमादार याने उत्कृष्टरीत्या खेळत मानांकित प्रेक्ष शहा, निखिल वानखेडेकर, किंशुक श्रीवास्तव, शौर्य मठपती, रियान बोरा, आरव सोम कुवर यांचा पराभव करत स्टँडर्ड प्रकारात इलो १५३४ आणि रॅपिड प्रकारात इलो १४७९ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले.

बार्शीच्या एम.आय. टी. व्ही. जी.एस. इंग्लिश मीडियम स्कूलच्या वेदांत पांडेकर याने सुरेख खेळ करत मानांकित वैष्णवी पाल हिचा पराभव केला व वैभव पारेकर याच्याशी बरोबरीत साधत रॅपिड प्रकारात इलो १४६२ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले.

सेंट जोसेफ स्कूल बार्शीचा साईराज गंभीरे याने देखील चमकदार कामगीरी करत मानांकित हिमांशू व्हनगावडे, आरुष तुपे, प्रज्वल कोरे यांचा पराभव करत रॅपिड प्रकारात इलो १५२३ आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त केले,

चॅम्प चेस स्कूलमध्ये शिकत असलेल्या खेळाडूंना त्यांच्या पालकांचे आणि शाळेचे प्रोत्साहन मिळत असुन त्यांना आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त उदय वगरे, भरत वडीशेरला, नितीन अग्रवाल तसेच आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक सुमुख गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळत आहे.

खेळाडूंनी संपादन केलेल्या उज्वल यशाबद्दल सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील, सोलापुर चेस अकॅडेमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी कौतुक करत अभिनंदन केले.

# बार्शीत आजपासून पुरुष गटाच्या राज्य कबड्डी स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ जानेवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे संस्थापक व संवर्धक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२३व्या जयंतीनिमित्त बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी येथे राज्य निमंत्रित पुरुष गट मॅटवरील कबड्डी स्पर्धा दि. ५ ते ७ जानेवारी या कालावधीत होणार असल्याची माहिती कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय करंडे यांनी दिली.

ही स्पर्धा बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशन, सोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली आहे. स्पर्धांचे आयोजन कर्मवीर क्रीडा संकुल बी. पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज येथे केली आहे. स्पर्धेतील प्रथम तीन संघास अनुक्रमे ३१,२१ व ११ हजार रुपये रोख बक्षीस व ट्रॉफी प्रदान येईल.

**स्पर्धेत भाग घेणारे आठ संघ**

जय भारत स्पोर्ट्स क्लब (मुंबई शहर), स्वस्तिक क्रीडा मंडळ (मुंबई उपनगर), छावा क्रीडा मंडळ (कोल्हापूर), जय मातृभूमी क्रीडा मंडळ (सांगली), शिवप्रतिष्ठान क्रीडा मंडळ (परांडा - धाराशिव), श्रीराम क्रीडा मंडळ (सोलापूर), श्री श्रीकृष्ण क्रीडा मंडळ (सोलापूर) आणि राकेश भाऊ घुले कबड्डी संघ (पुणे).



# अकलूज, बारामतीची विजयी सलामी; महाराष्ट्र डॉक्टर्स प्रीमियर लीग क्रिकेट

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. ४ जानेवारी-**

सीसीएमपी होमियोपॅथिक डॉक्टर्स असोसिएशन व मिशन आयुर्वेद या आयुष संघटनांच्या राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत बारामती, सातारा व अकलूज हे संघांनी विजयी सलामी दिली.

या स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीचे अध्यक्ष तथा महिला होमियोपॅथिक मेडिकल कॉलेज सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष डॉ.विलास हरपाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी या स्पर्धेतील पहिले बक्षीसही जाहीर केले. यावेळी शवआरोग्य सेना महाराष्ट्र राज्य प्रमुख डॉ. किशोर ठाणेकर, अकलूज पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नीरज उबाळे, सोलापूर जिल्हा होमियोपॅथिक डॉक्टर्स संघटनेचे उपाध्यक्ष डॉ.कालिदास लिमकर,केंद्रीय निमा संघटनेचे सदस्य डॉ तानाजी कदम, म्हसवडचे मा.नगराध्यक्ष डॉ.वसंत मसाळ,केंद्रीय निमा संघटनेचे सदस्य डॉ सुधीर पोफळे ,डॉ.विठ्ठल कवितके,डॉ. राहुल जवंजाळ, डॉ.सुहास राऊत आदी उपस्थित होते. आयोजन समितीचे प्रमुख डॉ.बाळकृष्ण गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. यावेळी द्वारकाधीश सेवाभावी संस्था आनंदनगरच्या वार्षिक दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. पाहुण्याचे स्वागत व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मिशन आयुर्वेदाचे अध्यक्ष डॉ.हर्षवर्धन गायकवाड, डॉ.अनिल बळते, डॉ.नागनाथ दगडे, डॉ. नितीन कुबेर, डॉ.फैज सय्यद, महिला क्रीडा विभाग प्रमुख डॉ.छाया दगडे, डॉ.अनिस शेख यांनी विशेष प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.प्रशांत निंबाळकर यांनी केले.

**शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी खेळ महत्वाचा**

मानसिक व शारीरिक स्वास्थ्य सुधारण्यासाठी खेळ महत्त्वाचा आहे. मी ७५ वर्षांचा असूनही आजही कबड्डी खेळत असल्याचे सांगत डॉक्टरानी आपल्या व्यस्त वेळापत्रकात बदल करून कोणताही खेळ खेळल्यास आरोग्य चांगले राहते असा मूलमंत्र डॉ. विलास हरपाळे यांनी दिला.

# टेंभुर्णी येथे सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्याची ग्रामपंचायतीकडे मागणी



तभा वृत्तसेवा
टेंभुर्णी, दि. ४ जानेवारी-

माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथील भिमा पाटबंधारे विभागाच्या (कुर्डूवाडी रोड इरिगेशन कॉलनी) जागेवर सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्यात यावे, अशी मागणी डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन औदुंबर देशमुख यांनी टेंभुर्णी ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी डी.व्ही.पी. बँकेचे चेअरमन व माजी अध्यक्ष, माढा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (श.प.), टेंभुर्णी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव विलास देशमुख, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य सुधीर पाटील, गणेश खुळे आदी उपस्थित होते.

टेंभुर्णी गावात युवकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असून कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल तसेच इतर मैदानी खेळांविषयी युवकांमध्ये विशेष रुची आहे. सुसज्ज क्रीडा संकुल उपलब्ध झाल्यास युवकांचा सर्वांगीण विकास होईल, त्यांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवणे शक्य होईल तसेच आरोग्यदृष्ट्याही लाभ होईल. याशिवाय जिल्हा व राज्यस्तरीय खेळाडू घडवण्याची संधी निर्माण होऊन गावाच्या नावलौकिकात भर पडेल. भिमा पाटबंधारे विभागाकडे कुर्डूवाडी रोड इरिगेशन कॉलनी परिसरात अंदाजे १५ एकर जागा शिल्लक असून या जागेवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उजनी नगर (टेंभुर्णी) यांच्यासाठी आवश्यक इमारत व क्रीडांगण उभारता येऊ शकते.

उर्वरित जागेवर टेंभुर्णीतील खेळाडूंसाठी आधुनिक क्रीडा संकुल उभारणे शक्य आहे, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच सदर जागा सोलापूरपुणे रोड व कुर्डूवाडी रोड या दोन प्रमुख रस्त्यांच्या लगत असल्याने येथे व्यापारी संकुल उभारण्याची मोठी संधी आहे.

ज्या पद्धतीने सार्वजनिक रुग्णालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली, त्याच धर्तीवर क्रीडा संकुल, उजनी नगर शाळा व व्यापारी संकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत २६ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या ग्रामसभेत ठराव मंजूर करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदर निवेदन ग्राम विकास अधिकारी, टेंभुर्णी यांना देण्यात आले आहे.

# महाराष्ट्राचे वाघ आणि रणरागिणींची अंतिम सामन्याकडे कूच!

## ४४ वी कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा



**बेंगळुरू, दि. ४ जानेवारी-**

गुंजूरच्या मैदानावर खो-खोचा अक्षरशः महासंग्राम रंगला आणि त्यात मराठी ताकदीचा डंका पुन्हा एकदा वाजला! भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने व कर्नाटक खो-खो असोसिएशनच्या यजमानपदाखाली आयोजित ४४ वी कुमारमुली (ज्युनिअर) राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा (२०२५२६) आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. उपांत्य फेरीतील थरारक लढतींमध्ये मुलांच्या गटात महाराष्ट्र व यजमान कर्नाटक, तर मुलींच्या गटात महाराष्ट्र व ओडिशा या संघांनी प्रतिस्पर्ध्यांना नामोहरम करत दिमाखात अंतिम फेरी गाठली. चपळाई, ताकद, डावपेच आणि जिद्दीचे अद्भुत दर्शन घडवत या सामन्यांनी क्रीडाप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फेडले असून, आता संपूर्ण देशाचे लक्ष महाअंतिम सामन्यांकडे लागले आहे.

**महाराष्ट्राची पंजाबवर 'डावाने' मात**

मुलींच्या उपांत्य फेरीत महाराष्ट्र विरुद्ध पंजाब हा सामना एकतर्फी ठरला. मध्यंतराला २६८ अशी भक्कम आघाडी घेत महाराष्ट्राने अखेर २८१४ असा १४ गुण आणि एक डाव राखून विजय मिळवला. महाराष्ट्राकडून स्नेहा लामकाणे (१.५० मि. संरक्षण, ८ गुण) हिने आक्रमक खेळ करत चमक दाखवली; श्रावणी तामखाडे (३.२० मि. संरक्षण), धनश्री कंक (३ मि. नाबाद संरक्षण, २ गुण), सानिका चाफे (३ मि. संरक्षण, २ गुण) आणि श्वेता नवले (२ मि. संरक्षण, २ गुण) यांनी विजयात मोलाची भर घातली. पंजाबकडून जसदीप कौर (१.२० मि. संरक्षण, ४ गुण), गुड्डी (२ मि.) व प्रीती (१.१५ मि. संरक्षण) यांनी प्रयत्न केले; मात्र ते अपुरे ठरले.

**महाराष्ट्र कोल्हापूर अटीतटीची लढत**

मुलांच्या उपांत्य सामन्यात महाराष्ट्र विरुद्ध कोल्हापूर हा सामना प्रेक्षकांच्या श्वास रोखून धरणारा ठरला. मध्यंतराला कोल्हापूर १७१६ असा एका गुणाने पुढे होता; मात्र उत्तरार्धात महाराष्ट्राने जोरदार मुसंडी मारत ३३३१ असा २ गुणांनी विजय खेचून आणला. महाराष्ट्राकडून जितेंद्र वसावे (२.२० मि. संरक्षण, ६ गुण), राज जाधव (१ मि., १.४० मि. संरक्षण, ६ गुण), सोत्या वळवी (१.४० व १.१० मि. संरक्षण, ४ गुण) आणि आशिष गौतम (१.४० मि. संरक्षण, २ गुण) यांनी निर्णायक भूमिका बजावली. कोल्हापूरकडून शरद घाटगे (१.४० व १.३० मि. संरक्षण, ८ गुण), उदय पडळकर (१.२० मि. संरक्षण, ४ गुण) व श्रावण वाडेकर (२ मि., १.१० मि. संरक्षण, २ गुण) यांनी झुंजार लढत दिली; मात्र नशीब महाराष्ट्राच्या बाजूने राहिले.

**ओडिशाची कोल्हापूरवर निसटती मात**

मुलींच्या दुसऱ्या उपांत्य फेरीत ओडिशाने कोल्हापूरवर २९२७ अशी २ गुणांनी निसटती मात करत अंतिम फेरी गाठली. अखेरच्या क्षणापर्यंत रंगलेल्या या सामन्यात ओडिशाने ४० सेकंद शिल्लक राखत विजय निश्चित केला. ओडिशाकडून अर्चना प्रधान (२.३० व २ मि. संरक्षण, २ गुण), सुभाश्री (१.१० मि. संरक्षण, ६ गुण), लीसाराणी आर (१.३० व १.४० मि. संरक्षण), देबस्मिता दास (१ मि., १.५० मि. संरक्षण, ४ गुण) आणि के. रम्या (१.१० मि. संरक्षण, ६ गुण) यांनी चमकदार कामगिरी केली. कोल्हापूरकडून श्रावणी पाटील (१.२० व १.३० मि. संरक्षण, ४ गुण), अमृता पाटील (१.३० व १ मि. संरक्षण, ८ गुण), चैत्राली वाडेकर (१.३० व १ मि. संरक्षण, ४ गुण) आणि सई सावंत (१.५० व २ मि. संरक्षण) यांनी जोरदार प्रतिकार केला.

**घरच्या मैदानावर कर्नाटकचा दबदबा**

मुलांच्या उपांत्य फेरीत यजमान कर्नाटकने मध्य भारत संघाचा ३३२० असा १३ गुण आणि एक डाव राखून पराभव केला. मध्यंतराला कर्नाटक ३११० अशी मोठी आघाडी घेऊन पुढे होते. कर्नाटककडून अनिकेत (२.१० व ३.५० मि. संरक्षण, २ गुण), योगेश पवार (२.३० मि. संरक्षण, ६ गुण), विजय बी. (३ मि. संरक्षण, २ गुण), तसेच मल्लिकार्जुन व इब्राहिम (प्रत्येकी ४ गुण) यांनी विजय साकारला. मध्य भारताकडून चैतन्य इंगोले व आदर्श वानखेडे (प्रत्येकी ४ गुण), तर ईशांत करोसिया (१.५० मि. संरक्षण) यांनी प्रयत्न केले; मात्र ते अपुरे ठरले.

**महाअंतिम लढतीसाठी महाराष्ट्र सज्ज!**

**कुमार** : महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक
**मुली** : महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा

## महत्वाचे...



### जिल्हा मेळाव्यात महाराष्ट्र विद्यालयाचे यश

**बार्शी दि. ४ जानेवारी-**

सोलापूर भारत स्काऊट गाईड यांच्यावतीने कर्मवीर विद्यालय चारे या ठिकाणी जिल्हा स्काऊट गाईड मेळावा संपन्न झाला. या जिल्हा मेळाव्यामध्ये विविध स्पर्धा पार पडल्या. यामध्ये तंबू सजावट, बिनभांड्याचा स्वयंपाक, शेकोटी कार्यक्रम, शोभायात्रा, सेल्फी पॉईंट, शारीरिक प्रात्यक्षिक, संचलन, रांगोळी, चित्रकला व वेशभूषा इ. वरील सर्व स्पर्धेमध्ये महाराष्ट्र विद्यालय बार्शीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन पुढीलप्रमाणे यश संपादन केले. वेशभूषा स्पर्धा स्काऊट प्रथम क्रमांक सोहम राऊत, वेशभूषा स्पर्धा गाईड तृतीय क्रमांक प्रतीक्षा आवारी, पोस्ट कार्ड स्पर्धा तृतीय क्रमांक शिवांजली खराडे. तसेच विद्यार्थ्यांनी सर्व स्पर्धेमध्ये उत्कृष्ट सहभाग नोंदवला. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडाशिक्षक स्काऊट मास्टर योगेश उपळकर, गाईड कॅप्टन व्ही.पी. चौधरी, एस.व्ही. वाघमारे यांचे म ार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व स्काऊट गाईडचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय.यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव तथा शाळा समितीचे अध्यक्ष पी.टी. पाटील, सहसचिव तथा शाळा समितीचे सदस्य ए.पी. देबडवार, खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य डॉ. मिराताई यादव, एस.बी. शेळवणे, सर्व कार्यकारिणी सदस्य, सर्व संस्था सदस्य, विद्यालयाच्या प्राचार्या के.डी. धावणे, उपमुख्याध्यापक आर.बी.सपताळे, पर्यवेक्षिका एन.बी.साठे, पर्यवेक्षक के. जी. मदने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



### पोलीस रायझिंग डे निमित्त वाहतूक व्यवस्थापन व जनजागृती

**वळसंग,दि. ४ जानेवारी -**

पोलीस रायझिंग डेच्या निमित्ताने वळसंग पोलीस ठाणे हद्दीत वाहतुकीचे सुरळीत व्यवस्थापन राखणे तसेच रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने विशेष जनजागृती व नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्यात आल्या. याअंतर्गत कुंभारी येथील टोल नाका तसेच वळसंग येथील टोल नाका व वळसंग गावांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट सामन्यांच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती लक्षात घेऊन वाहतुकीचे योग्य नियोजन करण्यात आले. सदर ठिकाणी वाहतूक कोंडी होऊ नये, अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या बाबींवर नियंत्रण राहावे तसेच वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, यासाठी उपस्थित जनसमुदायास पोलीस कर्मचाऱ्यांमार्फत सविस्तर मार्गदर्शन सहायक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे यांच्याकडून करण्यात आले. वाहन चालविताना हेल्मेट व सीटबेल्टचा वापर, वेगमर्यादेचे पालन, मद्यपान करून वाहन न चालविणे, दुचाकीवर त्रिसीट प्रवास टाळणे तसेच सार्वजनिक ठिकाणी वाहतूक शिस्त पाळण्याबाबत जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला. तसेच पोलीस बँड पथक द्वारे देखील मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात आली. सदर संपूर्ण कार्यक्रमादरम्यान वळसंग पोलीस ठाणे कडील अधिकारी व अंमलदार उपस्थित राहून वाहतुकीचे प्रभावी नियंत्रण ठेवण्यात आले. राबविण्यात आलेल्या या उपाययोजनांमुळे वाहतूक सुरळीत राहिली असून कोणतीही अनुचित घटना घडलेली नाही. पोलीस विभागामार्फत भविष्यातही नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व अपघातमुक्त वाहतूक व्यवस्थेसाठी अशा प्रकारच्या जनजागृती व नियंत्रणात्मक मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार आहेत असे माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक, वळसंग पोलीस ठाणे यांनी दिले.

### स्व. शोभाताई सोपल प्रशाला सावित्रीबाई फुले जयंती साजरी

पांगरी-स्व. शोभाताई सोपल इंग्लिश स्कूल पांगरी येथे साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्याअध्यक्षस्थानी सौ आश्रिवनी गरड होत्या. प्रमुख पाहुण्या सौ भाग्यश्री पुकळे होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्री फुले च्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले . त्या नंतर भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. त्या मध्ये ३८ विद्यार्थ्यांनी सहभग नोंदवला. या मध्ये प्रथम क्रमांक दीक्षा प्रवीण पाटील . हिने मी सावित्री बोलते ही एकांकिका सादर केली. द्वितीय क्रमांक ईश्वरी जगदाळे हिने मिळवला.तृतीय क्रमांक नेत्रा चौधरी हिने मिळवला. वकृत्व सोर्धे मध्ये. राजवर्धन देशमुख याने शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.या प्रसंगी बाल दिनाचे महत्त्व कथन केले. कार्यक्रमचे सूत्र संचालन चव्हाण मॅडम यांनी केले. आभार प्रदर्शन गावठी मॅडम यांनी केले.

## निधन वृत्त...

### ज्ञानू करडे



**पिलीव,दि. ४ जानेवारी**

पिलीव येथील होलार समाजाचे ज्येष्ठ नागरिक व सनई वादक ज्ञानू सोमा करडे (वय-७४) यांचे शुक्रवार दि.१ जानेवारी रोजी पहाटेच्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले.

ज्ञानू करडे हे प्रसिद्ध सनई वादक होते त्यांनी अनेक ठिकाणी गजी ढोल स्पर्धेत भाग घेऊन बक्षीस मिळवले होते. शिखर शिंगणापूर येथील कार्यक्रमांत बक्षीस मिळवले होते. त्यांना पिलीव मधून शिंगणापूर येथे जाणाऱ्या गावच्या कावडीला पायी वाजवत नेण्याचा मान होता. त्यांच्या जाण्यामुळे होलार समाजातील एक ज्येष्ठ कलावंत हरपला अशी हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या मागे पत्नी,मुलगी,पुतणे, सुना,नातवंडे असा परिवार आहे.

ज्ञानू करडे हे काळमवाडी गावच्या माजी सरपंच धोंडाबाई करडे यांचे पती तसेच महावितरणचे कर्मचारी सतिश पारसे यांचे मामा होते.






# ‘स्वरसुधा’ आयोजित राजयोग धूरी यांच्या गायनाने पंढरपूरकर कला रसिक मंत्रमुग्ध

## कला, संगीत, साहित्य, हीच खरी शहराची श्रीमंती आणि ओळख असते : माजी आमदार प्रशांत परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जानेवारी -**

श्री क्षेत्र पंढरपूर येथील सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्यासाठी आणि आदरणीय सुधाकरपंत परिचारक यांच्या स्मृतींच्या आठवणी प्रित्यर्थ नवीन वर्षाच्या स्वागतासाठी महाराष्ट्रातील छोटे उस्ताद मी होणार सुपरस्टार फेम राजयोग धूरी यांच्या गायनाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रास्ताविकात एस.पी.कुलकर्णी यांनी नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची सांस्कृतिक परंपरा, चळवळ आधी होती तीच पुढे सुरू राहावी या उद्देशाने पुन्हा सुरू करत आहोत. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, युटोपियन शुगर्सचे अध्यक्ष उमेश परिचारक, राजयोग धूरी, प्रवीण बानकर, माधव कुलकर्णी,ज्ञानेश्वर दुधाणे, डॉ.प्रसाद कुलकर्णी यांचे हस्ते (कै.) सुधाकरपंत परिचारकांच्या प्रतिमेचे पूजन होऊन दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर राजयोग धूरी यांच्या सुरेल गायनाला सुरुवात करत शास्त्रीय संगीतातील मुरलीधर श्याम या बंदिशीचे सुरुवात करत अनेक संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या अभंग रचना सादर करत त्यामध्ये माझे माहेर पंढरी, राजस सुकुमार मदनाचा पुतळा, वृंदावनी वेणू, माझे जीवन गाणे, ऐसी लागी लगन, घेई छंद मकरंद आणि शेवटी कानडा राजा पंढरीचा या अभंगांने स्वर तरंग कार्यक्रमाची सांगता करत सर्व उपस्थित कला रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमात त्यांना तितकीच सुंदर साथसंगत निवेदन अभय नलगे, हार्मोनियम प्रवीण बानकर,तबला प्रसाद करंबेळकर, पखवाज प्रथमेश तारळकर,सिंथेसाईजर ज्ञानयोग धूरी टाळ यश खाडे आदींनी करत कार्यक्रमाला रंगत आणली.यावेळी आभार ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मानले. कार्यक्रमास पंढरपूर आणि पंचक्रोशीतील कलासाधक आणि कलारसिकांनी मोठ्या संख्येने गर्दी करत उदंड प्रतिसाद दिला.

**साहित्य संस्कृती जपण्यासाठी प्रयत्न करुयात**

यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी मनोगतात कला साहित्य संस्कृती आहे. यावरुन शहराची श्रीमंती समजते आणि सातत्याने कार्यरत राहत ही संस्कृती जपण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करुयात असे सांगितले.

### जामगावमध्ये शेतातून पानबुडी मोटारीची चोरी

**बार्शी, दि.४ जानेवारी-**

तालुक्यातील जामगांव येथील विजय विठ्ठल राऊत यांच्या शेतातील एम टेक कंपनीची १० अश्वशक्तीची ३० हजार रुपये किम तीची विहिरीतील पानबुडी मोटार चोरीस गेली आहे. ही घटना शनिवारी दि. ३ रोजी घडली. याबाबत राऊत यांच्या शेतातील मजूर पिंटू एडके (वय ४५, रा. बार्शी) यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

# शेतकऱ्याकडे १ लाखाची खंडणी मागणाऱ्या ७ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.४ जानेवारी**

खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवून एका शेतकऱ्याकडे एक लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करुन, त्यातील दहा हजार रुपये स्वीकारल्याची धक्कादायक घटना बार्शी तालुक्यातील ताडसौंदणे येथे उघडकीस आली. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात दोन महिलांसह सातजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दत्तात्रय सुरेश पाटील (वय ३८, रा. ताडसौंदणे, ता. बार्शी) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ही घटना ६ डिसेंबर ते २४ डिसेंबर २०२५ या काळात घडली. आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी दत्तात्रय पाटील यांना प्रत्यक्ष भेटून आणि फोनवरुन शिवीगाळ व दमदाटी केली.

तुझ्यावर आणि तुझ्या घरच्यांवर बलात्कार, विनयभंग आणि प्राणघातक हल्ल्याचे खोटे गुन्हे दाखल करुन तुम्हाला जेलमध्ये सडवू, अशी धमकी आरोपींनी दिली. यावेळी फिर्यादी पाटील यांनी आरोपींना सांगितले की, माझा आणि माझा भाऊ विकास यांचा काहीही संबंध नसून तो वेगळा राहतो. मात्र, आरोपींनी हे ऐकून न घेता, जर तुला हा त्रास वाचवायचा असेल आणि केसेसमध्ये नाव येऊ द्यायचे नसेल, तर एक लाख रुपये द्यावे लागतील, अशी मागणी केली. भीतीपोटी फिर्यादीने तडजोड केली असता, आरोपींपैकी राणी विकास पाटील आणि वनिता सुभाष थिटे यांनी १० हजार रुपये स्वीकारले. सततच्या ब्लॅकमेलिंगला कंटाळून अखेर पाटील यांनी पोलिसांत धाव घेतली. गुन्हा दाखल झालेले आरोपी असे : १)गणेश अंनता जाधव (रा. शेटफळ, ता. मोहोळ) २) राणी विकास पाटील, ३) बाबुराव उर्फ माधवराव छगन साळुंके, ४) रतन सुभाष थिटे, ५) वनिता सुभाष थिटे, ६) सुभाष विठ्ठल थिटे, ७) पल्लवी बाबुराव साळुंके (सर्व रा. सध्या लिंबोणी बाग, तांबरी विभाग, धाराशिव). गुन्ह्यात वापरलेली रिक्षा (एमएच२५ के १९३४) देखील पोलिसांनी नमूद केली आहे. या घटनेची नोंद बार्शी तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वळसणे करत आहेत.



# मंद्रुपच्या यात्रेत यंदा प्रथमच कृषी व पशू प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.४ जानेवारी-**

मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील ग्रामदैवत श्री मळसिध्द यात्रेनिमित्त दि.१३, १४ आणि १५ जानेवारी दरम्यान प्रथमच तीन दिवसीय जिल्हास्तरीय कृषी आणि पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या प्रदर्शनामध्ये नामवंत कृषी कंपन्या सहभागी होणार असून यासाठी भव्य मंडप उभारण्याच्या कामास सुरुवात झाली.

यावेळी मैदानाचे पूजन श्री मळसिध्द देवस्थानचे गदगीचे पुजारी गेनसिध्द पुजारी तसेच श्री मळसिध्द देवस्थान ट्रस्ट व यात्रा कमिटीचे अध्यक्ष ॲड. राजेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंच कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख म्हणाले, दरवर्षी १२ ते १६ जानेवारी असे पाच दिवस मळसिध्द यात्रा संपन्न होते. पाच दिवस विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. यावर्षीपासून श्री मळसिध्द यात्रेनिमित्त तीन दिवस शेतकरी बांधवांसाठी कृषी प्रदर्शनाचे तसेच अक्षता सोहळ्याच्या दिवशी लक्ष दीपोत्सव सोहळ्याचे आयोजन केले आहे.प्रदर्शन पाहण्यासाठी येणा-या नागरिक आणि शेतकरी बांधवांची मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी करून औषधोपचार करण्यात येणार आहेत. प्रदर्शनाचे उदघाटन विविध राजकीय म ान्यवर, शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले. यावेळी यात्रा कमिटीचे अध्यक्ष ॲड. राजेश देशमुख, माजी सभापती गुरुसिद्ध म्हेत्रे, तम ण्णा पुजारी, बाळासाहेब देशमुख, सुनील व्हनमाने, बिळेणसिध्द सुंटे, राधाकृष्ण गोसावी, रवीशंकर म्हेत्रे, अनंत म्हेत्रे, चंद्रकांत देशमुख, बाबुशा शेंडगे, सुरेश टेळे, अविनाश देशमुख, सोमनिंग पुजारी, बनसिध्द पुजारी, बिळेणी पुजारी, शिवानंद पुजारी, अनिकेत पाटील, सिकंदर आवटे आदी उपस्थित होते.

### जिल्हा परिषदेत १२ जानेवारीला होणार जिजाऊ-सावित्रींच्या लेकींचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ४-**

मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखेच्या वतीने राजमाता जिजाऊ जयंती निमीत्त दि.१२ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहात मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिजाऊ-सावित्रींच्या लेकिंचा कर्तृत्ववान महिला म्हणून सन्मान करण्यात येणार असल्याची माहीती अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी दिली.

यामध्ये मालती कोहिणकर, उषा जगताप, छाया पाटील, वनमाला भुजबळ, माया जाधव, मंगला मिरकले, कल्पना वाकडे, सुदामती जगताप, प्रभावती नवले, नंदाबाई हावळे, कलावती धनशेट्टी, बायडाबाई कवितके, सविता कदम, वनिता जमदाडे, चंद्रभागा पांढरे, कुसूम कुलकर्णी, लियाकत शेख, सुनिता राऊत यांचा सन्मान करण्यात येणार आहे. सकाळी १०वा रक्तदान शिबीर होणार आहे. यावेळी अनिल जगताप, सचिन साळुंखे, सुर्यकांत मोहिते, सुहास चेळेकर, आप्पासाहेब भोसल, सचिन चव्हाण, चेतन भोसले, विकास भांगे, रोहीत घुले, रणजित गव्हाणे. संतोष शिंदे, अनिल पाटील, वासुदेव घाडगे, सुधाकर माने-देशमुख, विशाल घोगरे, अभिजीत निचळ, संतोष सातपुते, भूषण काळे, उमेश खंडागळे, प्रकाश शेंडगे, मनोज साठे, गोपाल शिंदे, संजय पाटील, रविंद्र शेंडगे, महेंद्र माने, सुभाष तनमोर, शशि साळुंखे, विठ्ठल मलपे, त्रषिकेष जाधव, जयंत पाटील आदी उपस्थित होते.

### वळसंगच्या खुनाचा उलगडा; आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग,दि.४ जानेवारी -**

वळसंग पोलीस ठाणे हद्दीत खुनाची गंभीर घटना घडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले.

मयताचा मृतदेह तात्काळ शासकीय रुग्णालयात रवाना करून फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या सहाय्याने पंचनामा करण्यात आला. तांत्रिक व प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली. सदर गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या पाच तासांच्या आत अटक केली. या कारवाईदरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता परिस्थिती अतिशय संवेदनशील व संयमित पद्धतीने हाताळली. वळसंग पोलीस ठाण्याच्या या कामगिरीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे करीत आहेत.



### नरखेडच्या पाटील विद्यालयाचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**नरखेड, दि.४ जानेवारी-**

नरखेड (ता.मोहोळ) येथील कै. शहाजीराव पाटील विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष अरविंद पाटील यांच्या हस्ते झाले. माजी प्राचार्य मोहन मोटे अध्यक्षपदी होते. विविध कला गुण दर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भारुड, नाट्यछटा, कॉकटेल, कोळी गीत, विविध प्रकारचे लोकगीत, नाटक, लावणी, स्टेज गीत, मूक नाट्य अशा विविध कलागुणांचा आविष्कार इयत्ता पाचवी ते बारावीतील विद्यार्थ्यांनी करून दाखविला. यावेळी शिवाजीराव पाटील,अण्णासाहेब पाटील, बाळासाहेब मेंडगुळे, आनंद पाटील, पोलीस कॉन्स्टेबल धनाजी घोरपडे, पांडुरंग काळे, दिलीप मोटे, हनुमंत पवार, जगनाथ बनसोडे, मुख्याध्यापक मधुकर मोटे, बाळासाहेब मोटे, सर्व जिल्हा परिषद, माध्यमिक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ग्रामस्थ महिला पालक वर्ग, मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन अशोक धोत्रे यांनी केले. मधुकर मोटे यांनी आभार मानले.



# ‘स्वेरी’मध्ये आजपासून ५३ वे जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शन

**१३२ उपकरणांची होणार मांडणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.४ जानेवारी-**

राज्य विज्ञान संस्था नागपूर व जिल्हा परिषद सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने ५३ वे जिल्हास्तरीय बालवैज्ञानिक प्रदर्शनाचे आयोजन दि. ५ व ६ जानेवारी रोजी श्री विठ्ठल एज्युकेशन व रिसर्च इन्टिट्यूट (स्वेरी) गोपाळपूर, पंढरपूर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

प्रदर्शनाचे उदघाटन ५ जानेवारी रोजी सोलापूर जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी, स्मिता पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वेरीज कॅम्पस, पंढरपूरचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे भूषविणार आहेत. प्रमुख उपस्थिती मध्ये जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, स्वेरीज कॅम्पस पंढरपूरचे सचिव डॉ. सुरज रोंगे, कॅम्पस इनचार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसळ, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, प्रकाश नांगरे, माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी सुरेश वाघमारे, शिक्षण निरीक्षक अनिल बनसोडे, गटशिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, विस्तार अधिकारी विष्णू चव्हाण आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत अशी माहिती महाराष्ट्र राज्य विज्ञान अध्यापक महामंडळाचे संचालक तथा समन्वयक लक्ष्मीप्रसाद मोहिते, सह समन्वयक जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळाचे अध्यक्ष संजय जवंजाळ, सह समन्वयक गणित मंडळाचे संजय भस्मे, तालुका अध्यक्ष गणेश लटके, परीक्षा प्रमुख विश्वास नागणे यांनी दिली. या प्रदर्शनात सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून सर्व पुरस्कार प्राप्त झालेले प्रकल्प मांडले जाणार आहेत. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे एकूण १३२ विज्ञान व गणित उपकरणाची मांडणी करण्यात येणार आहे. विज्ञानप्रेमींनी प्रदर्शनास भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

SVERI

**मंगळवारी पारितोषिक वितरण समारंभ**

या प्रदर्शनाचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी (दि.६) दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला आहे. याप्रसंगी सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा प्रशिक्षण संस्था, वेळापूरचे प्राचार्य डॉ. इब्राहिम नदाफ, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप, योजनाचे शिक्षणाधिकारी सुलभा वठारे, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे डॉ.बी.पी.रोंगे, डॉ.एम.एम.पवार, माध्यमि क विभागाचे उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे आदी उपस्थित राहणार आहेत.

## महत्वाचे...

### मराठी भाषेतील योगदान या विषयावर राज्यस्तरीय लेख स्पर्धा

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**



मुंबई मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत कामगार नेते वसंतराव होशिंग स्मृती राज्यस्तरीय लेख स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माझ्या बोलीभाषेची महानता आणि मराठी भाषेतील योगदान असा लेख स्पर्धेचा विषय आहे, असे स्पर्धा प्रमुख सुनील कवरे यांनी कळविले आहे. शब्दसंख्या १५०० आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांनी स्व-बोलीभाषेचा अधिकाधिक वापर करुन मराठी साहित्य, चित्रपट, नाट्यकलाकृतीतील योगदानाचा सविस्तर आढावा अपेक्षित आहे. लेख सुवाच्च अक्षरात लिहून किंवा देवनागरी फॉन्टमध्ये टाईप करून ९१६७३६४८७० किंवा jagalyanchalokjagar@gmail.com यावर ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

### तारासिंह राठोड यांना मानद डॉक्टरेट पदवी

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**



येथील उद्योजक व परफेक्ट कोटचे मालक तारासिंह शिवलाल राठोड यांना बंजारा इंटरनॅशनल कल्चरल ॲन्ड एंटरटेनमेंटकडून मानद डॉक्टरेट पदवी व बंजारा इंटरनॅशनल सोशल ॲवार्ड देऊन गौरविण्यात आले. शारजा (दुबई) येथील सफारी मॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. राठोड हे सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे माजी चेअरमन व सोलापूर इंडस्ट्रीयल असोसिएशनचे संचालक आहेत.

### मोबाईल चोरीप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोबाईल चोरीची घटना घडली असून याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.२५ सप्टेंबर रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजण्याच्या सुमारास ओम इलेक्ट्रिक दुकानासमोर, सोलापूर येथे ही घटना घडली. माणिक हेमंत म्यातरोलु (वय-३२, रा.प्रकाश बापुजी हौसिंग सोसायटी, सोलापूर) हे आपल्या मित्रासोबत कामानिमित्त सदर ठिकाणी गेले होते. त्याठिकाणी गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या खिशातील १५ हजार रुपये किंमतीचा विवो वाय-३३ टी, गोल्डन रंगाचा मोबाईल लंपास केला, असे फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद दि. १ जानेवारी २०२६ रोजी रात्री १०.२८ वाजता करण्यात आली. पुढील तपास सहाय्यक फौजदार नदाफ हे करीत आहेत.

### 'हिट ॲन्ड रन'प्रकरणी रिक्षा चालकाविरुध गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

सलगरवस्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत हिट अँड रनची घटना घडली असून, रिक्षाच्या धडकेत दुचाकीवरील दोन तरुण गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी अज्ञात रिक्षा चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास बीएम आयटी कॉलेजसमोर, सोलापूर येथे घडली. चैतन्य आनंद केशपागा (वय २१, राहणार मोदीखाना, सोलापूर) हे त्यांचे मित्र अस्फर शेख यांच्यासह दुचाकी क्रमांक एमएच १३ ईझेड ०१५४ वरून घरी परत जात होते. यावेळी रिक्षा क्रमांक एमएच १३ सीटी २५२९ च्या अज्ञात चालकाने आपली रिक्षा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत दुचाकीस समोरून जोराची धडक दिली. या अपघातात चैतन्य केशपागा व अस्फर शेख हे दोघेही गंभीर जखमी झाले असून, दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अपघातानंतर रिक्षा चालकाने घटनास्थळावरून पळ काढला. याप्रकरणी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात अज्ञात रिक्षा चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार वाल्मिकी हे करत आहेत.

### कोंडा नगरमध्ये भक्तगणांच्या हस्ते नंदीध्वजाची पूजा

**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**



अक्कलकोट रोड परिसरातील कोंडा नगर येथे श्रीसिध्देश्वर यात्रेतील दोन नंबरच्या नंदीध्वजाची पूजा भक्तगणांच्या हस्ते करण्यात आली यावेळी पद्मशाली समाज सेवानिवृत्ती संघाचे उपाध्यक्ष तथा जांबमुनी विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक अनिल कन्ना, अनंत अंजिखाने, लक्ष्मीकांत दंडी, उमापती मिठ्ठापल्ली, देविदास मेरगु, दशरथ इंदापुरे, सत्यनारायण बरदेपूर, श्रीनिवास वल्लाकाटी, बाबा गोप, अविनाश संगा, बेनगिरी, चिप्पा, अलवाल आदींची प्रमुख उपस्थिती होती.

शाकंभरी पौर्णिमानिमित्त विविध मंदिरात धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल होती. अनेक देवी मंदिरात विविध शाक्य भाज्यांनी 'श्री'स अलंकृत करण्यात आले होते. याअनुषंगाने कोंडा नगर येथे नंदीध्वज पूजनाचे आयोजन करण्यात आल्याचे संयोजकांनी सांगितले.

# केंद्र अन् राज्य सरकारने सोलापुरात विकासाची गंगा आणली

- 'भाजपा'च्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचे प्रतिपादन
- महापालिका निवडणूक : मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्र आणि राज्य सरकारने सोलापुरात विकासाची गंगा आणल्याने शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. आयटी पार्क, विमानसेवा, पाणीपुरवठा करण्यासाठी दुहेरी पाईपलाईन, उड्डाणपुले, दाही दिशांचा रस्ते विकास झाला आहे, असे प्रतिपादन 'भाजपा'च्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी केले.

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सारस्वत मंगल कार्यालय येथील मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर 'भाजपा'चे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, प्रा.मोहिनी पत्की, शहर उपाध्यक्ष अंबादास बिंगी, ॲड.साधना संगवे, सरचिटणीस सुधा अळ्ळीमोरे, 'भाजयुमो'चे शहराध्यक्ष विजय कुलथे, श्रीनिवास दायमा उपस्थित होते.



#### आज प्रदेशाध्यक्ष चव्हाण तर मुख्यमंत्री शनिवारी सोलापुरात

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या प्रचारार्थ भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दि.५ जानेवारी रोजी जामगुंडी मंगल कार्यालय येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि.१० जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत, या दोन्ही नेत्यांच्या दौऱ्याच्या अनुषंगाने जय्यत तयारी झाली आहे. भाजपाचे सर्व उमेदवार आपापल्या प्रभागात प्रचाराला लागले आहेत, असे सांगण्यात आले.

गोवा आणि मुंबई येथे विमानसेवा सुरु झाली आहे, भविष्यात तिरुपती, बेंगलोर, हैदराबाद आदी ठिकाणीही विमानसेवा कार्यान्वित होणार आहे. सोलापूरसाठी आयटी पार्कला मंजुरी मिळाली असून, त्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे. निवडणुका पार पडताच आयटी पार्कचे काम सुरु करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

स्मार्ट सिटी प्रकल्पातून शहरात अनेक विकासात्मक कामे झाली आहेत. शहराला जोडणाऱ्या विविध महामार्गांची निर्मिती झाली आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि स्थानिक आमदारांनीही गतीने विकासाची कामे सुरु केली आहेत. सोलापूर महापालिका निवडणुकीतील 'भाजपा'च्या उमेदवारांना विजयी करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

'भाजपा'चे ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, प्रा.मोहिनी पत्की यांनीही मनोगत व्यक्त केले. नागेश सरगम यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी चन्नवीर चिट्टे, शिवानंद पाटील, राम तडवळकर, बजरंग कुलकर्णी, अक्षय अंजिखाने, सागर अतनुरे, श्रीहरी म्याकल, आनंद बिर्रु, रामेश्वरी बिर्रु यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

#### पालकमंत्र्यांना निघाले तातडीचे काम

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन व वचननाम्याचे प्रकाशन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र, तातडीने काम निघाल्याने पालकमंत्री गोरे शहरातून मार्गस्थ झाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला अवघ्या ५ तासांत अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी -**




वळसंग पोलीस ठाणे हद्दीत खुनाची गंभीर घटना घडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. घटनास्थळी पोहोचताच पोलिसांनी घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती घेत घटनास्थळ संरक्षित केले.

मयताचा मृतदेह तात्काळ शासकीय रुग्णालयात रवाना करून फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या सहाय्याने पंचनामा करण्यात आला. प्राथमिक तपासादरम्यान मिळालेल्या तांत्रिक व प्रत्यक्ष पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवली.सदर गुन्ह्यातील आरोपींना अवघ्या पाच तासांच्या आत अटक करण्यात आली. या संपूर्ण कारवाईदरम्यान कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ न देता परिस्थिती अतिशय संवेदनशील व संयमित पद्धतीने हाताळण्यात आली. वळसंग पोलीस ठाण्याच्या या तत्पर, कार्यक्षम कामगिरीमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे करीत आहेत.

## जीवाला धोका तरीपण निवडणूक लढवणार

**शितल गायकवाड यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

भारतीय जनता पार्टीकडे उमेदवारीची मागणी केली होती. परंतु तिकीट वाटपात आपल्यावर अन्याय झाला आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ मधून अपक्ष म्हणून उतरलो आहे. माझ्या जीविताला धोका आहे. तरीपण ही निवडणूक लढविणार आणि जिंकणार, असे शितल गायकवाड यांनी सांगितले.

आमदार सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १८ वर्षापासून मी भाजपाचे काम केले आहे. प्रभाग क्रमांक २२ मधून उमेदवारी मागितली होती. परंतु न्यायप्रविष्ट असलेल्या एका प्रकरणात माझ्यावर गुन्हा दाखल करण्याविषयी गलिच्छ राजकारण खेळले जात आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी जोत्स्ना उबाळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



## भाजपा उमेदवारांनी प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचवावीत पक्षाची ध्येयधोरणे : पालकमंत्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी प्रत्येक मतदारांपर्यंत भाजपाची ध्येय धोरणे संपर्काच्या माध्यमातून पोहोचवावीत, असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

महापालिका निवडणुकीसंदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शनिवारी हॉटेल बालाजी सरोवर येथे उमेदवारांच्या बैठक घेऊन चर्चा केली. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी आमदार दिलीप माने, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस मनीष देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री जयकुमार गोरे पुढे म्हणाले, भारतीय जनता पार्टी पूर्ण ताकदीने सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक लढवत आहे. भाजपाने राज्यात आणि केंद्रात केलेल्या विकासकामांची तसेच धुळमुक्त सोलापूर, पाणी पुरवठ्यासाठी ८९२ कोटी रुपये, विमानसेवा, आयटी पार्क, लाडकी बहीण योजना अशा विकासकामांची माहिती नागरिकांना भेटून द्यावी. केंद्रात, राज्यात सत्ता असल्याने सोलापूरला भरघोस निधी देता येईल. राज्य तसेच केंद्राच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्वतंत्र गट तयार करावेत. सोशल मीडियावर अधिकाधिक सक्रिय रहावे. मतदार यादीतील प्रत्येक मतदारापर्यंत उमेदवार आणि भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पोहचावे.

भाजपाचे पश्चिम महाराष्ट्र संघटनमंत्री मकरंद देशपांडे यांनी बूथरचना, संपर्क, हिशोब प्रचार आदी विषयात नेटके कार्य कसे करावे आदींविषयीची माहिती विशद केली. सोलापूर महानगरपालिकेची यंदाची निवडणूक ही भाजपासाठी प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी लागणारी सर्व तांत्रिक प्रक्रिया उमेदवारांनी पूर्ण करावी. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी शहरवासीयांनी भाजपच्या पाठीशी रहावे यासाठी उमेदवारांनी प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला भाविकांकडून ५१ हजारांची देणगी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

सुस, पुणे येथील भाविक कुलेश गणेशराव देशमुख हे आज सहकुटुंब श्री क्षेत्र तुळजापूर येथे आले होते.

सकाळच्या सुमारास त्यांनी कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवींचे श्रद्धेने दर्शन घेतले. दर्शनानंतर देशमुख कुटुंबियांनी श्री तुळजाभवानी देवींच्या चरणी आपली भक्ती व्यक्त करत श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानला देणगी स्वरूपात ५१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

देशमुख कुटुंबीयांच्या या धार्मिक आणि सेवाभावी भावनेचा सन्मान म्हणून मंदिर संस्थानच्या वतीने कुलेश देशमुख व त्यांच्या पत्नीचा यथोचित सन्मान करण्यात आला. य ावेळी त्यांना श्री तुळजाभवानी देवींची प्रतिमा व महावस्त्र भेट देण्यात आले. मंदिर संस्थानने देशमुख दांपत्याचे आभार मानत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक राजकुम ार भोसले, नागेश शितोळे तसेच मंदिर संस्थानचे इतर कर्मचारी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



### सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त धाराशिव प्रशालेत बाल आनंद मेळा

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती संचालित धाराशिव प्रशालेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी बाल आनंद मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळ्यात विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांची विक्री करत खऱ्या कमाईचा अनुभव घेतला. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे मुख्याध्यापक पी.एस. जाधव, प्रमुख अतिथी भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवकार्याविषयी आपले विचार मांडले. आभारप्रदर्शन शिक्षक चव्हाण यांनी केले. कार्यक्रमास धाराशिव प्रशाला व याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक विद्यामंदिरचे शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आनंद मेळावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्य पदार्थाची विक्री करून 'खरी कमाई' चा अनुभव घेतला.

### धाराशिवच्या केदार सूर्यवंशीची राष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

येथील केदार गुलाब सूर्यवंशी याची राष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तो सांजा गाव येथील



प्रगतशील शेतकरी गुलाब सूर्यवंशी यांचा सुपुत्र असून सध्या धाराशिव येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात शिक्षण घेत आहे. छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या हॉलीबॉल संघाचे प्रशिक्षक संजय उर्फ दादा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली केदार सूर्यवंशी याची प्रथम राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली होती. ही राज्यस्तरीय स्पर्धा अकोला येथे पार पडल्यानंतर केदारने उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. ही राष्ट्रीय स्पर्धा हिमाचल प्रदेशातील सिमुर येथे दि.४ ते ९ जानेवारी या कालावधीत होणार आहे. यावेळी क्रीडा प्रशिक्षक संजय उर्फ दादा पाटील यांच्या हस्ते केदारचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास खेळाडू, शिक्षक, पालक व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### इटकळ येथे जि.प. शाळेत सावित्रीमाई फुले जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**इटकळ, दि.४ जानेवारी -**

इटकळ येथे शनिवार, दि.३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत भारतातील पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका, स्त्री मुक्तीदात्या क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेतील विद्यार्थिनी-सावित्रीमाईंच्या लेकींच्या हस्ते सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यानंतर विद्यार्थिनींनी सावित्रीमाईंच्या कार्यावर आधारित भाषणे सादर केली. तसेच नाट्यीकरण, नृत्य व अभिनयाच्या माध्यमातून 'लेक वाचवा-लेक शिकवा' या अभियानाची प्रभावी मांडणी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील प्रतिसावित्री पवार, माने, पुदाले, इंगळे व भोसले यांनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन इंगळे यांनी केले. याप्रसंगी एकनाथ नैताम, सतिश साखरे, सतिश ढोणे तसेच महिला पालकवर्ग उपस्थित होता.



### महारुद्र बाप्पा मोटे विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**वाशी, दि.४ जानेवारी -**

कै. महारुद्र बाप्पा मोटे विद्यालय पारडी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करून बालक दिन साजरा केला. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर पाच सावित्रीने अतिशय उत्तम चरणी भाषणे केली. वंचित विकास जाणीव संघटनेच्या वतीने त्यांना बक्षीस म्हणून चारशे रुपये प्रमाणे दिवाळी अंक पाच जणांना देण्यात आला. यानंतर मुख्याध्यापक मिलिंद कारंडे यांनी लगाडे यांचा सत्कार केला. दोनशे ते सव्वा दोनशे मुलं, मुली उपस्थित होते.

# 'मिनी मंत्रालयात' प्रवेशासाठी इच्छुकांची कसरत

### निष्ठेला संधी, की आयुष्यभर उलचालयची सतरंजी?...

### धाराशिव जिल्ह्यात राजकीय हालचालींना वेग !...

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांची धावपळ वाढली आहे. 'मिनी मंत्रालय' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांना केवळ जनाधार नव्हे, तर पक्षांतर्गत अनेक पातळ्यांवर कसरत करावी लागत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.



तालुका पातळीपासून जिल्हा आणि राज्य पातळीपर्यंत संपर्क, बैठका, शिष्टमंडळे आणि शिफारशींचे राजकारण जोर धरू लागले आहे. उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांना स्थानिक नेते, आम दार, खासदार तसेच पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घ्याव्या लागत आहेत. या प्रक्रियेत अनेक निष्ठावंत कार्यकर्ते संभ्रमात सापडले असून, जनतेत काम करायचे की वरिष्ठांची मर्जी सांभाळायची, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गाव पातळीपासून शहरापर्यंत पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी झटणारे कार्यकर्ते प्रचार, सभा, आंदोलन आणि निवडणूक व्यवस्थापनात सक्रिय असतात. मात्र उमेदवारी जाहीर करताना अनेकदा बाहेरून आलेले नेते, आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवार किंवा स्थानिक समीकरणे लक्षात घेऊन निर्णय घेतले जात असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे.

निवडणुकीच्या वेळी पक्षासाठी झेंडे उचलायचे आणि विजयानंतर मात्र बाजूला राहायचे, अशी खंत अनेक कार्यकर्ते व्यक्त करत आहेत. विशेषतः जिल्हा परिषद व पंचायत समिती या 'मिनी मंत्रालयां'मध्ये मोठ्या निधीचा कारभार असल्याने उमेदवारीला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. परिणामी उमेदवारीसाठी आर्थिक ताकद, सामाजिक सम ीकरणे आणि राजकीय वजन यांचा मोठ्या प्रमाणावर विचार होत असल्याची चर्चा आहे. यामुळे दीर्घकाळ पक्षासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलले जात असल्याची भावना बळावत आहे.



धाराशिव जिल्ह्यातील निवडणुकांत विजयासाठी केवळ समीकरणे नव्हे तर कार्यकर्त्यांचा विश्वास टिकवणेही तितकेच म हत्त्वाचे ठरणार आहे. पक्षीय वरिष्ठ नेत्यांसमोर इच्छुकांची नाराजी कशी हाताळायची, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. चुकीच्या निर्णयामुळे बंडखोरी वाढू नये आणि संघटना विस्कळीत होऊ नये, यासाठी वरिष्ठ पातळीवर तडजोडीचा मार्ग शोधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारीवरून मोठी कोंडी निर्माण झाली आहे. एका जागेसाठी अनेक इच्छुक असल्याने पक्ष नेतृत्वासमोर कठीण निर्णयाचे आव्हान उभे राहिले आहे. पक्ष नेतृत्वाकडून मात्र निष्ठावंत आणि पक्षवाढीसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल, असा दावा केला जात आहे. मात्र प्रत्यक्ष उमेदवारी यादी जाहीर झाल्यानंतरच हे स्पष्ट होणार आहे.

पक्षनिष्ठा जपून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना यावेळी संधी मिळणार की नेहमीप्रमाणे फक्त आश्वासनांवरच समाधान मानावे लागणार, हा प्रश्न चर्चेत आहे. काही नेते सत्ताधाऱ्यांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करत असताना, काहींमध्ये नाराजीही दबक्या आवाजात व्यक्त होत आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, 'मिनी मंत्रालयां'मध्ये प्रवेशासाठीची ही कसरत आगामी निवडणुकांत पक्षांचे अंतर्गत चित्र स्पष्ट करणारी ठरणार आहे. जनाधार आणि निष्ठा यांना किती महत्त्व दिले जाते, यावरच पक्षांची संघटनात्मक ताकद भविष्यात ठरणार आहे.

निष्ठावंत, सक्रिय आणि जिंकण्याची क्षमता असलेल्या कार्यकर्त्यांना प्राधान्य दिले जाईल, असे आश्वासन दिले जात असले तरी अंतिम उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतरच चित्र स्पष्ट होणार आहे. पक्षीय वरिष्ठ नेत्यांसाठी ही निवडणूक केवळ मतांची नव्हे, तर संघटन टिकवण्याचीही कसोटी ठरणार आहे.

## नूतन प्राथमिक विद्यामंदिरमध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

नूतन प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथे भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व समाजक्रांतीच्या अग्रदूत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाच्या सरचिटणीस प्रेमाताई पाटील उपस्थित होत्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रदीपकुमार गोरे, सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फ ुले तसेच विविध थोर व्यक्तींच्या वेशभूषेत सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्म विश्वास, सर्जनशीलता व सामाजिक जाणीव निर्माण झाल्याचे दिसून आले.

## उमरगा (चि.) येथे एक कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.४ जानेवारी -**

तुळजापूर तालुक्यातील उमरगा (चि.) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून विविध विकासकाम ांचे भूमिपूजन करण्यात आले. हा कार्यक्रम धाराशिव जिल्हा परिषदच्या माजी उपाध्यक्षा सौ. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते पार पडला.

यावेळी सुमारे एक कोटी रुपयांहून अधिक निधीतून होणाऱ्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.



यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकामासाठी ६० लाख रुपये, गावांतर्गत सिमेंट रस्त्यासाठी ८ लाख, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शौचालयासाठी ६ लाख, ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी २० लाख, सार्वजनिक सभागृहासाठी १० लाख तसेच गावांतर्गत पथदिवे बसविण्यासाठी १५ लाख रुपये अशा विविध विकासकामांचा समावेश आहे.

या सर्व विकासकामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात आले.

कार्यक्रमास सरपंच सर्वेश्वर पाटील, महादेव वडजे, लक्ष्मी चाफे, रोहिणी सावंत, अभिमन्यू वडजे, विवेक सावंत यांच्यासह वेंकट सावंत, बाळकृष्ण वडजे, रब्बानी ईनामदार, जनार्दन बोराडे, गणपत बनसोडे, ज्ञानेश्वर वडजे, धनाजी सावंत, ज्ञानदेव सावंत, वसंत घोडके तसेच गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

## मसला (खु) येथे ५३ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून मसला (खुर्द) येथे एकूण रु. ५३ लाख निधीतून विविध विकासकाम ांचे भूमिपूजन व लोकार्पण जिल्हा परिषदेच्या माजी उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या कार्यास विनम्र अभिवादन करण्यात आले. शिक्षण व सामाजिक सम तेचा संदेश देणाऱ्या या पवित्र दिनी विकासकामांना प्रारंभ होणे ही अभिमानाची बाब असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

गावातील शैक्षणिक सुविधा अधिक बळकट करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेत रु. २५ लाख खर्चून उभारण्यात आलेल्या दोन नवीन वर्गखोल्यांचे लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सुसज्ज व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळणार आहे.

तसेच गावाच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी रु.२८ लाखांच्या सिमेंट रस्त्यांच्या काम ांचे भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये भीमनगर (रु.८ लक्ष), रम ाई नगर (रु.५ लक्ष), अण्णाभाऊ साठे नगर (रु.१० लक्ष) व सावित्रीबाई फुले नगर (रु.५ लक्ष) या ठिकाणच्या रस्त्यांचा समावेश आहे. या रस्त्यांमुळे ग्रामस्थांना सुरक्षित व सोयीस्कर दळणवळणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

यावेळी रामेश्वर वैद्य, निशिगंधा पाटील, उमेश पाटील, युवराज शिंदे, दयानंद शिंदे, मेघराज बागल, नवनाथ कदम, अनिल शिंदे, सुदर्शन जाधव, हरिभाऊ काळदाते, प्रवीण दळवी, सुनील घोडके, शरद खराडे, श्रीराम खराडे, भाग्यश्री खराडे, ज्योतीताई बेले, उज्वला इंगळे, मंगल सुतार यांच्यासह जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक-शिक्षिका, पालकवर्ग, प्रम ुख कार्यकर्ते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## खंडोबा यात्रेत महिला भाविकांसाठी मोफत स्नानगृह; नगरसेवकांच्या उपक्रमाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.४ जानेवारी -**

नळदुर्ग येथील श्रीक्षेत्र मैलारपूर येथे सुरू असलेल्या श्री खंडोबा यात्रेत आलेल्या महिला भाविकांची उघड्यावर स्नान करताना होणारी गैरसोय दूर करण्यासाठी नगरसेवक आकाश कुलकर्णी व नगरसेविका अपर्णा बेडगे यांच्या वतीने बोरी घाटाशेजारी फक्त महिलांसाठी मोफत स्नानगृह उभारण्यात आले. या उपक्रमामुळे यंदा प्रथमच महिला भाविकांना सुरक्षित व सन्मानपूर्वक स्नानाची सुविधा मिळाली असून सर्व स्तरांतून या कार्याचे कौतुक होत आहे.

खंडोबा यात्रेसाठी लाखो भाविक मैलारपूरात दाखल होतात. परंपरेनुसार दर्शनापूर्वी बोरी नदीच्या घाटावर स्नान केले जाते. मात्र, उघड्यावर स्नान करावे लागत असल्याने म हिलांना दरवर्षी अडचणींचा सामना




करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन नगरसेवक आकाश कुलकर्णी, नगरसेविका अपर्णा अरविंद बेडगे व अशोक जगदाळे मित्रपरिवार यांच्या संकल्पनेतून यंदा महिलांसाठी स्वतंत्र स्नानगृहाची सोय करण्यात आली.

यावेळी अमित शेंडगे, विकास भोसले, शिवराज भुमकर, प्रविण चव्हाण, उदय भुमकर, अंबादास पवार, अप्पी स्वामी, अप्पु रामदासी आदी उपस्थित होते. नगरसेवक आकाश कुलकर्णी, नगरसेविका अपर्णा बेडगे व अशोक जगदाळे यांचे नागरिकांनी मनापासून कौतुक केले आहे.

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत तुळजापूर (खुर्द) शाळेला १ लाखांचे बक्षीस

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक ३, तुळजापूर (खुर्द) या शाळेच्या स्वच्छता, डिजिटल वर्ग, विद्यार्थ्यांची गुणवत्ता तसेच राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची दखल घेत २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत शाळेला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

गटशिक्षणाधिकारी यांच्या पथकाने शाळेची तपासणी करून, व्हिडिओ शूटिंगद्वारे स्पर्धेतील वस्तुनिष्ठ व पारदर्शक मूल्यांकन केल्यानंतर हा पुरस्कार घोषित करण्यात आला होता. सदर बक्षिसाचा धनादेश मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेला प्रदान करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा स्पर्धेत मिळालेल्या रु. १ लाखांच्या धनादेशाचे वितरण नगराध्यक्ष




व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी नगराध्यक्ष विनोद गंगणे, पंडितराव जगदाळे, विशाल रोचकरी, मंजुषा देशमाने, विजय कंदले, औदुंबर कदम, सरोजा अमृतराव, लखन पेंदे, सागर कदम, श्वेता साळुंके, ज्योती सावंत, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदेवे, बाबासाहेब अंकुशे, मुख्याध्यापक तुकाराम मोटे, गणेश रोचकरी, किरण सुरवसे, नानासाहेब भोजने आदी मान्यवर उपस्थित होते.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात 'अविनाशपासष्टी' गझल लेखन व वाचन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

येथील रामकृष्ण परमहंस म हाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने गझल लेखन व वाचन कार्यशाळा उपक्रम ांतर्गत महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गझलकार डॉ. अविनाश सांगोलकर यांचा 'अविनाशपासष्टी' हा कार्यक्रम दि.३० डिसेंबर रोजी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतपर प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी असे नाविन्यपूर्ण उपक्रम विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे सांगितले. मराठी विभागाच्या वतीने सातत्याने राबविण्यात येणाऱ्या साहित्यविषयक उपक्रमांमुळे अनेक विद्यार्थी उत्तम लेखन करू लागले असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास विद्यार्थी साहित्याच्या



क्षेत्रात निश्चितच नावलौकिक मिळवतील, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. अविनाश सांगोलकर यांनी अविनाशपासष्टी या कार्यक्रमाच्या निमि त्ताने मत मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात मराठी विभागाचे विभागप्रम ुख प्रा. राजा जगताप यांनी गझल हा आत्मनिष्ठ लेखनप्रकार असून स्वतःला व्यक्त करण्यासाठी हा प्रकार समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले.

मराठीमध्ये अनेक नामवंत गझलकार होऊन गेले असून त्यांनी विविध विषयांना न्याय देणाऱ्या महत्त्वपूर्ण गझला लिहिल्या आहेत.

त्यामुळे विद्यार्थ्यांनी सतत वाचन करून आपल्या अभिव्यक्तीचा विकास करावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला नॅक समन्वयक प्रा. डॉ. मंगेश भोसले, प्रा. सुवर्णा गेंगजे, प्रा. एस. आर. जाधव यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. वैशाली बोबडे यांनी केले.

# जिल्हास्तरीय मॅरेथॉन स्पर्धेत निलंग्याचा राठोड पहिला

**तभा वृत्तसेवा**

**औसा दि. ४ जानेवारी :** शिक्षकांचे आरोग्य तंदुरुस्त राहवे. यासाठी शिक्षक पतसंस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षा निमित्त लातूर जिल्ह्यातील इ. १ ते १२ पर्यंतच्या जिल्हा परिषद शाळा, खाजगी शाळा, माध्यमिक शाळा, आश्रम शाळा, अनुदानित शाळा, विनाअनुदानित शाळा, स्वयं अर्थ सहाय्य शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यासाठी औसा येथे रविवार दि. ४ रोजी सकाळी ७ वा. मरेथान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये ३१२ शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तर या स्पर्थेत निलंगा तालुक्यातील केळगाव येथील माध्यमिक आश्रम शाळेतील बालाजी राठोडने पाच किलोमीटरचे अंतर २२मि. ५सेकंदात पुर्ण करुन विजेतेपद पटकावले.

या मॅरेथॉन स्पर्धा सुरु होण्यापुर्वी आदित्य आळंगे यांच्या झुम्मा डान्सवर आ.अभिमन्यू पवार यांच्या सोबत सर्व स्पर्धकांनी अर्धा तास आनंद घेतला. त्यानंतर सकाळी ७ वाजता उत्साहपूर्ण



वातावरणात मॅरेथॉन स्पर्धा सुरु झाली. ५ कि.मी. मॅरेथॉन स्पर्धेचे आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून उद्घाटन करण्यात आले. औसा शहरातील मुक्तेश्र्वर मंदिर ते उंबडगा रोड वरील गणपती मंदिर व परत मुक्तेश्र्वर मंदिर या प्रमुख मार्गांवरून मॅरेथॉन स्पर्धा पार पडली.

या स्पर्धेत निलंगा तालुक्यातील केळगाव येथील माध्यमिक आश्रम शाळ-ेतील बालाजी राम राठोड यांनी अवघ्या २२ मिनिट ५ सेकंदात पूर्ण करून प्रथम क्रमांक मिळवला तर निलंगा तालुक्यातील हाडागा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे चंद्रकांत कमलाकर पाटील यांनी २२ मिनिटे ३८ सेकंदात पूर्ण करून द्वितीय क्रमांक मिळवला तर चाकुर तालुक्यातील महालंग्रा येथील डी, बी. पब्लिक स्कुलचे फिरोज मुलतानी पटेल यांनी २३ मिनिटात अंतर पूर्ण करून तृतीय क्रमांक मिळवला. या विजेत्या धावपटूंना आ.अभिमन्यू पवार, किल्लारी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गोपाळ शिंदे, पतसंस्थेचे चेअरमन महादेव खिचडे यांच्या हस्ते प्रथम क्रमांक विजेत्याला ५००१ रु., द्वितीय क्रमांक विजेत्याला ३००१ रु., तृतीय क्रमांक विजेत्याला २००१ रु., व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेतील सर्व सहभागी स्पर्धकांना व तालुक्यातील उपस्थित पत्रकारांना टी शर्ट देण्यात आले आणि सर्व सहभागी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते मेडल देण्यात आले.

आ. अभिमन्यू पवार म्हणाले, राज्यात औसा मतदार संघात प्रथमच शिक्षकांच्या स्पर्धा घेतल्याबद्दल औसा शिक्षक पतसंस्थेचे कौतुक करून शिक्षकांनी आज विद्यार्थी होऊन शिस्त, संयम, नियोजनबद्ध स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल मला अभिमान वाटला असल्याचे मत व्यक्त केले. चेअरमन महादेव खिचडे यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

चेअरमन महादेव खिचडे, व्हा. चेअरमन हरीश आयतनबोने, सचिव संजय जगताप, मॅरेथॉन स्पर्धा प्रमुख संजय रोडगे, संचालक युसुफ पिरजादे, मधुकर गोरे, रमेश जाधव, महेश कांबळे, दिपक डोंगरे, धीरजकुमार रुकमे, अमोल शेळके, कर्मचारी वर्ग, मॅरेथॉन स्पर्धा समितीचे सदस्य, स्वयंसेवक तसेच स्थानिक प्रशासनातील पोलीस स्टेशन औसा, आरोग्य विभाग औसा, ज्ञान पंढरी मॉर्निंग ग्रुप, शिवनेरी मॉर्निंग ग्रुप यांनी स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या दरम्यान आरोग्यसेवा, पाणी व सुरक्षिततेची योग्य व्यवस्था करण्यात आली होती. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेली ही मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात व शिस्तबद्ध वा-तावरणात पार पडली.

# हजरत पिर गैबीबाबा उरूस कमिटी अध्यक्षपदी कुरेशी

## उपाध्यक्षपदी चंद्रप्रकाश हांगे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव :** येथील हजरत पिर गैबीबाबा उरूस ( यात्रा) महोत्सव





बुधवारी ( दि.७ ) संदलने प्रारंभ होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या यात्रेची सांगता शनिवारी ( दि.१०) जंगी कुस्त्याने होणार आहे उरूस महोत्सव कमिटी अध्यक्षपदी निजाम गुडुलाल कुरेशी यांची तर उपाध्यक्षपदी चंद्रप्रकाश आत्माराम हांगे, सचिव पदी ग्रामपंचायत अधिकारी राजेंद्र कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.

ही निवड प्रभारी सरपंच विठ्ठलराव बडके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत झाली. यावेळी प्रतिष्ठित गावकरी, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. उरूस उत्सवानिमित्त विविध कमिट्यांची स्थापना करण्यात आली., यात प्रामुख्याने व्यवस्थापन प्रमुख शुभम मुंडे, दक्षता समिती अध्यक्ष धनराज बोडके व कुस्ती व्यवस्थापन समितीमध्ये माजी मुख्याध्यापक डी. व्ही . मुंडे, प्राचार्य जितेंद्र बदने, प्रा. चेतन मुंडे, प्रभाकर क्षीरसागर यांची निवड करण्यात आली आहे.

# सिटी प्रेस क्लब चाकूरचे पत्रकारिता पुरस्कार जाहीर



**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ४ जानेवारी :** सिटी प्रेस क्लब चाकूरच्यावतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या पत्रकारांसाठी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा दि.०२ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत करण्यात आली असून उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार संपादक संजय जेवरीकर,पत्रकार भूषण पुरस्कार काशीबाई थोरात,मायदादा वृतरत्न पुरस्कार अभय मिरजकर आणि चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार नागनाथ पाटील यांना देण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली आहे.

**जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर,काशीबाई थोरात,अभय मिरजकर आणि नागनाथ पाटील यंदाच्या पुरस्काराचे मानकरी**

सदरील पुरस्कारांचे वितरण सोमवार १२ जानेवारी २०२६ रोजी एका भव्य कार्यक्रमात राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत चाकूर येथील भाई किशनराव देशमुख महाविद्यालयाच्या सभागृहात वितरण केले जाणार असल्याची माहिती सिटी प्रेस क्लब चाकूरचे अध्यक्ष प्रा.अ. ना. शिंदे व सचिव मधुकर कांबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे.

यावर्षीच्या पुरस्काराचे मानकरी ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई काशीबाई थोरात,दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर आणि ना-गनाथ पाटील हे आहेत. स्व.नागोराव संभाजी शिंदे यांच्या स्मरणार्थ पत्रकार अ. ना.शिंदे यांच्यावतीने 'मराठवाडा स्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार' जेष्ठ पत्रकार संजय जेवरीकर यांना दिला जाणार आहे.कालवश मालनबाई सोपानराव कांबळे व कालवश सोपान काशीराम कांबळे यांच्या स्मरणार्थ पत्रकार मधुकर कांबळे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय मायदादा वृत्तरत्न पुरस्कार' दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर,स्व.काशीबाई बळीराम सोनटक्के यांच्या स्मरणार्थ जेष्ठ स्वातंत्र सैनिक बळीरामजी सोनटक्के व पत्रकार संगमेश्र्वर जनगावे यांच्या वतीने 'मराठवाडा स्तरीय पत्रकार भूषण पुरस्कार' वरिष्ठ सहाय्यक संचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय मुंबई काशीबाई थोरात यांना तर चाकूर येथील जेष्ठ पत्रकार नागनाथ पाटील यांना 'चाकूर भूषण पत्रकारिता पुरस्कार' दिला जाणार आहे.

# धुमाळ यांचा शिवसेनेतील प्रवेश विधानसभेला उभारी देणारा : माने

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ४ जानेवारी :** जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांचा शिवसेनेतील प्रवेश निलंगा विधानसभेला उभारी देणारा असल्याचे मत शिवसेना जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांनी व्यक्त केले. नुकतेच शिवसे-नेत प्रवेश केलेल्या पंडितराव धुमाळ व त्यांच्या सहकाऱ्यांचा भव्य सत्कार निलंगा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी माने बोलत होते.

आगामी काळात अनेकांचे शिव-सेनेत जाहीर प्रवेश होणार असून निलंगा, देवणी, शिरूर अनंतपाळ या तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणात इतर पक्षांची असंख्य कार्यकर्ते शिवसेनेमध्ये येण्यासाठी इच्छुक आहेत. भविष्यात अनेकांचे प्रवेश होणार असून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून कर्तृत्वाचा उमटलेला ठसा हा प्रेरणादायी आहे. निलंगा विधानसभा हा एक शिव-सेनेचा मजबूत किल्ला बनवण्यासाठी प्रवेश



केलेल्या सर्व लोकांनी तसेच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये स्वतः ला झोकून देऊन काम करावे. तसेच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार युतीच्याबाबत निर्णय घेतला जाईल. या आदेशाप्रमाणे निवडणुका लढवल्या जातील. परंतु निलंगा, देवणी व शिरूर अनंतपाळ या तिन्ही तालुक्यांमध्ये जिल्हा परिषद पंचायत समिती साठी शिवसेनेने ताकदीने उभे राहावे असे आवाहनही जिल्हाप्रमुख माने यांनी केले.

यावेळी पंडितराव धुमाळ, संजय बिरादार,उल्हास सूर्यवंशी, महेश चव्हाण आदींचा शिवसेनेत प्रवेश केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देतांना पंडितराव धुमाळ म्हणा-ले की, होय मी निश्रि्चत एक चांगलं व्यासपीठ ,एक चांगला नेता ज्या नेतृत्वात मला काम करण्याची इच्छा होतेती असं नेतृत्व मला एकनाथ शिंदे यांच्या रूपाने दिसले म्हणून मी शिवसेनेत प्रवेश केला. भविष्यात संपूर्ण जीवन शिवसेनेच्या सोबतच घालविन . माझ्यासोबत आलेले सर्व सहकारी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या आदेशाचे पालन करून शिवसेना पक्ष वाढीसाठी निश्रि्चत प्रयत्न करू . आणखी बरेचसे लोक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत ,या सर्वांना सोबत घेऊन मी एकनाथ शिंदे व जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांच्या नेतृत्वात काम करीत राहीन अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी निलंगा विधानसभा प्रमुख सोमनाथ स्वामी डिगोळकर, बालाजी माने, शिरूर अनंतपाळ तालुकाप्रमुख विकास शिंदे, देवणी तालुकाप्रमुख धनराज बिरादार, साहित्यिक गोविंदराव श्रीमंगल मुरलीधर शिंदे, भास्कर कुलकर्णी, युव-ासेना जिल्हा उपप्रमुख राहुल बिरादार, देवणी तालुका संघटक विष्णू बिरादार, शिरूर अनंतपाळ शहर प्रमुख विन-ोद धुमाळे, देवणी शहर प्रमुख कांबळे, गणेश माने, महिला आघाडी मागास-वर्गीय सेलचा जिल्हा संघटिका सरोजा गायकवाड, महिला आघाडी उपजिल्हा संघटिका रेखाताई पुजारी, तालुकाप्रमुख दैवता सगर, देवणी तालुका प्रमुख कुंडगीरताई, शिरूर अ. महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षाताई शिंदे, शि. अ. युवा सेनाप्रमुख धनराज माने,बबीताताई कोरके, कल्पनाताई स्वामी, खंडू मनाळे, व्यंकट आयतनबोने, बालाजी मोहिते, यासह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

# जनतेच्या सेवेसाठी तत्पर राहणारा उमेदवार देणार : पाटील

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. ४ जानेवारी :** आगामी जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जनतेच्या सेवेसाठी जो व्यक्ती सदैव तत्पर राहतो आणि लोकांनी शिफारस केलेल्या व्यक्तीला जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून देणारअसल्याचे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर तालुक्यातील रोहिना येथे केले.

रोहिणा येथे आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर रोहिणा जिल्हा परिषद मतदार संघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी सहकार मंत्री





ना. बाबासाहेब पाटील बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवाजीराव काळे, नगराध्यक्ष करीमसाहेब गुळवे, माजी नगराध्यक्ष उषाताई कांबळे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक यशवंतराव जाधव, तालुका कार्याध्यक्ष भानुदासराव पोटे, सरपंच दयानंदराव सुरव-से, तालुका उपाध्यक्ष गणपतराव कवठे, नंदकुमार पवार, नगरसेवक इलियासभाई सय्यद, विष्णुकांत तिकटे, सिद्धेश्र्वर अंकलकोटे, मिलिंदराव महालिंगे, मधुकरराव मुंडे, गंगाधर अक्कानरू, भुजंगराव केंद्रे, भीष्मनारायण केंद्रे, सिद्धेश्र्वर लोहारे, मनोजराव पाटील, संदीप शेटे, मच्छिंद्र नागरगोजे, समाधान डोंगरे, ओम केंद्रे, संदीप पांचाळ, सुरज पटणे, धनराज बाचीफळे, अशोक घोरपडे, देवानंद पाटील, लक्ष्मणराव घुमे, मारोती माडगे, व्यंकट कैलवाडे, राजू शिंदे, अशोकराव पाटील, अंतेश्र्वर पाटील, सूर्यकांत गव्हाणे, बब्रुवान केसाळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बिलालखा पठाण यांनी केले. या कार्यक्रमास रोहिना जिल्हा परिषद मतदार संघातील सर्व १८ गावातील शेकडोच्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती.

# आनंदवाडी ग्रामपंचायतीत फुले जयंती

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. ४ जानेवारी :** तरुण भारत वृत्तसेवा शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे आनंदवाडी आनंदवाडी ग्रामपंचायतच्या वती-ने आज क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. ज्या काळात मुलींना शिक्षण देणे मुलींना पाप समजत होते. त्या काळात सावित्रीबाई फुलेंनी मुलींसाठी शाळा सुरू करुन हजारो मुलींच्या आयुष्याला नवी दिशा दिली.

आपण जेव्हा मोठ्या अभिमानाने म्हणतो मुलगी शिकली प्रगती झाली. तेव्हा त्या प्रगतीचा पाया रचणाऱ्या सावित्रीमाईची आठवन येणे अनिवार्य आहे. पुण्याच्या भिडे वाड्यापासून सुरू झालेली ती छोटीशी ठिणगी आज जगभर ज्ञानाचा प्रकाश पसरवत आहे. सावित्रीबाईंनी शिकवले की परिस्थिती कितीही विपरीत असली तरी न्यायाच्या वाटेवरून ढळू नका . त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊनच आपण उद्याचा सक्षम समाज घडवू शकतो. ज्ञानदात्री माऊलीला जयंतीदिनी विनम्र अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी सरपंच भागवत वंगे, उपसरपंच व्यंकट कल्ले, संदिपान वंगे, रंजित मरे, प्रशांत शिरूरे , प्रभावती व्यंजने, कुशावर्ता वंगे, महिला बचत गटाच्या प्रमुख अनूसया शिरूरे, सुवर्णा दिवेकर, अंजली सोनवणे, मंडोदरी चलमले आदी गावातील महिला उपस्थित होते.

# स्टुडंट कार्निवलच्या गजरात किलबिल स्कूल बहरली

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. ४ जानेवारी :** येथील किलबिल नॅशनल स्कूल येथे दिनांक ३ व ४ रोजी आयोजित करण्यात आलेल्या किलबिल स्टुडंट टॅलेंट कार्निवल कार्यक्रमाचे उत्साहात व जल्लोषात उद्घाटन झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन नगरीच्या नगरसेविका शाहुबाई कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला जिल्हा अध्यक्षा तथा नगरसेविका मीनाक्षीताई शिंगडे तर प्रमुख पाहुणे म्हणून अमितभैय्या रेड्डी, डॉ निलेश मजगे, अय्याज शेख, किशोर कोरे, राहुल शिवपुजे, बागवान शहनाजबी, बागवान शहनाजबेगम ,प्रदीप कांबळे, माणिकभाऊ



कदम, निखिल कासनाळे, प्रशांत भोस-ले, संदीप चौधरी, अजिंक्य चामे, सद्दाम शेख, भाग्यश्री बारमाळे, सावनकुमार कदम, कोमल हालसे, किरण बारमाळे, अझहर बागवान, जावेद बागवान, शेख अफरोज, इमरोज पटवेगर, शहराध्यक्षा सुप्रिया भालेराव, संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले, प्राचार्य संतोष पाटील, सरोजा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी या कार्निवलचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्निवलमध्ये एकूण ४१ तुकडीतील प्रत्येक विद्यार्थ्याने सहभाग नोंदवला होता. यामधे प्रत्येक वर्गाला एक थीम देऊन त्या विद्यार्थ्यांनी आपली थीम सादर केले त्यामध्ये ग्रामीण जीवन व संस्कृती, वृद्धाश्रम, शेतकऱ्यांची व्यथा, शास्त्रज्ञांची ओळख,बारा बलुतेदार,संतांची ओळख, आपले मदतनीस, भावी अधिकारी, वेगवेगळ्या राज्यातील वेशभूषा व त्यातील त्यांचे राहणीमान आदी विषय घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेली मॉडेल्स, चित्रे व नाविन्यपूर्ण कल्पना पाहण्यासाठी पालकांनी मोठी गर्दी केली होती. प्रत्येक उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांचा आत्मविश्र्वास व कल्पकता स्पष्टपणे दिसून येत होता. सदरील कार्यक्रम हा सलग दोन दिवस सुरू असून प्रत्येक सत्रामध्ये सकाळ सत्र व दुपार सत्र अशा गटामध्ये विद्यार्थ्यांचे विभाजन करून प्रत्येक वर्गातील विद्यार्थी सहभागी करून घेण्याचा प्रयत्न शाळेने केला आहे.

# छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ४ जानेवारी :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबीर मौजे बामणी येथे पार पडले. या शिबिराच्या समारोप प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कि. शि.प्र. मंडळाचे उपाध्यक्ष माधवराव पाटील हे होते. प्राचार्य डॉ.रामकिशन मांजरे, डॉ. विष्णू पवार, डॉ.अनंत टेकाळे यांची प्रमुख विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मौजे बामणीचे सरपंच कै. राजकुमार बिराजदार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे म्हणाले, बामणी गावातील सर्व नागरिकांचे आमच्या शिबिरासाठी खूप मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच आमचे विद्यार्थी आनंदाने उपक्रम राबवू शकले. गावकऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या संस्थेच्या वतीने आभार. यावेळी डॉ.अतिष आकडे यांनी शिबिराचा अहवाल सादर केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विश्र्वनाथ भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. हरीभाऊ ढगे यांनी केले. याप्रसंगी बामणी येथील ग्रामस्थ व शिबिरार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. या विशेष वार्षिक शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व कार्यक्रमाधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंसेवकांनी परीश्रम घेतले.

# भारतातील आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले : प्रा. पाटील

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. ४ जानेवारी :** छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात एकोणीसाव्या शतकातील भारतीय शिक्षणाच्या आद्य जनक क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आयोजित केली होती. त्याप्रसंगी सौ.मनीषा पाटील यांनी सावित्रीबाई फुले आद्य शिक्षिका असल्याचे उद्गार काढले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एम.मांजरे होते.तर विचार मंचावर श्री दिलीप पाटील, प्रबंधक बी. के.पाटील,अधिक्षक व्ही. डी. गुरनाळे उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभाग प्रमुख डॉ.सुरेश शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहसंयोजक प्रा.डॉ.डी.बी. मुळे यांनी केले.

# उदयोत्सवात खाद्य-बौद्धिक-मनोरंजनाची तिहेरी मेजवानी

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १ जानेवारी :** येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलन 'उदयोत्सव २५-२६' चा दुसरा दिवस विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे व विविधांगी उपक्रमांमुळे अत्यंत उत्साह-पूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ज्ञान, संस्कृती आणि सृजनशीलतेचा सुरेख संगम या दिवशी अनुभवायला मिळाला.

दिवसाच्या सत्रात आयोजित विज्ञान प्रदर्शन, निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा तसेच प्रश्र्नमंजूषा या उपक्रमांतून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता, संशोधन वृत्ती आणि वैचारिक मांडणी कौशल्ये प्रकर्षाने समोर आली. विविध विषयांवरील अभिनव मांडणी व तर्कसुसंगत सादरीकरणाने परीक्षकांसह उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

'आनंदनगरी' अंतर्गत उभारण्यात आलेल्या बावीस खाद्य स्टॉल्सवर महाराष्ट्रासह देशातील विविध प्रांतांतील पारंपरिक व आधुनिक खाद्यपदार्थांची रेलचेल पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक, पालक व



माजी विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी एक लक्ष रुपयाची स्वयं कमाई केली. सायंकाळच्या सत्रात आयोजित पसतीस नृत्य आणि गायन सादरीकरणांनी कार्यक्रमाला मनोरंजनाची रंगत आणली. एकूण बावन्न विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळालेल्या व्यासपीठामुळे प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे भरभरून कौतुक केले. ज्ञानवृद्धी, संस्कार आणि मनोरंजन यांचा समतोल साधण-ारा हा दिवस विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच माजी विद्यार्थी यांच्यासाठी अविस्मरणीय ठरला. आनंद नगरी साठी परीक्षक म्हणून इनर व्हील क्लब उदगीर च्या अध्यक्षा पल्लवी मुक्कावार तसेच माजी अध्यक्षा मानसी चन्ना-वार या उपस्थित होत्या. विज्ञान प्रदर्शनासाठी डॉ. बी. डी. अच-वले आणि डॉ. एस. व्ही. चाटे परीक्षक होते, सांस्कृतिक कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून श्री. हावगीस्वामी महाविद्यालयातील संगीत विभाग प्रमुख प्रा. डॉ. के. आर. अनवले तसेच प्रा.जे. आर. कांदे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यांनी केले. विविध गुणदर्शन कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अॅड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, सदस्य शिवराज वल्लापुरे, गजानन भातलवंडे डिवायएसपी, राजकुमार पुजारी पीआय, सुधाकर केंद्रे पीएसआय, पत्रकार युवराज धोत्रे उपस्थित होते.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## रस्ता रुंदीकरणाचे काम रखडल्याने भाविक आणि नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

हुतात्मा स्मारक ते आर्य चौक ते किसान चौकी रस्ता रुंदीकरण तुळजापूर विकास प्राधिकरणा योजनेअंतर्गत चे काम रखडल्याने तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचे आणि शहरातील नागरिकांची गैरसोय होत असून कामाची सुरुवात करण्यात यावी म्हणून नगरसेवकांनी उपजिल्हा अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, सहाय्यक संचालक नगर रचना यांच्या पत्राच्या अनुषंगाने रस्ता रुंदीकरणाबाबत विहित प्रक्रियेस अवलंब करून भूसंपादनाची पुढील कारवाई हुतात्मा स्मारक ते आर्य चौक ते किसान चौकी करावी व नागरिकांची आणि दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळावी त्वरित कारवाई करून रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची सुरुवात करावी.

सदरील निवेदनावर नगरसेवक अमोल कुतवळ, रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय कदम, प्रगती लोंढे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



### नवनिर्वाचित नगरसेवक रत्नकांत शिंदे यांचा प्राध्यापकांकडून सत्कार

**परंडा, दि.४ जानेवारी -**

परांडा येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे. शिंदे महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रत्नकांत उर्फ पापा शिंदे यांच्या आई वनमाला शिंदे या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक १० मधून भरघोस मतांनी नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने रत्नकांत उर्फ पापा शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महेशकुमार माने, स्टाफ सेक्रेटरी डॉ. शहाजी चंदनशिवे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा. किरण देशमुख, ग्रंथपाल डॉ. राहुल देशमुख, प्रा. अनंत अनभुले यांच्या उपस्थितीत पुस्तक व शाल देऊन हा सत्कार करण्यात आला.



### दिनेश मंडलिक यांचा सत्कार

**कळंब, दि.४ जानेवारी -**

येथील उपविभागीय कार्यालयातील कार्यरत असलेले कर्तव्यदक्ष महसूल सहाय्यक अधिकारी दिनेश मांडलिक यांचा वाढदिवसानिमित्त कळंब येथील उपविभागीय कार्यालयात सेतू सुविधा केंद्र संचालक व मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे, नटराज गायकवाड, सुनील पाटोळे, दीपक दळवी, बाबासाहेब टोपे, कर्मचारी धनराज पिसुरे, बबन जाधवर यांच्यासह नागरीक उपस्थित होते.



### श्री. संत ज्ञानेश्वर प्रशालेत मुलींची समुपदेशन कार्यशाळा संपन्न

**परंडा, दि.४ जानेवारी -**

श्री संत ज्ञानेश्वर प्रशाला लोणी ता. परंडा येथे दि.२ जानेवारी २०२६ रोजी मुलींची समुपदेशन कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेमध्ये आशा स्वयंसेविका जयश्री नलवडे व सुवर्णा शिंदे यांनी पोक्सो कायदा लैंगीक शोषणापासून संरक्षण देण्यासाठी भारत सरकारने २०१२ मध्ये लागू केलेल्या कायद्याबद्द माहिती दिली. मुलींच्या आरोग्यविषयक मागदर्शन करून मुलींच्या समस्येविषयी उपाय योजना सांगीतल्या. कार्यक्रमाला प्रशालेच्या मुख्याध्यापिका शिंदे एस.बी., सहशिक्षिका ठाकूर एस.पी., पाटील, दहिहांडे उपस्थित होत्या.



### पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव यांच्या वतीने शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिनाचे महत्त्व शाळेचे उपप्राचार्य निलेश जाधव यांनी विद्यार्थ्यांसमोर आपल्या मनोगतातून विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिकृती साकारून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता सहावीच्या वर्गशिक्षिका आयशा मोमीन मॅडम यांनी केले. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे, वरिष्ठ समन्वयक प्रभाकर चौधरी, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश, तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

### शेतीत चोरी प्रकरणी गुन्हा नोंद

**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

खाजा शाहानुरु शेख (वय ५१), रा. कोंड, ता. जि. धाराशिव यांनी दि.२. जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या प्रथम तक्रारीवरून, असे नमूद झाले की, त्यांच्या कोंड शिवारातील शेत गट नं. १३६६ व १२९८ मधील तीन म्हैस दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता अज्ञात व्यक्तीने चोरी करून नेल्या आहेत. यावरून ढोकी पोलीस ठाण्यात भा.न्या.सं. कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.




# पूरग्रस्तांना दिलासा, विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री प्रताप सरनाईक



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

मागील वर्षी अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीत शेतकरी व सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी तसेच जिल्ह्यातील मूलभूत सुविधा बळकट करण्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ठाम ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

पालकमंत्री सरनाईक यांनी मंत्रालयातून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली. या बैठकीला जिल्हा नियोजन समिती सभागृह, धाराशिव येथून खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, तर व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आमदार राणाजगजितसिंह पाटील सहभागी झाले.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक रितू खोखर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री सरनाईक यांनी पूरग्रस्त रस्ते व पुलांची तातडीने दुरुस्ती, हरित धाराशिव मोहिमअंतर्गत वृक्षलागवड, नळदुर्ग किल्ला, हातलाई तलाव व तुळजापूर पाचुंबा लेक येथे म्युझिकल फाउंटन, विठ्ठल मूर्ती, वॉटर स्पोर्टसारख्या पर्यटनवृद्धी प्रकल्पांची माहिती दिली. शहरी भागात आरओ प्लांट, डॉग सेंटर, पाळीव प्राण्यांसाठी अंत्यविधी केंद्र, धर्मवीर आनंद दिघे ट्रॅफिक गार्डन, तसेच एमपीएससी-यूपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. उमेद बचतगटांच्या महिलांसाठी आधुनिक पर्यटक बसेसचे लोकार्पणही करण्यात येणार आहे.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी पूरग्रस्तांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली. आमदार कैलास पाटील यांनी जनसुविधा व नागरी सुविधांची प्रलंबित कामे तातडीने सुरू करण्यावर भर दिला.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पर्यटन विकासाचे महत्त्व अधोरेखित करत पूरग्रस्त शेतकऱ्यांना गायींचे वाटप व तुळजापूर उमेद मॉल मंजुरीबद्दल शासनाचे आभार मानले.

बैठकीत जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ व २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यांना मंजुरी देण्यात आली. विविध यंत्रणांच्या प्रमुखांनी निधी खर्च व कामांच्या प्रगतीचा आढावा सादर केला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने व वेळेत कामे पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

## १९५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'सेवाखंड कालावधी क्षमापित' पत्रांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात आज राज्यातील १९५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना 'सेवाखंड कालावधी क्षमापित' पत्रांचे वितरण करण्यात आले. गेल्या २० वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नाची सोडवणूक केल्याबद्दल वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोग्यमंत्र्यांचे आभार मानले.

यावेळी आरोग्यमंत्री बोलताना म्हणाले की, डॉक्टरांनी अधिकाधिक लोकांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवावी. तुम्ही चांगले काम करा, तुमच्या हक्काच्या बाबतीत शासन सदैव सकारात्मक आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात आज १९५ डॉक्टरांना पत्रे देण्यात आली. यापूर्वी नुकतेच १५० वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवाखंड कालावधी क्षमापित करण्यात आला होता. त्यामुळे आतापर्यंत एकूण ३४५ वैद्यकीय अधिकाऱ्यांना ही पत्रे देण्यात आली असून, उर्वरित सर्व पात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांना येणाऱ्या महिन्याभरात क्षमापण पत्रांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

सन २००९ पूर्वी अनेक वैद्यकीय अधिकारी अस्थायी स्वरूपात आरोग्य विभागात कार्यरत होते. सन २००९ मध्ये त्यांचा शासकीय सेवेत समावेश करण्यात आला. मात्र सेवाखंड कालावधी क्षमापित नसल्यामुळे त्यांना अनेक आर्थिक व प्रशासकीय लाभांपासून वंचित राहावे लागत होते. या संदर्भात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या संघटनांकडून सातत्याने मागणी होत होती. त्या अनुषंगाने सर्व पात्र अधिकाऱ्यांना पारदर्शकपणे सेवाखंड कालावधी क्षमापित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या ऐतिहासिक निर्णयामुळे शेकडो वैद्यकीय अधिकाऱ्यांची सलग सेवा ग्राह्य धरली जाणार असून, त्यांना पदोन्नती, वेतनवाढ, निवृत्तीवेतन व अन्य आर्थिक लाभ मिळणार आहेत.

## प्रतिबंधित गुटखा विक्रीप्रकरणी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत प्रतिबंधित गुटखा विक्रीप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. आरोपी प्रभाकर सुग्रीव लबडे (वय ४७), रा. मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. धाराशिव यांना दि.२ जानेवारी २०२६ रोजी सायं. ७ वा. मंगरुळ येथील सुरेखा किराणा दुकानात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विमल पान मसाला विक्रीसाठी बाळगलेला आढळून आला.

पोलिसांनी सुमारे ८०० रूपये किमतीचा गुटखा साहित्य जप्त करून आरोपीविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## गैरप्रकारांबाबत तक्रार केल्याचा राग : श्री तुळजाभवानी मंदिरात पुजाऱ्यास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ जानेवारी -**

तुळजाभवानी मंदिरात होणाऱ्या कथित गैरप्रकारांबाबत वारंवार तक्रारी देत असल्याचा राग मनात धरून पुजारी विजय भोसले यांना मारहाण व धमकी देण्यात आल्याची तक्रार त्यांनी तहसीलदार तथा मंदिर व्यवस्थापक माया माने यांच्याकडे केली आहे.

तक्रारीनुसार, दि.२ जानेवारी रोजी सायंकाळच्या सत्रात पुजारी विजय भोसले हे भाविकांच्या अभिषेक पूजेकरिता मंदिरात उपस्थित होते. अभिषेक रांगेतील भाविक अत्यंत संथ गतीने पुढे सरकत असताना, व्हीआयपी गेटमधून कोणताही पास नसताना व व्हीआयपी रजिस्टरमध्ये नोंद नसतानाही भाविकांना सोडले जात असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही बाब त्यांनी सुरक्षा रक्षकांच्या लक्षात आणून देत अभिषेक रांगेत शेकडो भाविक उभे असल्याचे सांगितले.



यावेळी ओंकार इंगळे (रा. जवाहर गल्ली, तुळजापूर) हा व्यक्ती मद्यधुंद अवस्थेत भोसले यांना शिवीगाळ करू लागला. मंदिर परिसरात शिवीगाळ करू नये, भाविक उपस्थित असल्याचे भोसले यांनी सांगितल्यानंतरही, संबंधित व्यक्तीने पलंग शेजघर परिसरात भाविकांसमोर भोसले यांच्या बनियानला ओढून गच्ची पकडत मारहाण केली. तसेच तू मंदिराबाहेर चल, तुला दाखवतो, खलास करतो अशा धमक्या देत बोगस अभिषेक पासबाबत अर्ज का देतोस, असे म्हणत दहशत निर्माण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यावेळी मंदिरातील पोलीस अधिकारी अर्जुन चौधर व इतर अधिकारी व सुरक्षा रक्षक यांच्या मध्यस्थीने भोसले यांची सुटका करण्यात आली. मात्र मंदिरासारख्या सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही फुटेजसमोर अशा प्रकारे मारहाण व धमकी दिल्यास भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असे भोसले यांनी निवेदनात नमूद केले आहे.

तसेच दि.२ जानेवारी रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत अभिषेक पूजेच्या वेळी जनसंपर्क अधिकारी केबिनमध्ये कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची सीसीटीव्ही फुटेज, व्हीआयपी रजिस्टर तपासून सखोल चौकशी करावी व संबंधित व्यक्तीवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी पुजारी विजय भोसले यांनी निवेदनातून केली आहे.

## स्वामी विवेकानंद विद्यामंदिरमध्ये माजी विद्यार्थी संघाची स्थापना



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ जानेवारी -**

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर येथे माजी विद्यार्थी संघाची स्थापना मोठ्या उत्साहात व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नामवंत माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत ही स्थापना बैठक संपन्न झाली.

माजी विद्यार्थी संघ स्थापन बैठकीच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार होत्या. संस्थेचे कार्यवाह तथा शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. कपिल महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्वानुमते माजी विद्यार्थ्यांमधून अध्यक्षपदी महेश शाहूराज पाटील, उपाध्यक्षपदी भालचंद्र कुलकर्णी व भाग्यश्री लोकरे, कोषाध्यक्षपदी शुभम विरंची पाटील यांची निवड करण्यात आली. तसेच सेवानिवृत्त अधिकारी सुनील दळगडे, सेवानिवृत्त शिक्षक श्रीराम कुलकर्णी, पालक प्रतिनिधी म्हणून अर्चना जाधव व्हंड्रे, तर सल्लागार सदस्य म्हणून शिक्षक गोपाळ आष्टे व गोविंद जमादार यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय कोकणे यांनी केले, सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख समीर देशपांडे यांनी केले, तर आभार जैतून बी. मेंडके यांनी मानले.

## नांदगावमध्ये मारहाण प्रकरणी वाशी पोलिसांकडे गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

वाशी तालुक्यातील नांदगाव येथील शेतात काम न केल्याच्या वादावरुन अमोल एकनाथ शिंदे (रा. नांदगाव, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी आशा अमोल शिंदे (वय २९, रा. नांदगाव, ता. वाशी) यांच्यावर दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता शिवीगाळ करून लाथाबुक्या व लोखंडी रॉडने मारहाण केली.

यामध्ये ती गंभीर जखमी झाली व आरोपींनी जिवे ठार मारण्याची धमकी देखील दिली.

प्रथम खबरेवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ११८ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## डॉ. व्ही. के. पाटील कॉलेजच्या आदित्य गवळीची आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथील डॉ. व्ही. के. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी मधील विद्यार्थी आदित्य दीपकराव गवळी याची आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांच्या अंतर्गत सोलापूर झोन फुटबॉल स्पर्धा डिसेंबर २०२५ मध्ये पार पडल्या. या स्पर्धेत काझी मोहम्मद, काम अदनान, सय्यद शाबिब, महेबूब शेख, आदित्य गवळी, अयान शेख, अम्मार खान, समीद खान, रशाद वर्क, जुनेद शेख, साद मोमीन, राहुल अडसुळे, अब्दुल खदीर, काझी मोहम्मद अशा एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

या सहभागी विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे आदित्य दीपकराव गवळी याची आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. ही निवड चाचणी संजीवन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पन्हाळा (कोल्हापूर) येथे पार पडली.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व करण पाटील यांनी आदित्य गवळीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच कॉलेजचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कॅम्पस डायरेक्टर डॉ. सुरज ननवरे, प्रा. तुषार ताकभाते, प्रा. प्रशांत कोरके, प्रा. स्नेहल साखरे, प्रा. काजल काशीद, वरिष्ठ लिपिक बालाजी मुंडे व कनिष्ठ लिपिक अजित शिनगारे यांनीही अभिनंदन केले.

# महिलांना तुळजापुरात हक्काची बाजारपेठ; 'उमेद मॉल' उभारणीस हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ जानेवारी -**

तीर्थक्षेत्र तुळजापूरात 'उमेद मॉल' सुरू करण्याच्या मागणीला यश मिळाले असून, राज्य सरकारने शुक्रवारी त्याबाबतचा शासन आदेश जारी केला आहे. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी ही माहिती दिली. तुळजापुरात 'उमेद मॉल' उभारल्यास धाराशिव जिल्ह्यातील महिला बचत गटांना स्थिर विक्री दालन उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पादनांना विस्तृत बाजारपेठ मिळणार आहे.

राज्यात सुरू होत असलेल्या उमेद मॉलपैकी एक तुळजापूर शहरात सुरू करावा, अशी मागणी आमदार पाटील यांनी १२ डिसेंबर रोजी विधानसभेत मांडली होती. या मागणीला महायुती सरकारने मंजुरी दिली असून, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे.

'उमेद मॉल' - ग्रामीण महिलांसाठी हक्काची बाजारपेठ 'उमेद मॉल' हा महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत राबविण्यात येणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. हा पारंपरिक मॉल नसून, ग्रामीण भागातील महिला स्वयं-सहाय्यता गटांनी तयार केलेल्या वस्तूंना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवणारे व्यासपीठ आहे. बचत गटांच्या माध्यमातून तयार होणाऱ्या विविध वस्तू व उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी 'महालक्ष्मी सरस', जिल्हा व विभागस्तरीय प्रदर्शन, आठवडी बाजारातील स्टॉल्स यांद्वारे आधीच प्रोत्साहन दिले जाते. याशिवाय 'उमेदमार्ट' ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म तसेच अॅमेझॉन, फ्लिपकार्टसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरही गटांची नोंदणी सुरू आहे.


### मराठवाड्यात तीन मॉल; तुळजापूर एक केंद्र...

राज्यातील दहा जिल्ह्यांत 'उमेद मॉल' प्रकल्प राबविण्यात येणार असून, मराठवाड्यातील तीन मॉलपैकी एक तुळजापुरात उभारला जाणार आहे. स्थानिक महिला बचत गटांमध्ये या निर्णयाबाबत उत्सुकता वाढली आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन महिला स्वयं-सहाय्यता गटांच्या उत्पादनांसाठी हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी पहिल्या टप्प्यात धाराशिव जिल्ह्यात 'उमेद मॉल' उभारणीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार तुळजापूर शहरात हा मॉल साकारण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

आई तुळजाभवानीचे पवित्र मंदिर असलेल्या तुळजापूरात वर्षभर भाविकांची मोठी ये-जा असते. दरवर्षी सुमारे दीड कोटी भाविक येथे दर्शनासाठी येतात. या प्रचंड लोकसहभागाचा थेट लाभ महिला बचत गटांच्या उत्पादनांना मिळावा, त्यांना कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण व्हावे, यासाठी तुळजापूर येथे 'उमेद मॉल' उभारण्याचा ठाम आग्रह करण्यात आला होता.

### आ. राणादादांकडून राज्य सरकारचे आभार...



या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे जिल्ह्याच्या वतीने आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी आभार मानले आहेत. राज्यातील सर्वोत्तम सुविधा उपलब्ध करून देत, बचत गटांना राष्ट्रीय पातळीवरील संधी देण्याचा आमचा प्रयत्न असून, तुळजापूरातील 'उमेद मॉल' महिला सक्षमीकरणाचे नवे केंद्र ठरेल, असा विश्वास आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ढगाळ वातावरणामुळे शहरातील थंडी ओसरली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** मागच्या दोन दिवसात लातूर शहर आणि परिसरात असलेल्या ढगाळ वातावरणामुळे थंडीचा कडाका काही प्रमाणात कमी झाल्याचे निदर्शनास येत आहे.

यावर्षीच्या पावसाळ्यात जिल्हाभरात मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने यंदा मागच्या वर्षाच्या तुलनेत थंडीही चांगलीच राहील, असे वाटत होते. त्याप्रमाणे थंडीचा प्रभावही जाणवला. मागच्या पंधरा दिवसात थंडीचा कडाका जणू हुडहुडी भरवणारा असाच होता. या थंडीने सर्दी - पडश्याची लागण झालेले हजारो रुग्ण दवाखान्यात ताटकळत बसलेले पाहायला मिळत असत. सर्दी तापापेक्षा खोकल्याने नागरिकांना चांगलेच बेजार केल्याचे पाहावयास मिळाले. अनेकांना हा खोकला महिना महिना त्रास देत असून खोकल्याची अनेक औषधे घेऊनही खोकला कमी होत नसल्याच्या अनेकांच्या तक्रारी आहेत. दोन दिवसापासून जिल्हयाच्या बहुतांश भागात ढगाळ वातावरण आहे. त्यामुळे थंडीचा प्रभाव फारसा ओसरला आहे. मात्र, या ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर अळीचा प्रादुर्भाव होण्याची भीती शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. ढगाळ वातावरण ओसरल्यानंतर थंडी वाढणार की कासवगतीने उन्हाळ्याचे आगमन होणार हे येत्या काही दिवसात समजू शकणार आहे.



# विकासाच्या भूमिकेवर मनपा निवडणूक : आ.निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** विकासाची भूमिका घेऊन भाजपा लातूर महानगरपालिका निवडणुकीत जनतेला सामोरी जात आहे. याउलट काँग्रेसकडून जातीय विष पेरण्याचे काम केले जात आहे. काँग्रेस ही निवडणुक वेगळ्या दिशेला घेऊन जात आहे, असे मत माजी



मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.

पाटील प्लाझा येथील भाजपा निवडणूक कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत आ.निलंगेकर बोलत होते. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, गुरुनाथ मगे, प्रविण सावंत यांची याप्रसंगी उपस्थिती होती.

यावेळी बोलताना आ. निलंगेकर म्हणाले की, भाजपा विकासाची भूमिका घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. लातूर शहरातील विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम मागील काळात भाजपाने केले आहे. यापुढेही त्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शहरातील वाहतुकीच्या समस्येवर उत्तर शोधणे आवश्यक आहे. त्यासाठी नियोजन करावे लागते. वाहतुकीला शिस्त लावावी लागेल. परंतु त्यासाठी लातूरमध्ये रहायला हवे, असा टोलाही आ. निलंगेकर यांनी आ. अमित देशमुख यांचा नामोल्लेख न करता लगावला.

केंद्र आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे. लातूरमध्ये भाजपा सत्तेत आली तर विकासासाठी ट्रिपल इंजिन मिळेल. याचा फायदा लातूरकरांना होणार असल्याचेही आ.निलंगेकर म्हणाले.

काँग्रेसला विरोधी पक्षाची भूमिका नीट मांडता येत नाही. सत्ताधारी म्हणून काम करता येत नाही. मागील १५ वर्ष जनतेने तुमचे म्हणणे ऐकले. स्व. विलासराव देशमुख यांचा वारसा तुम्हाला दिला. परंतु त्यांना अभिप्रेत काम आपण केले का? असा सवालही आ.निलंगेकर यांनी अमित देशमुख यांचे नाव न घेता उपस्थित केला.

भाजपात जात-पात पाहून तिकिटांचे वाटप केले जात नाही. जो कार्यकर्ता जनतेची कामे करतो त्याला उमेदवारी मिळते. अशांनाच यावेळीही उमेदवारी मिळाली आहे. लातूर हे सुसंस्कृत शहर आहे. परंतु या शहरात सोशल मीडियाच्या माध्यमातून जातीय विष पेरण्याचे काम काँग्रेसकडून केले जात आहे. अशा पद्धतीने वातावरण बिघडविणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा इशाराही आ. निलंगेकर यांनी दिला. मनपा निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लातुरात जाहीर सभा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून भाजपा काम करतो. इतरांच्या चारित्र्यावर चिखलफेक करणे ही आमची संस्कृती नाही. ही निवडणूक लातूरची आहे. त्यामुळे लातूरकरांच्या प्रश्नावरच बोलावे. निलंगेकर -देशमुख अशी लढाई ही बाभळगावपासून निलंग्यापर्यंत चालेल, पण लातूरमध्ये चालणार नाही, असेही आ.निलंगेकर म्हणाले.

अजित पाटील कव्हेकर यांनी केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातुन लातूर शहरात राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

# मनपा निवडणुकीच्या माध्यमातून लातूरला पूर्व पदावर आणणार : आ. अमित देशमुख

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिकेची तिसरी सार्वत्रिक निवडणूक भारतीय राष्ट्रीय काँग्रेस वंचित बहुजन आघाडीला सोबत घेऊन लातूरला पूर्वपदावर आणण्यासाठी लढत असल्याचे मत आ. अमित देशमुख यांनी शनिवारी रात्री पत्रकारांशी सुसंवाद साधताना व्यक्त केले.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतही महाविकास आघाडी व्हावी, याकरिता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले, पण त्यात यश आले नाही. काही कारणास्तव वाटाघाटी पूर्णत्वास जाऊ शकल्या नाहीत असे सांगून आ. देशमुख म्हणाले की, मनपा निवडणुकीत काँग्रेस ६५ आणि वंचित बहुजन आघाडी ५ जागांवर निवडणूक लढवत आहे. याठिकाणी आकड्यापेक्षा आम्ही विचारला अधिक महत्व दिल्याचे ते म्हणाले. मागच्या काळात लातूर मंडपामध्ये मोठ्या प्रमाणात अनागोंदी कारभार झाला. नागरिकांना मनपात कोणत्याही कामाला पैसे मोजावे लागल्याच्या तक्रारी आल्या. मनपाचा कारभार पूर्वपदावर आणणे आपले प्रथम उद्दिष्ट्य असल्याचे त्यांनी सांगितले.



लातूरच्या विकासाच्या शेकडो कोटी रुपयांच्या योजना खोळंबल्या आहेत. प्रशासकांच्या काळातही येथे अतिशय ढिसाळ आणि भ्रष्ट कारभार झाल्याचा आरोप देशमुख यांनी केला. लातूरकरांना बांधकाम परवाना, जन्म प्रमाणपत्रासाठीही मोठ्या प्रमाणावर पैसे मोजावे लागल्याबद्दल त्यांनी तीव्र शब्दात नापसंती व्यक्त केली. भाजपच्या नेत्यांनी काँग्रेसचे लोक आपल्या गळाला लावण्याचा प्रयत्न केला. जे थांबणारच नव्हते, त्यांना थांबवण्याचा प्रयत्न करण्यात वेळ का घालवायचा? असा विचार आपण केला. काँग्रेस ही निवडणूक एक वैचारीक लढाई म्हणून लढत आहे. सामन्यासाठी तत्परतेने काम करणे अगत्याचेआहे. मनपाचाकारभार भ्रष्टाचार मुक्त व्हावा, यासाठी आपण प्रयत्नरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी खा. डॉ. शिवाजी कांबळे, वंचितचे सचिन गायकवाड, मंजूताई निंबाळकर, मुफ्ती सय्यद यांनीही आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचे सर्व उमेदवार, दोन्ही पक्षाचे पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

# बामणी येथे ५० लाखांच्या विकास कामाचा शुभारंभ

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** लातूर ग्रामीण मतदार संघातून रमेशआप्पांच्या माध्यमातून काळातील निवडणुकीत जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा सदस्य भाजपाचा निवडून येणे गरजेचे आहे असे प्रतिपादन



भाजपाचाच आमदार असून बामणी आणि परिसरातील सर्वांगीण विकासासाठी येणाऱ्या भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

लातूर तालुक्यातील मौजे बामणी येथे दलित वस्ती सुधार योजनेतून १३ लक्ष रुपये खर्चाच्या बौद्ध विहारचे, २५ लक्ष रुपये खर्चाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाज मंदिराचे लोकार्पण आणि १२ लक्ष रुपये खर्चाच्या सिमेंट रस्ता आणि नाली बांधकामाचे भूमिपूजन कराड यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले.

यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, बन्सी भिसे, प्रताप पाटील, महादेव साळुंके, पांडुरंग बालवाड, हनुमंत गव्हाणे, अमर चव्हाण, प्रशांत शिंदे, संजय पाटील, सुधाकर शिंदे, सचिन पासमे, आत्माराम जाधव, रुपेश काळे, अहमद शेख, सरपंच भागवत दिवटे, विजय पाटील, राम बंडापल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय पाटील यांनी केले तर दिलीप कांबळे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमास सूर्यकांत धारासुरे, अंबादास दिवटे, प्रदीप चित्ते, संजय सावंत, रंगनाथ दिवटे, संजू बंडापल्ले, श्रीपाल गवारे, तुकाराम चिते, गोविंद वाघमारे, बालाजी बंडापल्ले, सोहेल मुजावर, आनंद वाघमारे, तात्याराव कांबळे, विनोद वाघमारे, माणिक इंगळे, संदीप लांडगे, लखन लांडगे यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची राष्ट्रीय पातळीवर निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, २ जानेवारी :** एम.टी.टी.एस प्रशिक्षण वर्गासाठी देशभरातून मोठ्या संख्येने विद्यार्थी अर्ज करतात. यातील निवड गुणवत्तेच्या आधारावर, सातत्यपूर्ण आणि चांगल्या शैक्षणिक कामगिरीवर, तसेच गणिताच्या शिक्षकांच्या शिफारशीवर केली जाते. प्रादेशिक स्तरावर मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी, ऑगस्ट २०१० मध्ये हैदराबाद येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय गणिततज्ञ परिषदेदरम्यान एका बैठकीत, गणित समुदायाला एम.टी.टी.एस. कार्यक्रमाच्या 'लेव्हल ओ'च्या धर्तीवर अशा शिबिरांचे आयोजन करण्याचे आवाहन केले.

प्रादेशिक स्तरावर एक आठवड्याचे इनिशिएशन इन मॅथेमॅटिक्स कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आयआयटी धारवाड, कर्नाटक यांच्याद्वारे २६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेला आहे. या प्रशिक्षणासाठी देशातील विविध राज्यांमधून ६२ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. यात महाराष्ट्र महाविद्यालयातील गणित विभागातील बी.एससी द्वितीय वर्षातील कु.रोहिणी कांबळे व कु. हर्षदा शेंडगे या दोन विद्यार्थिनींची निवड झाली आहे.

निलंग्यासारख्या ग्रामीण भागातून राष्ट्रीय पातळीवर अशा प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांची निवड होणे खूप अभिमानाची गोष्ट आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कर्मवीर कदम यांनी व्यक्त केले. या निवडीबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजयकुमार पाटील निलंगेकर, सचिव बब्रुवान सरतापे, उपप्राचार्य डॉ. बी. एस. गायकवाड, डॉ. एस. पी.बसुदे, प्रा. जे.बी. जाधव, डॉ. जी. आर. जोजार तसेच सर्व प्राध्यापकांनी कौतुक केले.

# मोबाईलच्या योग्य वापरासाठी पालकांनी लक्ष देणे गरजेचे : डॉ. कल्याणे

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ४ जानेवारी :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोबाईलचा मर्यादित व सुयोग्य वापर करावा आणि याकरिता पालकांनी विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी केले.

निलंगा तालुक्यातील औराद शहाजनी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात दि.३ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या पालक मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर पालक मेळाव्याचे संयोजक डॉ.आनंद मुसळे, डॉ.सुचिता किडीले व




डॉ.रितेश व्यास उपस्थित होते.

पुढे बोलताना प्र.प्राचार्य डॉ.शंकर कल्याणे यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील देदीप्यमान वाटचाल पालकांसमोर विशद केली. शिक्षणाचा उद्देश्य हा केवळ नोकरी मिळविणे नसून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करत सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याचा आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त, संस्कार, स्वावलंबन व श्रमप्रतिष्ठा रुजविण्यासाठी प्राध्यापक व पालक यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे गरजेचे आहे असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी डॉ.सुचिता किडीले व डॉ.रितेश व्यास यांनी समयोचित मार्गदर्शन केले. पालक प्रतिनिधी म्हणून माधव बेलुरे, रेखा बिरादार, वर्षा मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पालक मेळाव्याचे प्रास्ताविक डॉ.आनंद मुसळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.शीतल गुंजटे यांनी केले व उपस्थितांचे आभार प्रा.आकांक्षा मुळे यांनी मानले.

याप्रसंगी डॉ.सचिन हंचाटे, डॉ.विनोद जाधव, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.प्रमोद मरगणे, प्रा.प्रज्ञा कुलकर्णी, प्रा.पल्लवी डोंगरगावे, डॉ.मीनाताई बोरुळे, विजयकुमार बाबछडे, रुपेश मोरे, राजेंद्र बेलुरे, मारोती पवार यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# पीएसआय वयोमर्यादा वाढीच्या मागणीसाठी आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** पोलीस उपनिरीक्षक भरती परीक्षेसाठी वयोमर्यादा वाढवण्यात यावी, या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला लातूर शहरातील दयानंद गेट येथे एनएसयूआयने जाहीर पाठिंबा दिला.

या आंदोलनात मोठ्या संख्येने परीक्षार्थी विद्यार्थी सहभागी झाले असून, आपल्या हक्कांसाठी त्यांनी ठाम भूमिका घेत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. पीएसआय भरतीची जाहिरात उशिरा प्रसिद्ध झाल्याने तसेच वारंवार परीक्षांमध्ये होणाऱ्या विलंबामुळे अनेक उमेदवार वयोमर्यादेच्या अडचणीत सापडले आहेत. यामुळे पात्र असूनही संधीपासून वंचित राहण्याची भीती विद्यार्थ्यांमध्ये व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर वयोमर्यादा किमान दोन वर्षांनी वाढवावी, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

दयानंद गेट परिसरात झालेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी घोषणा देत शासनाच्या भरती प्रक्रियेतील दिरंगाईवर नाराजी व्यक्त केली. एनएसयूआयच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शवला. यावेळी जिल्हाध्यक्ष रोहित बिराजदार, महेश साळुंके व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.



# दिव्य दृष्टी दिव्यांगांना सन्मानाची आवश्यकता : डॉ. पाटील

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** लुई ब्रेल यांनी दृष्टी दिव्यांगासाठी सहा टिंबाची ब्रेल लिपी शोधून काढली आणि ब्रेल लिपीच्या माध्यमातून दृष्टी दिव्यांगाना दिव्य दृष्टी प्राप्त झाली. आज दिव्य दृष्टी दिव्यांगांना समाजाकडून सहानुभूतीपेक्षा सन्मानाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

लातूर येथे दृष्टी दिव्यांगांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी ब्रेल महोत्सव २०२६चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पारितोषिक वितरण आणि समारोप कार्यक्रमात त्या प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार हे होते तर विचार मंचावर नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, राष्ट्रीय दृष्टीहीन संघाचे अध्यक्ष रघुनाथ बारड, लातूर अर्बन बँकेच्या संचालिका शुभदा रेड्डी, रोटरी सॅटेलाईट




मिडटाऊन आदिशक्तीच्या मीरा देवणीकर, प्रा. डॉ. संजय गवई, वसंत हेगडे, सुधाकर घारापुरकर, लेखक दिनेश महाजन, अनिता महाजन, सुनील तोरडिया, बाबुराव सूर्यवंशी, डॉ. गुणवंत बिरादार, डॉ. माधव गोरे आणि अमोल निलंगेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी लुई ब्रेल यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी दिव्यदृष्टी बांधवांचा बंधू-भगिनींचा ब्रेल महोत्सव लातूरमध्ये साजरा होत आहे याचा मनस्वी आनंद होत असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. विजयभाऊ राठी म्हणाले की, मुंबई येथे असलेल्या नॅबच्या इमारतीची पुनर्निर्मिती व्हावी आणि शासकीय पातळीवर बी व्हिटॅमिन कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी सुगम गीत गायन स्पर्धा (वरिष्ठ गट)चे प्रथम पारितोषिक रोख पाच हजार रुपये अनिल उंबरे, द्वितीय पारितोषिक तीन हजार रुपये ज्ञानेश्र्वर आहेरकर, तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये श्रावणी अडसुळे, उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक एक

### ब्रेल महोत्सव २०२६ पारितोषिक वितरण आणि समारोप कार्यक्रम

हजार रुपये शिवशरण गडदुरे आणि द्वितीय पारितोषिक एक हजार रुपये रवी गंगणे यांना देण्यात आले.

तर सुगम गीत गायन स्पर्धा (कनिष्ठ गट)चे प्रथम पारितोषिक रोख पाच हजार रुपये शुभांगी मंगळवाडे, द्वितीय पारितोषिक तीन हजार रुपये लक्ष्मण कनकवाड, तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये सागर देशपांडे, उत्तेजनार्थ प्रथम पारितोषिक एक हजार रुपये रुद्राक्ष खजे आणि द्वितीय पारितोषिक एक हजार रुपये युवराज जाधव यांना देण्यात आले.

तसेच प्रत्येक विजेत्या स्पर्धकांना रोख रकमेसोबत स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला आणि सहभागी प्रत्येक स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना अविनाश देवसटवार यांनी केला.

यावेळी रघुनाथ बारड, शुभदा रेड्डी, मीरा देवणीकर, डॉ. संजय गवई, वसंत हेगडे, सुधाकर घारापुरकर आणि लेखक दिनेश महाजन यांनी आपआपली मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव गोरे यांनी केले, सूत्रसंचालन आणि आभार अमोल निलंगेकर यांनी मानले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप चोपडे, मीरा चोपडे, यश चोपडे, पद्मा धाबेकर, सत्यवान जोगदंड, किशोर ससाने, भोलेनाथ चव्हाण, वृषाली महाजन, मृणाली महाजन आणि सुमित भडके यांनी परिश्रम घेतले.

# 'स्वामी विवेकानंद'मध्ये सावित्रीबाई फुले जयंती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ४ जानेवारी :** जेएसपीएम लातूर द्वारा संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर येथे थोर समाजसुधारिका व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली जागर स्त्री शक्तीच्या कर्तृत्वाचा ही प्रभावी बालनाटिका सादर केली.

राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेतील विद्यार्थिनीने जिजाऊंनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकत भविष्यातील मुलींचे जीवन कसे असावे याबाबत मार्गदर्शक संदेश दिला. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी वक्तृत्व, तसेच त्यांच्या विचारांना साजेशी भावपूर्ण नृत्ये यामुळे कार्यक्रम अधिक अर्थपूर्ण ठरला.

यावेळी कर्तृत्ववान मुख्याध्यापकांची शाळा कशी असते, विवेकानंद विद्यालयाची शैक्षणिक वाटचाल, स्पर्धा परीक्षा व तंत्रज्ञानाचे महत्त्व यावर आधारित गीत सादर करण्यात आले. सदर गीत सांस्कृतिक विभागातील रमाकांत शिंदे सर यांनी स्वतः लिहिले होते. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख अलका अंकुशे, रमाकांत शिंदे, ज्योतीराम तवर, बालाजी बोकडे व त्यांच्या सहकार्यांनी केले होते.